https://dainiktarunbharat.com https://epaper.dainiktarunbharat.com

अधिक ज्येष्ठ कृ. ७, युगाब्द ५१२८ | रविवार, ७ जून २०२६

सोलापूर तरुण भारत

आसमंत




# भारतीय आत्मनिर्भरतेचा जागतिक डंका

लक्ष्यवेध | प्रतिनिधी

**गेल्या काही वर्षांपासून भारताने 'आत्मनिर्भर भारत' आणि 'मेक इन इंडिया' या दोन महत्त्वाकांक्षी संकल्पनांच्या आधारे, आपली जागतिक रणनीती अतिशय आक्रमकपणे आखली आहे. आज या धोरणांची गोमटी फळे पाहायला मिळत आहेत. भारत आजवर शस्त्रास्त्रांसाठी विदेशांवर, प्रामुख्याने रशिया, युरोप आणि अमेरिकेवर अवलंबून होता. भारताची ओळख जगात 'सर्वाधिक शस्त्रे आयात करणारा देश' अशीच होती. मात्र, आज चित्र पूर्णपणे पालटले असून, आजचा नवा भारत जगातील अनेक देशांसाठी एक विश्वासार्ह, तंत्रज्ञानयुक्त आणि सक्षम शस्त्रास्त्र पुरवठादार म्हणून उदयास आला आहे. भारताची अर्थव्यवस्था आणि संरक्षण क्षेत्र या दोन्ही आघाड्यांवर, देशाने मिळवलेले यश हे ऐतिहासिकच आहे.**

'मेक इन इंडिया'ने जागतिक स्तरावर भारताचा दबदबा निर्माण केला असून, देशाची निर्यात २४.४० टक्क्यांनी वाढली आहे. आर्मेनियाच्या लष्करी संचलनात 'आकाश' आणि 'पिनाक' सारख्या स्वदेशी शस्त्रास्त्रांचे झालेले दर्शन, भारताच्या आर्थिक महासत्तेकडे होत असलेल्या वाटचालीची साक्ष देते. हा वाढता प्रभाव आत्मनिर्भर आणि शक्तिशाली भारताचा जागतिक विजय आहे. भारतीय अर्थव्यवस्थेने जागतिक निर्यातीच्या क्षेत्रात ऐतिहासिक झेप घेतली. ताज्या आकडेवारीनुसार, भारताच्या निर्यातीत तब्बल २४.४० टक्क्यांची लक्षणीय वाढ नोंदवली गेली. देशाची एकूण निर्यात ४.०७ लाख कोटींच्या घरात पोहोचली असून, एका वर्षात भारतीय निर्यातीमध्ये ८० हजार कोटी रुपयांची वाढ झाली. इंजिनिअरिंग, फार्मास्युटिकल्स, इलेट्रॉनिक वस्तू, मोबाईल फोन्स आणि रसायने यांसारख्या क्षेत्रांमध्ये, भारताने जागतिक पुरवठा साखळीत आपले भक्कम स्थान निर्माण केले आहे. अमेरिका किंवा युरोपसारख्या पारंपरिक बाजारपेठांपुरतीच ही मागणी मर्यादित नसून, आशियाई देशांच्या बाजारपेठांमध्ये भारतीय उत्पादनांची मागणी वाढली आहे. महामारीनंतर बहुराष्ट्रीय कंपन्यांनी 'चायना प्लस वन' हे जे जागतिक धोरण स्वीकारले, त्याचा सर्वाधिक फायदा भारताने घेतला.

आर्थिक आघाडीवरील यशासोबतच भारताने संरक्षण क्षेत्रात घेतलेली गरुडझेप, अभिमानास्पद अशीच. आर्मेनिया या युरेशियन देशात राष्ट्रीय




दिनानिमित्त एका लष्करी संचलनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये भारताच्या 'मेक इन इंडिया' शस्त्रास्त्रांचे झालेले प्रदर्शन, जगाचे डोळे दीपवणारे ठरले. या परेडमध्ये भारताची संपूर्णपणे स्वदेशी निर्मिती असलेली 'आकाश' ही हवाई संरक्षण क्षेपणास्त्र प्रणाली आणि 'पिनाक मल्टी- बॅरल रॉकेट लॉन्चर'सारख्या, अत्यंत प्रगत शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन करण्यात आले. एका सार्वभौम देशाच्या राष्ट्रीय लष्करी संचलनात भारताच्या शस्त्रास्त्रांना असे मानाचे स्थान मिळणे, हे भारतीय उत्पादनाच्या जागतिक यशाला मिळालेली पोचपावतीच ठरते. कारगिल युद्धात ज्या देशाने बाहेरील देशांकडे शस्त्रास्त्रांसाठी हात पसरले होते. तोच देश आज आधुनिक युद्धतंत्रातील संहारक शस्त्रे जगाला विकत आहे, हा प्रवास खरोखरच थक्क करणारा असाच. आर्मेनियाला केलेल्या शस्त्रनिर्यातीमागे, भारताची एक अत्यंत सुस्पष्ट, प्रगल्भ आणि आक्रमक नीती आहे. आर्मेनिया आणि अझरबैजान यांच्यातील लष्करी संघर्ष सर्वश्रुत आहे. या संघर्षात अझरबैजानला तुर्की आणि पाकिस्तान या दोन्ही भारतद्वेष्ट्या देशांचा उघड पाठिंबा आहे. तुर्की, अझरबैजान आणि पाकिस्तान या देशांनी मिळून एक अघोषित इस्लामिक लष्करी गट तयार केला असून, तो आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर काश्मीरच्या मुद्द्यावरून भारतीय हिताला सातत्याने बाधा पोहोचवण्याचा प्रयत्न करतो.

पाकिस्तानचे दहशतवादी आणि तुर्कीयेचे प्रगत ड्रोन्स अझरबैजानच्या मदतीला उभे राहिल्यावर, भारताने आर्मेनियाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्णय घेतला. 'आकाश' आणि 'पिनाक'सारखी विद्धवंसक शस्त्रे आर्मेनियाला देऊन, भारताने तुर्किये- अझरबैजान- पाकिस्तानच्या अभद्र आघाडीला कठोर इशारा दिला आहे. तुम्ही आमच्या शत्रूंना मदत कराल, तर आम्ही तुमच्या शत्रूंना अशी अद्ययावत शस्त्रे देऊ की तुमचे अस्तित्वच धोक्यात येईल. आर्मेनिया हा भारताचा संरक्षण क्षेत्रात सर्वांत मोठा ग्राहक झाला आहे. कोट्यवधी डॉलर्सची शस्त्रास्त्रे, भारत आज आर्मेनियाला आत्मविश्वासाने पुरवत आहे. भारताची ही प्रगल्भ संरक्षण मुत्सद्देगिरी आर्मेनियापुरती किंवा युरेशियापुरती मर्यादित नाही. चीनला त्याच्याच भाषेत आणि त्याच्याच अंगणात उत्तर देण्यासाठी, भारताने आपल्या 'ॲक्ट ईस्ट पॉलिसी'अंतर्गत आग्नेय आशियाई देशांसोबतही सामरिक संबंध कमालीचे दृढ केले आहेत.

दक्षिण चीन समुद्रात चीनच्या वाढत्या दादागिरीला चाप लावण्यासाठी, भारताने व्हिएतनामसोबत 'ब्रह्मोस सुपरसॉनिक क्रूझ' क्षेपणास्त्रांचा करार केला. व्हिएतनाम हा चीनचा पारंपरिक शत्रू. त्याला 'ब्रह्मोस'सारखे अस्त्र देऊन, भारताने चीनची डोकेदुखी वाढवली आहे. याशिवाय, इंडोनेशियासारख्या आणखी एका महत्त्वाच्या आशियाई देशासोबतही, शस्त्रास्त्रनिर्यातीची आणि विशेषतः 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्र देण्याची भारताची चर्चा आता अगदी अंतिम टप्प्यात आली आहे.

फिलीपिन्सने याआधीच भारताकडून 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्रे खरेदी करून, आपल्या नौदलात तैनात केली आहेत. हे सर्व देश चीनच्या विस्तारवादी धोरणाने त्रस्त असून, त्यांना आता भारताच्या रूपाने एक खंबीर, लोकशाहीवादी आणि विश्वासार्ह सामरिक पाठीराखा मिळाला आहे. 'मेक इन इंडिया' या मोहिमेची सुरुवात झाल्यावर, देशातील काही विरोधी पक्षांनी, तसेच संकुचित वृत्तीच्या नेत्यांनी आणि पाश्चात्य अर्थतज्ज्ञांनी याची खिल्ली उडवली. भारत कधीही शस्त्रास्त्र निर्यातदार देश बनू शकत नाही, असाच त्यांचा दावा होता. मात्र, आज भारताच्या अर्थव्यवस्थेने आणि संरक्षण निर्यातीने जो उच्चांक गाठला आहे, त्याने या सर्व टीकाकारांची तोंडे कायमची बंद केली आहेत. आर्थिक पातळीवर २४.४० टक्क्यांची निर्यातवाढ आणि संरक्षण पातळीवर आर्मेनियापासून व्हिएतनामपर्यंत पसरलेला भारतीय शस्त्रास्त्रांचा दबदबा, या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आज जगातील कोणतेही राष्ट्र भारताच्या साम (पान ४ वर)

# अन्यायी घराणेशाहीचा अस्तकाळ

राजकारण | प्रतिनिधी

पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसची सध्याची राजकीय वाताहत पाहता, 'अति तिथे माती' या म्हणीचा प्रत्यय आल्यावाचून राहत नाही. ममतादीदींचा राजकीय किल्ला आता पत्त्यांच्या बंगल्यासारखा ढासळू लागला आहे. पक्षात अंतर्गत बंडाळीने उग्ररूप धारण केले असून, पक्षामध्ये उभी फुट पडली आहे. तृणमूलचे नेते ऋतब्रत बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील आमदारांच्या एका गटाने घेतलेली आक्रमक भूमिका, राजकीय वर्तुळात भूकंप घडवणारी आहे. या आमदारांनी थेट विधानसभा अध्यक्षांची भेट घेत, वेगळा गट स्थापन करण्याची मागणी केली. त्याला विधानसभा अध्यक्षांनी मान्यता दिली आहे. तृणमूल काँग्रेस पक्षाच्या निवडणूक चिन्हावर आणि पक्षावरही ते दावा ठोकणार आहेत. महाराष्ट्रात ज्याप्रमाणे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मूळ पक्षावरून सत्तासंघर्ष झाला, अगदी तशीच स्थिती पश्चिम बंगालमध्ये निर्माण झाली आहे. एकहाती सत्ता गाजवणार्या आणि स्वतःला लोकशाहीच्या 'तारणहार' म्हणवणार्या ममता बॅनर्जींसाठी, हा त्यांच्या राजकीय कारकिर्दीतील सर्वांत मोठा आणि अनपेक्षित धक्का!

या बंडाची तीव्रता किती मोठी आहे हे धक्कादायक आकड्यांवरून स्पष्ट होते. पक्षातील वाढता अंतर्गत वाद शमवण्यासाठी आणि आमदारांची निष्ठा तपासण्यासाठी, ममतादीदींनी नुकतीच आमदारांची एक तातडीची बैठक बोलावली होती. पण, या बैठकीला दिसलेले चित्र तृणमूलच्या विनाशाची नांदी होते. पक्षाच्या एकूण ८० आमदारांपैकी, तब्बल ५९ आमदारांनी या महत्त्वपूर्ण बैठकीकडे पाठ फिरवली. मूठभर आमदार दीदींसोबत उभे राहिले. लोकशाहीत आकड्यांना सर्वाधिक महत्त्व असते. सध्या आकडे अत्यंत सुस्पष्टपणे सांगत आहेत की, ममता बॅनर्जी यांनी पक्षावरील आपले नियंत्रण पूर्णपणे गमावले आहे. ज्या नेत्याच्या एका शब्दावर संपूर्ण पक्ष कोणे एकेकाळी चालत असे, त्याच नेत्याच्या हाकेला आमदारांनी साधी 'ओ' दिलेली नाही. ६० आमदारांची गैरहजेरी हाही दीदींच्या एकाधिकारशाही कार्यपद्धतीविरुद्ध, आणि पक्षातील घराणेशाहीविरुद्ध धुमसणाऱ्या ज्वालामुखीचा स्फोट ठरला आहे. असा प्रश्न साहजिकच पडतो की, डाव्यांची ३४ वर्षांची जुलमी सत्ता उलथवून टाकणाऱ्या आणि सामान्य माणसाचा आवाज बनून सत्तेत आलेल्या ममतादीदींवर आज ही वेळ का आली? याचे उत्तर त्यांच्याच गेल्या दशकातील राजकीय वाटचालीत दडलेले आहे. तृणमूल काँग्रेसचा कारभार म्हणजे भ्रष्टाचार, टोकाचा राजकीय हिंसाचार आणि दडपशाही असे एक भयावह समीकरण बनले होते. शिक्षक भरती घोटाळा, शारदा चिटफंड, रेशन घोटाळा आणि कोळसा- तस्करी अशा एकापेक्षा एक मोठ्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये, तृणमूलचे दिग्गज मंत्री थेट तुरुंगात आहेत. संदेशखालीसारख्या भयंकर घटनांनी तर संपूर्ण देश हादरला. जिथे महिलांच्या अब्रूचे राजरोसपणे धिंडवडे काढले गेले आणि सत्ताधारी पक्षाचे गुंडच पोलिसांच्या संरक्षणात मोकाट फिरत होते. सामान्य माणसाला जगणे कठीण झाले असताना, पक्षातील नेते मात्र खंडण्या आणि भ्रष्टाचाराच्या माध्यमातून संपत्ती गोळा करण्यात मग्न होते. प्रशासनावरील पकड ढिली झाली आणि गुंडगिरीला राजाश्रय मिळाला. या सर्व प्रकारांमुळे जनतेत प्रचंड रोष निर्माण झाला होता. भ्रष्टाचाराच्या पैशांचे डोंगर जेव्हा नेत्यांच्या घरातून जप्त होऊ लागले, तेव्हा जनतेचा तृणमूलवरील विश्वासच पूर्णपणे उडाला. स्थानिक आमदारांना आपल्या मतदारसंघात फिरणेही मुश्कील झाले. त्यातच पक्षाची सर्व सूत्रे अभिषेक बॅनर्जी यांच्या हातात एकवटू लागल्याने, पक्षात अनेक दशके काम केलेल्या नेत्यांमध्ये प्रचंड अस्वस्थताहोती. आपल्या राजकीय अस्तित्वालाच धोका निर्माण झाल्याचे पाहून, या आमदारांनी आता स्वतःचा मार्ग शोधण्यास सुरुवात केली. या संपूर्ण राजकीय-नाट्यात भारतीय जनता पक्षाची भूमिका अत्यंत महत्त्वाची, परिपक्व आणि धोरणात्मक राहिली. साधारणपणे एखाद्या सत्ताधारी पक्षात फूट पडते, तेव्हा विरोधी पक्ष त्यांना आपल्यात सामावून घेण्यासाठी पायघड्या घालतो. मात्र, बंगालमध्ये भाजपने एक अत्यंत धाडसी आणि स्पष्ट भूमिका घेतली. तृणमूल काँग्रेसमधून बाहेर पडणाऱ्या कोणासाठीही, भाजपचे दरवाजे पूर्णपणे बंद असल्याचे पक्षाच्या नेतृत्वाने स्पष्ट केले. भाजपची ही भूमिका त्यांच्या वैचारिक स्पष्टतेचे दर्शन घडवणारी अशीच. तृणमूलचे बहुतांश नेते हे कोणत्या ना कोणत्या भ्रष्टाचारात किंवा हिंसक कारवायांमध्ये अडकलेले आहेत. अशा कलंकित नेत्यांना पक्षात घेऊन, भाजपला स्वतःची स्वच्छ प्रतिमा मलिन करायची नाही. त्याशिवाय, बंगालमध्ये भाजपच्या हजारो निष्ठावान कार्यकर्त्यांनी प्राणाची आहुती देऊन, तृणमूलच्या गुंडांचा रक्तरंजित संघर्ष झेलून, राज्यात पक्ष उभा केला आहे.

**पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जींच्या हुकूमशाहीला मोठा हादरा बसला असून, तृणमूल काँग्रेस आता उभ्या फुटीच्या उंबरठ्यावर आहे. दीदींनी बोलावलेल्या बैठकीकडे ६० आमदारांनी पाठ फिरवली असून, बंडखोरांनी मूळ पक्षावर दावा ठोकण्याची तयारी केली आहे. विशेष म्हणजे, भाजपने या बंडखोरांसाठी आपले दरवाजे पूर्णपणे बंद ठेवले आहेत.**




आता तृणमूलच्या नेत्यांना पक्षात प्रवेश दिला, तर ते त्या प्रामाणिक कार्यकर्त्यांवर घोर अन्याय केल्यासारखे होईल. त्यापेक्षा भ्रष्ट तृणमूल काँग्रेसला त्यांच्याच अंतर्गत संघर्षात संपू देणे आणि स्वतःचा पाया अधिक भक्कम करणे, हा भाजपच्या 'चाणक्य रणनीती'चा भाग ठरणार आहे. भाजपने घेतलेली ही तत्त्वनिष्ठ भूमिका भविष्यात त्यांना निश्चितच मोठा राजकीय फायदा मिळवून देईल. तृणमूल काँग्रेसची आजची अवस्था ही देशातील सर्व प्रादेशिक पक्षांसाठी धोयाची घंटा आहे. पक्ष एखाद्या कुटुंबाची किंवा व्यक्तीची खासगी मालमत्ता बनतो, तेव्हा त्याचा असाच दारुण अंत होतो. ममता यांनी लोकशाहीच्या मार्गाने सत्ता मिळवली. पण, सत्तेत आल्यावर हुकूमशहासारखे वर्तन केले. विरोधकांचा आवाज हिंसेने दडपणे आणि भ्रष्टाचार्यांना उघडपणे पाठीशी घालणे, याचीच फळे आता त्यांना भोगावी लागत आहेत. राष्ट्रीय पातळीवर पंतप्रधानपदाचे स्वप्न पाहणार्या ममता बॅनर्जी यांना, आता स्वतःचे घर सांभाळणेही कठीण झाले आहे. ६० आमदारांचे हे बंड पश्चिम बंगालच्या राजकीय मुक्तीची सुरुवात ठरली आहे. ऋतब्रत बॅनर्जी आणि त्यांच्या समर्थक आमदारांनी उचललेले हे पाऊल, तृणमूल काँग्रेस नावाच्याराजकीय महालाचे शेवटचे खांब पाडणारे ठरणार आहे. भाजपचे दरवाजे बंद असल्याने, आता या बंडखोरांना स्वतःच्या ताकदीवरच उभे राहावे लागेल. पश्चिम बंगालचे राजकारण एका नव्या आणि निर्णायक पर्वात प्रवेश करत असून, ममतादीदींच्या राजकीय कारकिर्दीचा अस्तकाळ सुरू झाला आहे, यावर या घटनेने शिक्कामोर्तब केले आहे.

राष्ष्टरक्षा हेमंत महाजन



# बांगलादेशी घुसखोरी : देशासमोरील गंभीर आव्हान

ममता बॅनर्जी यांच्या सरकार काळात, पश्चिम बंगाल राज्य बांगलादेशी घुसखोरीचे प्रमुख प्रवेशद्वार झाले. मात्र, सत्ताबदलानंतर आता सीमासुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी आणि अवैध बांगलादेशी घुसखोरांविरोधात कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीने, व्यापक मोहिमा हाती घेण्यात आल्या आहेत. यामध्ये केवळ घुसखोरी रोखण्यावरच भर न देता, देशात आधीपासूनच असलेल्या अवैध बांगलादेशींचा शोध घेऊन, त्यांच्यावरही कारवाई सुरू झाली आहे. यामुळे नजीकच्या भविष्यात भारतातील अवैध घुसखोरांची संख्या कमी होण्याचीही आशा आहे. भारतातील या अवैध घुसखोरीचा देशाच्या राष्ट्रीय सुरक्षा, सामाजिक स्थैर्य, लोकसंख्येचे संतुलन, निवडणूक व्यवस्था आणि गुन्हेगारीवर दूरगामी परिणाम होत आहे. बांगलादेशच्या निर्मितीनंतर त्या देशातून, मोठ्या प्रमाणावर स्थलांतर सुरू झाले. पुढील काही दशकांतच, या स्थलांतराने संघटित घुसखोरीचे स्वरूप धारण केले.

**स्थलांतरणाचे लोण देशातील महानगरांपर्यंत:**

भारत-बांगलादेशमधील सीमा अत्यंत गुंतागुंतीची अशीच. या सीमावर्ती भागांमध्ये नद्या, दलदली, जंगल क्षेत्र, शेती आणि घनदाट लोकवस्ती असल्यामुळे, सीमेची सुरक्षा हा प्रश्न अधिकच कठीण होतो. या परिस्थितीचाच फायदा घेत, मानवी-तस्करी करणाऱ्या टोळ्यांनी या भागामध्ये मोठे नेटवर्क उभे केले आहे. बांगलादेशातील आर्थिक स्थिती, बेरोजगारी, लोकसंख्येचा वाढता दबाव आणि भारतातील रोजगाराच्या वाढत्या संधींमुळे, बांगलादेशी नागरिकांनी भारतात घुसखोरीचा मार्ग स्वीकारला. कालांतराने ही घुसखोरी सीमावर्ती राज्यांपुरतीच मर्यादित न राहाता मुंबई, पुणे, दिल्ली, हैदराबाद आणि बंगळुरूसारख्या देशातील महानगरांपर्यंतही पोहोचली. घुसखोरीच्या या गंभीर प्रश्नाकडे अनेकांनी, दीर्घकाळ राजकीय आणि मतपेढीच्या दृष्टिकोनातूनच पाहिले. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने याकडे पूर्ण दुर्लक्ष झाले. परिणामी, देशातील काही भागांमध्ये, या घुसखोरांना मतदार म्हणूनही संरक्षण मिळाले. देशाचे 'सीमासुरक्षा दल'लाही बांगलादेश सीमेवरून होणारी ही घुसखोरी थांबवण्यामध्ये, सातत्याने अपयशाचा सामना करावा लागला आहे. अनेक ठिकाणी बनावट आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, रेशनकार्ड आणि इतर कागदपत्रे सहज मिळू लागल्यामुळे, घुसखोरांना भारतात स्थायिक होणे अधिकच सोपे झाले.

**सीमाभागात कुंपण-उभारणीचे काम वेगाने सुरू:**

कुंपण-उभारणीचे काम वेगाने सुरू आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत याच परिस्थितीत महत्त्वपूर्ण बदल दिसू लागला आहे. केंद्र सरकारने सीमासुरक्षेला राष्ट्रीय सुरक्षेचा अत्यंत महत्त्वाचा भाग मानून, अनेक कठोर उपाययोजना राबवण्यास सुरूवात केली. विशेषतः पश्चिम बंगालमध्ये, मोठ्या प्रमाणावर जमीन सीमासुरक्षा दलाकडे हस्तांतरित करण्यात आली आहे. तसेच, सुमारे ३०० ते ४०० किलोमीटरच्या सीमावर्ती भागामध्ये, कुंपण उभारणीचेही काम सुरू होणार आहे. पूर्वी जमिनीचे प्रश्न, स्थानिक विरोध आणि राजकीय अडथळ्यांमुळे ही कामे रखडली होती. आता दुहेरी कुंपण, फ्लड-लाईट्स, सीमा रस्ते, निरीक्षण मनोरे आणि आधुनिक इलेट्रॉनिक सेन्सर बसवण्यात येणार असून, यामुळे सीमावर्ती भाग अधिक सुरक्षित होणार आहे. तसेच, सीमासुरक्षा दलने रात्रीची गस्त, नदीमार्गावरील गस्त, ड्रोन निरीक्षण, 'थर्मल इमेजिंग' आणि 'स्मार्ट सर्व्हेलन्स' यंत्रणांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढवला असून, यामुळे घुसखोरीवरही प्रभावी नियंत्रण येत आहे.

**अवैध वसाहती हटवण्याची मोहीम :**

पश्चिम बंगालमध्ये आणखी एक महत्त्वाची कारवाई म्हणजे, अवैध वसाहती हटवण्याची मोहीम! अनेक वर्षांपासून सरकारी जमीन, रेल्वेची जमीन, वनखात्याची जमीन किंवा झोपडपट्ट्यांमध्ये अवैधरीत्या राहात असलेल्या बांगलादेशी नागरिकांची ओळख पटवून, त्या वसाहतीदेखील हटवण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. यामुळे भविष्यातील घुसखोरीला आळा बसण्यास मदत होणार आहे. कारण, एकदा का मोठ्या प्रमाणावर अवैध वस्ती वसली की, ती पुढे राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या संवेदनशील होते. यासोबतच, कागदपत्रे पडताळणी मोहिमादेखील, व्यापक प्रमाणात सुरू करण्यात आल्या आहेत.

पोलीस आणि गुप्तचर यंत्रणा बनावट आधारकार्ड, मतदानकार्ड, जन्म दाखले आणि रेशनकार्ड यांची तपासणी करत आहेत. अनेक ठिकाणी बनावट कागदपत्रे तयार करणाऱ्या टोळ्यांवर कारवाई झाली असून, ही एक अत्यंत महत्त्वाची बाब आहे. कारण, घुसखोरांचे सर्वांत मोठे संरक्षण म्हणजे, बनावट ओळखपत्रांचे जाळे होय. पकडलेल्या घुसखोरांसाठी स्वतंत्र 'डिटेन्शन सेंटर' निर्माण करण्यावरही भर दिला जात आहे. पूर्वी पकडलेले अनेक घुसखोर कायद्यातील त्रुटींमुळे किंवा अपुर्या व्यवस्थेमुळे पुन्हा घुसखोरी करत असत. आता मात्र त्यांची बायोमेट्रिक नोंद ठेवून, त्यांना बांगलादेशात परत पाठवण्याची प्रक्रिया अधिक काटेकोरपणे राबवण्यात येत आहे.

**महाराष्ट्रामध्येही मोठ्या प्रमाणावर कारवाई :**

महाराष्ट्रामध्येही यावर मोठ्या प्रमाणात कारवाई सुरू आहे. महाराष्ट्राची सीमा बांगलादेशाशी लागून नसली, तरी रोजगाराच्या प्रचंड संधींमुळे अनेक घुसखोरांनी येथे स्थायिक होण्याचा प्रयत्न केला आहे. विशेषतः मुंबई, पुणे यांसारख्या शहरांमध्ये बांधकाम, लघुउद्योग, हॉटेल व्यवसाय, वाहतूक आणि घरगुती कामांमध्ये स्वस्त मजुरांच्या असलेल्या मोठ्या मागणीमुळे, घुसखोरांचे जाळे वाढले आहे. महाराष्ट्रातील पोलिसांनी आता झोपडपट्ट्या, बांधकाम साईट्स, कामगार वस्त्या आणि भाड्याच्या घरांमध्ये मोठ्या प्रमाणावर पडताळणी मोहीम सुरू केली आहे. बनावट आधारकार्ड, पॅनकार्ड आणि मतदानकार्ड तयार करणार्या टोळ्यांवरही कारवाई केली जात आहे. याशिवाय, बायोमेट्रिक माहिती संकलन, फेस रेकग्निशन यांचा एकत्र 'डेटाबेस' वापरून, पुन्हा होणारी घुसखोरी रोखण्याचाही प्रयत्न सुरू आहे. अनेक वेळा अवैध स्थलांतराच्या मार्गांचा वापर मानवी-तस्करी, अमली पदार्थांची तस्करी, बनावट चलन आणि दहशतवादी नेटवर्ककडूनही केला जातो. सीमावर्ती जिल्ह्यांमधील लोकसंख्येतील बदलांमुळे, मोठ्या प्रमाणात सामाजिक तणाव निर्माण झाला आहे. काही दहशतवादी संघटना, अशा अवैध नेटवर्कचा वापर 'लॉजिस्टिक सपोर्ट'साठी करत आहे. अजूनही अनेक मोठी आव्हाने कायम आहेत. संपूर्ण सीमा कुंपणबंद करणे अद्याप बाकी असून, नदीमार्गावरील सीमा नियंत्रण मजबूत करणेही आवश्यक आहे. यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांमधील समन्वय अधिक वाढवणे गरजेचे आहे. तसेच संपूर्ण देशासाठीची 'अवैध परदेशी नागरिक डेटाबेस'ची निर्मितीही काळाची गरज आहे.

**घुसखोरांना मदत करणाऱ्या संपूर्ण 'इकोसिस्टम'वरच कारवाईची गरज :**

शिवाय, घुसखोरांना मदत करणाऱ्या संपूर्ण 'इकोसिस्टम'वरच कारवाई होणे गरजेचे आहे. बनावट कागदपत्रे तयार करणारे दलाल, भ्रष्ट अधिकारी, मानवी-तस्कर आणि पडताळणी न करता रोजगार देणारे नियोक्ते यांच्यावरही कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. सर्व भाडेकरू आणि कामगारांचीही, पोलीस पडताळणी अनिवार्य करणे आवश्यक झाले आहे. भारताने सीमासुरक्षेमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन, उपग्रह निरीक्षण, स्मार्ट फेन्सिंग आणि अत्याधुनिक सर्व्हेलन्स यंत्रणांचा अधिक व्यापक वापर वाढवायला हवा. तसेच, बांगलादेशसोबत प्रभावी राजनैतिक संवाद कायम ठेवून, जलद निर्वासन प्रक्रिया आणि संयुक्त गस्तीवर भर देणेही आवश्यक आहे.



बांगलादेशी घुसखोरीचा प्रश्न हा भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी, अत्यंत संवेदनशील आणि दीर्घकालीन परिणाम करणारा विषय आहे. मात्र, सध्या राबविण्यात येणार्या उपाययोजना पाहता, भारत आता या समस्येकडे अधिक गंभीरतेने आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पाहत असल्याचे स्पष्ट दिसते. जर या उपाययोजना सातत्याने कठोरपणे राबवल्यास; भविष्यात अवैध घुसखोरी मोठ्या प्रमाणावर नियंत्रित करणे शय होईल.

**अजून काय करावे?**

मोठ्या शहरांमध्ये जिथे बांगलादेशी घुसखोर वास्तव्यास आहेत, त्या भागांतील प्रत्येक पोलीस ठाण्यात ६५ ते ७५ समर्पित तपास अधिकारी नियुक्त करावेत. यासाठी राज्यातील लाखो निवृत्त पोलीस कर्मचार्यांचा, प्रभावीपणे उपयोग करता येऊ शकतो. तपास अधिकारी, गुप्तचर यंत्रणांचे अधिकारी, बंगाली भाषेचे तज्ज्ञ आणि स्थानिक परिस्थितीची माहिती असलेल्या नागरिकांचे, संयुक्त विशेष पथक तयार करणेही उपयुक्त ठरेल. तसेच, संबंधित खटल्यांचा निकाल सात ते दहा दिवसांत लागणे आवश्यक आहे. यासाठी विशेष फास्ट-ट्रॅक न्यायालये किंवा विशेष न्यायाधिकरणांची स्थापना करावी. तसेच, पोलिसांवरील ताण कमी करण्यासाठी इन-कॅमेरा ट्रायल्सची व्यवस्था करावी. घुसखोरांना जामीन देण्याची तरतूदच रद्द करावी.

अटकेतील सर्व घुसखोरांना खटला सुरू असताना, विशेष छावण्यांमध्ये ठेवण्याची व्यवस्था करावी. शोधमोहीम, अटक आणि निर्वासनाशी संबंधित सर्व कारवाया अत्यंत गोपनीय पद्धतीने पार पाडणेही महत्त्वाचे ठरणार आहे. पत्रकार परिषद किंवा अनावश्यक सार्वजनिक प्रसिद्धी टाळावी.

(पान ६ वर)

---

पोरकी पोरं डॉ. तुषार सावरकर

# लहान खांद्यांवर मोठी जबाबदारी

सकाळची वेळ. घरात घाईगडबड सुरू असते. आई- वडील कामावर जाण्याच्या तयारीत असतात. एका कोपऱ्यात काही महिन्यांचं बाळ रडत असतं आणि त्याला शांत करण्याचा प्रयत्न करत असतं दहा-बारा वर्षांचं एखादं मूल. एका हाताने ते बाळाला मांडीवर घेतं, दुसऱ्या हाताने स्वतःची शाळेची बॅग भरतं. काही वेळाने आई- वडील बाहेर पडतात आणि घराची संपूर्ण जबाबदारी त्या लहान मुलाच्या खांद्यावर येते. त्यानंतर त्याचं दिवसाचं वेळापत्रक सुरू होतं- भावाला खाऊ घालणं, बहिणीला झोपवणं, दूध गरम करणं, घर सांभाळणं आणि वेळ मिळाला तर स्वतःचं शिक्षण.



भारतातील अनेक घरांमध्ये हे दृश्य इतकं सामान्य झालं आहे की, आपण त्याकडे समस्या म्हणून पाहणंच बंद केलं आहे. 'मोठं मूल आहे ना घरी', 'ताई आहे सांभाळायला', 'दादा बघतो सगळं' अशी वाक्यं सहजपणे उच्चारली जातात. परंतु या सहज वाटणाऱ्या वाक्यांच्या मागे हजारो मुलांचं हरवत जाणारं बालपण दडलेलं असतं. भारतात महिलांचा मोठा वर्ग असंघटित क्षेत्रात काम करतो. Periodic Labour Force Survey (PLFS) आणि International Labour Organization (ILO) च्या निरीक्षणानुसार असंघटित क्षेत्रातील कुटुंबांमध्ये औपचारिक लहळश्रवलरीश सुविधा अत्यंत मर्यादित आहेत. त्यामुळे घरातील मोठ्या मुलांवर लहान भावंडांची जबाबदारी टाकली जाते.

भारतात "sibling caregiving" या विषयावरील अधिकृत आकडेवारी मर्यादित असली, तरी National Time Use Survey (२०१९) स्पष्ट दाखवते की, मुली घरगुती आणि काळजीविषयक कामामध्ये मुलांच्या तुलनेत लक्षणीय अधिक वेळ घालवतात. यात लहान भावंडांची देखभाल हा मोठा भाग असतो. UNESCO आणि UNICEF च्या विविध अहवालांनुसार घरगुती जबाबदाऱ्या या मुलींच्या शिक्षणातील गळतीमागील महत्त्वाच्या कारणांपैकी एक आहेत. UDISE+ च्या आकडेवारीनुसार माध्यमिक स्तरावर मुलींचं शिक्षण अर्धवट सोडण्याचं प्रमाण अजूनही चिंताजनक आहे. बालपण म्हणजे मोकळेपणाने खेळणं, शिकणं, चुका करणं, हट्ट करणं आणि सुरक्षिततेच्या भावनेत वाढणं; पण अनेक मुलांसाठी बालपण म्हणजे जबाबदारी, काळजी आणि अकाली प्रौढत्व बनत चाललं आहे. विशेषतः आर्थिकदृष्ट्या कमकुवत, स्थलांतरित, असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या किंवा दोन्ही पालक नोकरी करणाऱ्या कुटुंबांमध्ये मोठ्या मुलांवर लहान भावंडांची जबाबदारी टाकली जाते. अनेक वेळा ही जबाबदारी इतकी मोठी असते की, त्या मुलांचं स्वतःचं आयुष्य मागे पडतं. ही समस्या केवळ गरिबीपुरती मर्यादित नाही. महानगरांमधील मध्यमवर्गीय कुटुंबांमध्येही हे वास्तव झपाट्याने वाढताना दिसत आहे.

आई-वडील दोघेही नोकरीत, शहरांमधील लांबचा प्रवास, वाढती स्पर्धा, संयुक्त कुटुंब व्यवस्थेचं विघटन आणि बालसंगोपनाच्या वाढत्या खर्चामुळे अनेक घरांमध्ये मोठ्या मुलांकडे 'घरातील दुसरा पालक' म्हणून पाहिलं जातं. काही मुलांना शाळेनंतर अभ्यासापेक्षा भावंडांच्या गृहपाठाची, जेवणाची किंवा देखभालीची चिंता अधिक असते. त्यांच्या वयाच्या इतर मुलांसाठी संध्याकाळ खेळण्याची वेळ असते; पण या मुलांसाठी ती जबाबदाऱ्यांची वेळ बनलेली असते. विशेषतः मुलींच्या बाबतीत ही परिस्थिती अधिक गंभीर आहे.

घरात मोठी मुलगी असेल, तर तिच्यावर लहान भावंडांची जबाबदारी आपोआप टाकली जाते. अनेक मुलींना खेळ, मैत्री, शिक्षण किंवा स्वतःच्या आवडींपेक्षा 'जबाबदार ताई' होण्याची अपेक्षा लहान वयातच पूर्ण करावी लागते. काही वेळा त्यांच्या शिक्षणात खंड पडतो, शाळा सुटते किंवा करीअरची स्वप्नं मर्यादित होतात. त्यामुळे त्या दुहेरी ओझं वाहतात- लिंगभेदाचं आणि अकाली जबाबदारीचं. या परिस्थितीकडे समाज अनेकदा सकारात्मक नजरेने पाहतो. 'लहानपणापासून जबाबदारी शिकली', 'कष्टाची सवय झाली', 'मोठं होण्यासाठी हे आवश्यक आहे' अशा शब्दांत त्याचं कौतुक केलं जातं. परंतु मानसशास्त्राच्या दृष्टीने पाहिल्यास ही स्थिती अनेक मुलांसाठी भावनिक ताण निर्माण करणारी असू शकते. सतत काळजी घेण्याची भूमिका निभावताना त्यांचं स्वतःचं भावविश्व मागे पडतं. काही मुलांमध्ये चिंता, चिडचिड, अपराधीपणा, एकाकीपणा किंवा आत्मविश्वासाचा अभाव दिसून येतो. कारण ते स्वतः अजून मुलं असताना त्यांच्याकडून प्रौढासारखी अपेक्षा केली जाते. मानसशास्त्रात याला अनेकदा "Parentification' असं म्हटलं जातं. म्हणजे मुलांवर पालकांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या लादल्या जाण्याची प्रक्रिया. काही वेळा ही मुलं भावनिकदृष्ट्या लवकर प्रौढ होतात, पण आतून असुरक्षित राहतात. त्यांना स्वतःच्या भावना व्यक्त करणं कठीण जाऊ शकतं. कारण त्यांना 'समजूतदार' राहण्याची अपेक्षा केली जाते. या जबाबदाऱ्यांचा मुलांच्या शिक्षणावरही परिणाम होतो. लहान भावंडांना सांभाळण्यासाठी शाळा बुडवणं, अभ्यासावर लक्ष केंद्रित न होणं किंवा परीक्षांमध्ये मागे पडणं ही सामान्य बाब बनते.

(पान ४ वर)

---



# रामा शिवा गोविंदा

कथा मो. बा. देशपांडे

वामनराव पांडे मोठ्या पदावरून निवृत्त झाले. तोवर दोन्ही मुले लग्नं होऊन मुंबई- पुण्याकडे स्थायिक झाले होते. वामनराव पत्नी तारासोबत आपल्या गृहगावी परत आले. तिथे त्यांचा वृक्षराईने नटलेला वडिलोपार्जित मोठा बंगला होता. आताशा वयो ानाने दगदग फारशी झेपत नसल्याने आहार-विहारावर बऱ्यापैकी बंधने आली होती. कुणीतरी दिमतीला आणि मदतीला हवे असं सारखं वाटायचं.

आपल्या शासन काळात प्रामाणिक कर्तव्यदक्ष आणि शिस्तप्रिय आणि सत्यप्रिय अधिकारी म्हणून त्यांची ख्याती होती. वामनरावांचा स्वभाव मुळातच काटेकोर शिस्तप्रिय असल्याने कुणी मदतनीस ठेवला तरी तो टिकून राहणे अवघडच! त्यामुळे त्यांनी अनेक माणसे पडताळून अखेरीस रामा नावाचा एक घरगडी नियुक्त केला. रामा गडी हा दूर पिंपळखुटा नामक खेड्यात राहणारा होता. केवळ नोकरीसाठी तो शहरात आला होता. रामा आपल्या कामात वाकबगार असून हरकाम्या होता. वामनरावांनी कामावर ठेवताना त्याला बजावून सांगितलं, "हे बघ रामा, तुझी येथे राहण्याची जेवणाची सोय होईल. तू आपुलकीने राहा. फक्त एक महत्त्वाची गोष्ट सांगून ठेवतो... मला खोटारडेपणा अजिबात आवडत नाही. तू येथे मजेत काम कर. तुला काय हवे नको ते आम्ही बघू, पण खोटेपणा मी अजिबात खपवून घेणार नाही." रामाने मान डोलावली. रामाने आपल्या कामातील अंगभूत हुशारी, मेहनत आणि प्रामाणिकपणाने उभयतांचे मन जिंकले. वामनराव आणि तारा दोघेही रामाच्या कामावर मनो न खूश होते. असेच एक वर्ष पार पडले. एकदा रामा म्हणाला, "साहेब, मला दहा दिवसाची सुट्टी हवी आहे. जरा घरी जाऊन यावं म्हणतो. खूप दिवसात गावाकडे गेलो नाही! जरा महत्त्वाचं काम आहे. शिवाय आई-वडिलांची भेट घ्यायचं फार दिवसांपासून मनात आहे."

"छे! छे!! कसं शक्य आहे? मग इथली कामं कोण करणार? आमची इथली कामे खोळंबणार नाही का? तू जरा आमचाही विचार कर की रामा..." रामा थोडा वेळ डोके खाजवीत इकडे तिकडे बघत विचार करीत म्हणाला "साहेब असं करतो, माझा एक लहान भाऊ आहे. त्याचं नाव शिवा आहे. तो रिकामाच आहे. तो येईल येथे दहा दिवस. तो पण चांगला काम करणारा गडी आहे. म्हणजे कसं बघा, माझं काम होईल आणि तु चाही खोळंबा होणार नाही." आता अन्य पर्याय दृष्टिपथात नसल्याने वामनरावांनी त्याचे म्हणणे मान्य केले. लहान भाऊ शिवा लगेच कामावर रुजू झाला. शिवासुद्धा रामाप्रमाणेच हुशार आणि प्रामाणिक असल्याने काही अडचण आली नाही. सुट्टी संपल्यावर रामा परत आला आणि शिवा आपल्या गावी परत गेला. त्यानंतर काही महिन्यांनी एकदा अचानक रामा घाईघाईने निघून गेला. आठ दिवसांनी परत आला तेव्हा वामनरावांनी त्याला खडसावून विचारले, "रामा अरे, न सांगता असा अचानक कुठे निघून गेलास? कुठे गेला होतास? खरं सांग, मला खोटेपणा अजिबात आवडत नाही." "साहेब, माझ्या लहान भावाला रस्त्यावर ट्रकने धडक दिली. त्या भीषण अपघातात त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला असं कळलं म्हणून मी तातडीने गावाला निघून गेलो... त्यावेळी माझं डोकं अजिबात काम करत नव्हते. मला काय करावं ते सुचेना. झालेल्या चुकीबद्दल मी माफी मागतो!" रामा खूपच भावनिक होऊन बोलत होता. वामनरावांना त्याचा तो लहान भाऊ शिवा आठवला आणि इतका चांगला हट्टाकट्टा तरुण माणूस असा अचानक मरून गेला म्हणून त्यांना मनस्वी वाईट वाटले. रामाने सुट्टीचे सांगितलेले कारण वाजवी म्हणजे जेन्युइन वाटल्यामुळे अधिक काही न बोलता त्यांनी उदार मनाने रामाची चूक माफ केली. त्यानंतर दोन-तीन महिन्यांनी एके दिवशी अचानक गावाकडचा काही निरोप घेऊन रामाकडे एक जण आला. वामनरावांनी दार उघडून बघितले तर तो त्याचा लहान भाऊ होता. "अरेच्चा! रामा तर सांगत होता की, हा मरण पावला म्हणून. म्हणजे हे तद्दन खोटे होते तर..!" वामनराव आश्चर्याने विचार करू लागले. ते लगेच काही बोलले नाही, पण त्यांना मनातून रामाच्या खोटारडेपणाचा खूप राग आला. रामा येतात त्यांनी त्याला चांगले फैलावर घेतले. "रामा, आज तू माझ्या मनातून पार उतरला आहेस. तू माझा विश्वासघात केला आहेस. तुला माहीत आहे मला खोटारडेपणाची फार चीड आहे. तरीसुद्धा आपल्या चुकीच्या कृत्याचे समर्थन करण्यासाठी तू माझ्याशी चक्क खोटं बोललास." "साहेब, मी काय म्हणतोय - ते ऐकून तर घ्या, तु चा गैरसमज होतोय!" "गैरसमज? मला मूर्ख समजतोस की काय? मला अजिबात काहीही ऐकून घ्यायचं नाही. एक शब्द पुढे बोलू नकोस. मी हे अजिबात खपवून घेणार नाही. मी तुला आधीच ताकीद दिली होती. तू ताबडतोब इथून चालता हो!"

वामनरावांची कानशिले लालबुंद झाली होती आणि ओठ थरथरत होते. वामनरावांनी फार काही न बोलता त्याचा पैशाचा हिशोब करून या कारणाने रामाला त्वरित नोकरीवरून काढून टाकले. आता या गोष्टीला दहा-बारा वर्षे उलटली. वामनराव आता सत्तरीच्या घरात पोहोचले होते. एकदा काही खरेदीनिमित्ताने वामनराव हमरस्त्यावर बाजारहाट करीत फिरत असताना अचानक एका मोठ्या दुकानात गल्ल्यावर बसलेला व्यापारी बघून वामनरावांना तो चेहरा ओळखीचा वाटला. थोडी विचारपूस करता त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. कारण गल्ल्यावर कामात गर्क असलेला तो मालक म्हणजे दुसरा कोणी नसून रामा होता. रामा काळासावळा असला, तरी पूर्वीपासूनच तरतरीत आणि हुशार होता आणि आता तर त्याच्या चेहऱ्यावर श्रीमंतीचं तेज विलसत होतं.

(पान ४ वर)

वळणावरच्या नोंदी — स्वाती काळे

# परतीच्या प्रवासात

जेतवनाला भेट देऊन फाहिआन श्रवस्ती नगरीकडे निघाले. अनेक पवित्र स्थळांना भेट देऊन त्यांनी कपिलवस्तूकडे प्रयाण केले. नेपाळची कपिलवस्तू बुद्धकाळात भारताचा अविभाज्य भाग होती. ही नगरी फाहिआनला भकास दिसली. शुद्धोधनाच्या राजवाड्यात बुद्ध आणि त्याच्या आईच्या प्रतिमा लावल्या होत्या. त्याच्या आईच्या गर्भात शिरताना शुभ्र हत्तीवर स्वार असलेला किंवा आजारी माणूस पाहून अतिशय दुःखी झालेल्या सिद्धार्थ गौतमाचे स्मरण म्हणून स्तूप उभारले होते.

लुंबिनी उद्यानामध्ये ज्या शालवृक्षाखाली राणीने गौतमाला जन्म दिला, तेथे अजूनही एक छोटेसे पवित्र तळे होते. पण वैभव लुप्त झालेल्या या पाटलिपुत्रात बांधलेल्या पहिल्या भव्य स्तुपाचाही उल्लेख फाहिआनने केलेला आहे.

पाटलिपुत्राहून फाहिआन मगध राजधानीत 'राजगृहा'ला पोचले. राजा बिंबिसार आणि त्याचा पुत्र अजातशत्रू यांच्या काळात या शहराची भरभराट झाली. पाटण्याहून १०० किलो मीटर अंतरावर डोंगराळ भागातले राजगीर म्हणजेच तेव्हाचे राजगृह. राजगीरजवळ 'गृद्धकूट' टेकडीजवळ गौतम बुद्धाने चिंतन केले आहे. टेकडीच्या टोकावर चढण्याअगोदर दक्षिणाभिमुख एक मोठी गुहा लागते. तेथे तासन्तास गौतम बुद्ध ध्यान लावून बसायचे.

तेथून जवळच्याच उत्तर-पश्चिम गुहेत त्यांचा पट्टशिष्य आनंद ध्यानस्थ बसायचा. जेव्हा 'मारा'ने हिंस्र गिधाडाचे रूप घेऊन आनंदला घाबरवण्याचा प्रयत्न केला तेव्हा बुद्धाने दिव्यशक्तीद्वारे जवळच्या खडकातून गुहेला आतून भोक पाडले आणि हात गुहेतून आत टाकून आनंदला आश्वासक थोपटले. फाहिआन म्हणाले, गिधाडाच्या पायाचे ठसे आणि गौतम बुद्धाने तयार केलेले भोक अजूनही दिसत आहेत. बुद्धाने आपले तत्त्वज्ञान जेथे सांगितले ते दालन भग्नावस्थेत उदासवाणे उभे होते. परंतु बुद्धाच्या अस्तित्वाच्या खुणा फाहिआनला क्षणोक्षणी भारतभूमीत जाणवल्या. फाहिआन गोष्ट सांगतात की, सम्राट अशोकाने एक नरक बांधला होता. त्यात एक भिक्षू तापलेल्या तेलाच्या कढईत पडला. पण त्या तेलातून वर कमळ उगवले आणि कमळावरील ध्यानस्थ भिक्षूला पाहून अशोकाचे मन बुद्धमार्गाकडे वळले. फाहिआनला 'गया' शहरात अस्वस्थ पोकळी जाणवली. बुद्धाने सात वर्षे स्वतःच्या शरीराला प्रचंड त्रास करून तेथे साधना केली होती.






नगरीत आता फक्त सर्वदूर भग्न अवशेष उरले होते. प्रत्येक नगरी स्वतःचे भाग्य घेऊन जन्माला येते, पण काही शतकांनंतर उरतात त्या फक्त युगपुरुषाच्या अंगावरील असंख्य जखमा. फाहिआन म्हणतात की, या नगरीत फिरताना सिंह आणि शुभ्र हत्तींच्या कळपांपासून सावध राहावे लागते. गौतम बुद्धांचे जेथे महापरिनिर्वाण झाले त्या कुशीनगरला आणि तेथून पुढे वैशालीला फाहिआन चालू लागले. याच कुशीनगरला उत्तरेकडे डोके ठेवून बुद्धाने देह त्यागला होता. वैशाली, लुंबिनी, राजगृह, वाराणसी, गया, रामग्राम ही सर्व गावे फाहिआनने डोळे भरून बघितली. वैशालीला 'महावनविहार' मध्ये बुद्ध राहिले होते.

'आम्रपाली' या गणिकेने वैशालीतच त्यांना 'आम्रवन' भेट दिले होते. फाहिआन यानंतर मगध देशाची राजधानी 'पाटलिपुत्र' येथे पायपीट करीत आले. 'पाटलिपुत्र' म्हणजे सध्याचे 'पाटणा' शहर. नक्षीदार आणि कोरीव शिल्पकलेमुळे येथील जुना राजवाडाही उठावदार दिसत होता. ही दिव्य कलाकृती बनविण्यासाठी ईश्वराचे दूतच पृथ्वीवर आले असतील; फाहिआन विचारात पडले. 'पाटलिपुत्र' विद्येचे माहेरघर होते. तेथे महायान आणि हीनयान पंथाचा भव्य संगम होता. अनेक विद्वान श्रमण येथे अध्ययन करीत होते. 'मंजुश्री' नावाचे अध्यापक तेव्हा प्रसिद्ध होते. फाहिआन म्हणतात, येथील लोक अतिशय समृद्ध आणि दयाळू आहेत. प्रत्येक वर्षाच्या दुसऱ्या महिन्यात आठव्या दिवशी येथे रथयात्रा निघते. गौतम बुद्ध, बोधिसत्व आणि विविध देवदेवतांच्या प्रतिमा रंगवून निघणारी भव्य रथयात्रा बघत राहावीशी वाटते. धुपदीप आणि फुलांनी रस्त्यांवर सुगंध दाटतो. वाद्यवृंदासोबत सुरांच्या मखमली लकेरी आकाशापर्यंत भिडतात. व्यापारी दानधर्म करतात. वैद्य मोफत उपचार करतात. माणसाच्या हाडांमध्ये ८४ हजार अणू आहेत. सम्राट अशोकाने गौतम बुद्धांच्या प्रत्येक अणूवर स्तूप बांधण्याचा संकल्प केला होता. या ८४ हजार स्तुपांपैकी

एका गुहेत शिरून बुद्ध म्हणाले, जर मी खरोखरीच 'बुद्ध' होणार असेल तर मला दिव्य संकेत मिळाला पाहिजे. अचानक त्याला खडबडीत भिंतीवरती तीन फुटांहून मोठी बुद्धाची सावली दिसली आणि त्याची खात्री पटली, 'बुद्ध' होण्याचा क्षण जवळ आला आहे. खडतर तपश्चर्येनंतर सुजाताने त्याला जेथे लापशी दिली होती ती जागा त्यांनी मनोभावे पाहिली. ज्ञानप्राप्तीची घटना फाहिआनने बारीक तपशिलासह लिहिली आहे. यासाठी त्यांचे पुस्तक मुळातूनच वाचायला हवे.

मूळ धर्मग्रंथ गोळा करून चीनला प्रयाण करायचे हे फाहिआनचे ध्येय होते. यासाठी पुन्हा ते पाटलिपुत्रमध्ये आले. बहुतेक सर्व मठांमध्ये त्याकाळी मौखिक शिक्षणावर भर होता. परंतु अखेरीस फाहिआनची तपश्चर्या कामी आली. गंगेच्या काठावर एका महायानी मठात त्यांना विनयपीटकाची परिपूर्ण प्रत मिळाली.

चीनमधून निघून आता सहा वर्षे झाली होती. पण मिळालेल्या बहुमोल ग्रंथांच्या नकला करण्यात त्यांची पुढची सहा वर्षे गेली. त्यांच्यासोबत असलेले भिक्षू ताओ चिंग यादरम्यान भारतमय झाले होते. त्यांनी येथेच राहण्याचा निर्णय घेतला. पण फाहिआन विशिष्ट ध्येय मनी ठेवून भारतात आले होते आणि हा हेतू सफल झाल्यामुळे त्यांना पुन्हा चीनचे वेध लागले होते. मूळ धर्मग्रंथ, बुद्धाचे काही अवशेष आणि भारतवासीयांचे आत्यंतिक प्रेम घेऊन फाहिआन गंगेच्या मुखाशी असलेल्या 'ताम्रलिप्ती'ला घटकाभर विश्रांती घेऊन पुढे बोटीने १४ दिवसांचा कठीण प्रवास करून श्रीलंकेला पोहोचले. 'ताम्रलिप्ती' म्हणजे पश्चिम बंगालच्या मिदनापूर जिल्ह्यातले 'तामलूक' हे गाव.

श्रीलंकेतही फाहिआनने दोन वर्षे धर्मग्रंथांचा अभ्यास केला. 'महिषासक' पंथाची विनयपीटकेची प्रत त्यांना येथे मिळाली. अनेक नवीन धर्मग्रंथांची भाषांतरे करून आता चीनला जाण्यासाठी त्यांना फार ओढ लागली होती. ते एक व्यापारी जहाज होते. जहाजावर जवळपास २०० माणसे होती. भले मोठे सामान घेऊन फाहिआन जहाजावर चढले. प्रवास व्यवस्थित सुरू होता. पण दोन दिवसानंतर समुद्रावर वादळ घोंगावू लागले. पाण्याच्या रेट्यामुळे जहाजाला चीर पडली आणि पाणी वेगाने आत येऊ लागले. फाहिआनने स्वतःचे सामान समुद्रात लोटून दिले. पण भारतातून आणलेल्या मूळ ग्रंथांना त्यांनी हृदयाजवळ बिलगून ठेवले होते. हे वादळ १३ दिवसांनी शमले आणि एका दुर्ग बेटाच्या किनाऱ्याला बोट लागली. जहाजाची डागडुजी झाली, पण फाहिआनच्या दुर्दैवाचा फेरा अजूनही संपला नव्हता. पुन्हा एकदा ही बोट रौद्र वादळात सापडली. जवळपास तीन महिने घोंगावणाऱ्या वादळात हेलकावे खात बोट आता पूर्ण भरकटली होती. शेवटी प्रवासी कसेबसे जावा बेटावर पोहोचले. फाहिआन पार कोलमडून गेले होते. जावा बेटावरच त्यांनी तब्बल पाच महिने मुक्काम केला आणि पुन्हा बोटीवर चढण्याची हिंमत दाखवली; पण त्यांचे नशीबच फुटके होते.

३५ दिवसांच्या प्रवासानंतर हे जहाजही प्रचंड वादळात सापडले. सोबत पावसाचा तुफान माराही सुरू होता. प्रवाशांना वाटू लागले, सोबतीचा भिक्षूच अपशकुनी आहे. ज्या बोटीत बसतो तेथे संकटे आलीच म्हणून समजा. इतर प्रवाशांनी ठरवले की, पुढच्या बंदरावर याला तात्काळ उतरवून द्यायचे. पण फाहिआनच्या चिनी आश्रयदात्याने सर्व प्रवाशांना संयम ठेवायला सांगितला आणि जर फाहिआनला त्रास दिला तर चिनी सम्राटाकडे त्यांची तक्रार करण्याची धमकी दिली.

तब्बल चार महिन्यांनी फाहिआनचे पाय कॅन्टन (सध्याचे गोन्झाऊ) ला लागले. प्रांताच्या मुख्य अधिकाऱ्याने चीनच्या भूमीत फाहिआनचे सहर्ष स्वागत केले. जवळपास १५ वर्षे कधी पायी, कधी बोटीतून, कधी खडकाळ टेकड्यांवरून फाहिआन चालतच होते.

जिवाची पर्वा न करता जपून आणलेले मूळ धर्मग्रंथ त्यांनी अखेरीस 'नानकिंग' मठात सुखरूप पोहोचवले. फाहिआनसारख्या वेड्या प्रवाशांनीच तर अवघे जग भारताच्या तळहातावर आणून ठेवले!

---

आनंद स्पदंन — डॉ. अविनाश मोहरील

# अनौपचारीक गोडवा

मी तुला अविनाश म्हणेन आणि तू मला शैला म्हण' असे वाक्य एक महिला माझ्याशी आयुष्यात पहिल्यांदा संवाद साधताना व कोणतीही पूर्व ओळख नसताना बोलत असेल तर याला काय म्हणावे? माझ्या एका मैत्रिणीच्या सांगण्यावरून विद्यापीठामध्ये काही कामानिमित्त येणारी शैला संपूर्णपणे अपरिचित असलेल्या माझ्याशी अनौपचारिक पद्धतीने संवाद साधत होती की, मी चकित झालो.




शैलाच्या त्या संवादातील आपलेपणा व पटकन मैत्री करण्याचा स्वभाव मला फारच वेगळा भासला. काही लोकांना अशा प्रकारच्या अनौपचारिकतेची देणगीच असते. असे लोक समोरचा आपल्याशी कधी बोलेल, याची वाटच बघत नाही. पटकन संवाद साधून मोकळे होतात. या लोकांना कोणत्याही औपचारिकतेची गरज कधीच भासत नाही. अशी मंडळी लोकप्रिय असतात आणि त्यांना लोकांमध्येच वावरायला आवडतं. म्हणूनच या लोकांच्या या थेट, सरळ आणि स्पष्ट अनौपचारिक वागण्यात एक गोडवा असतो; जो औपचारिकते ध्ये राहूच शकत नाही. अनौपचारिकता ही काही वेळा मोठ्या माणसांची ओळखही बनलेली दिसते. नवी दिल्ली येथे जवाहरलाल नेहरू विद्यापीठात मी एका प्राचार्यांच्या कार्यशाळेला गेलो होतो. देशभरातून आम्ही २० प्राचार्य यासाठी पोहोचलो होतो. पहिल्या दिवशी आम्हाला सांगण्यात आले की, प्रथम सत्रास विद्यापीठाचे कुलगुरू हजर राहणार आहेत. आम्ही सर्वजण एका समारंभाच्या अपेक्षेत एका देखण्या खोलीत राऊंड टेबलभोवती बसलो होतो.

अचानक सुटाबुटातील एक गृहस्थ आम्ही बसलेल्या खोलीत येऊन बसले. आम्ही त्यांच्या येण्याने सावरतच होतो की ते म्हणाले, ''नमस्कार, मी या विद्यापीठाचा कुलगुरू आपल्या सर्वांचे स्वागत करतो.'' आम्हा सर्वांना कळलेच नाही की आम्ही काय ऐकले. आम्ही सर्व ताडकन उभे राहिलो. त्यांनी अगदी सहजपणे आम्हा सर्वांचा परिचय करून घेतला. छान बोलले. कोणताही पुष्पगुच्छ नाही, हारतुरे नाही, काही नाही... केवळ थेट अनौपचारिक संवाद जो सर्वात महत्त्वाचा होता. बोलणे आटोपल्यावर त्यांनी आमच्यासोबत रांगेत उभे राहून कँटीनवर जेवणही घेतले. आमच्या सोबतच्या सहवासात कुठेही औपचारिकतेच्या भिंती निर्माण न करता वावरण्याचा त्यांचा प्रयत्न अतिशय यशस्वी झाला. तेथील समन्वयकांकडून मला माहिती मिळाली की, त्या विद्यापीठात बहुतांश ठिकाणी अशाच प्रकारची अनौपचारिकता पाळली जाते. सर्व प्रकारच्या औपचारिक पद्धतींना फाटा देऊन केवळ शिक्षणविषयक कामांनाच प्राधान्य देण्याची त्यांची पूर्वापार पद्धत आहे. असे असले तरी नॅक या संस्थेद्वारे केल्या गेलेल्या मूल्यांकनात या विद्यापीठाला अत्यंत सुंदर गुण मिळाले आहेत व देशातील हे एक अत्यंत प्रतिष्ठित समजले जाणारे विद्यापीठ आहे. एकूणच काय? साधी सरळ व सोपी अनौपचारिक प्रक्रिया पाळूनही श्रेष्ठता प्राप्त होऊ शकते, याचे ते विद्यापीठ मूर्ति 'त उदाहरण आहे. अशाच प्रकारचे उदाहरण मला एका कार्यक्रमाच्या निमित्ताने अनुभवायला मिळाले. एका संस्थेच्या वतीने मला व्याख्यानासाठी बोलाविले होते. मंचावर केवळ मीच होतो. आयोजकांनी माझे शब्दसुनांनी (मला हा शब्द फार आवडतो) स्वागत केले. फोटोंना हार व दीपप्रज्वलन त्यांनी आधीच करून ठेवले होते. मोजक्याच शब्दात परिचय करून दिला. हा प्राथमिक उपचार केवळ दोनच मिनिटात आटोपून त्यांनी पुढचे ९० मिनिटे मला बोलण्यासाठी उपलब्ध करून दिली. माझ्या व्याख्यानाच्या समारोपानेच कार्यक्रमाचीही सांगता झाली. कोणतीही अतिरिक्त औपचारिकता न पाळता पार पडलेला तो कार्यक्रम मला मनापासून आवडला. अन्यथा बरेच वेळा कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात, संचालनात आणि अध्यक्षीय भाषणात पाऊण व्याख्यानाचा विषय आटोपून जातो व वक्त्यासाठी बोलायला काहीच उरत नाही. असे औपचारिक आक्रमण अनेक समारंभां ध्ये होताना आपल्याला आढळते. म्हणूनच की काय, एवढ्यात अनेक गाण्याच्या कार्यक्रमां धील निवेदक हा भाग गायक वगळायला लागलेत. अगदी ज्येष्ठ गझल गायक हरिहरन देखील सध्या आपल्या कार्यक्रमात निवेदक घेत नाहीत. कारण निवेदकाची शेरो शायरी आणि त्याला मध्येच सुचणाऱ्या गोष्टींमुळे कार्यक्रमाचा मूळ हेतू दूर राहतो. अकारण अनौपचारिकता आताशा बोजड वाटू लागलीय. हे सारे आता बदलायला हवे. जसजसे आपण २१ व्या शतकात पुढे सरकतोय तसतसे आपण जास्त प्रमाणात अनौपचारिकता स्वीकारायला हवी. त्या दिशेने पावले उचलली जात आहेत. परंतु काही ठिकाणी औपचारिकतेच्या बंधनांना लोक सोडायलाच तयार नाहीत; किंबहुना त्यांना त्यातच राहणे आवडते. आपल्याला बदलण्याची गरज आहे. कारण २१ व्या शतकात व्यावहारिक व तर्कपूर्ण दृष्टिकोनच यशाकडे जाण्यास मदत करू शकतो. कार्यालयीन कामकाजांत अशा प्रकारचा औपचारिकपणा हा कार्यक्षमता कमी करतो, असे आढळून आले आहे. (पान ६ वर)

---

विवेचन — श्रीरंग श्री. हिर्लेकर

# सूर्य आणि ७-१२



वाचकांना २६ एप्रिलचा 'सूर्यनमस्कार' आणि ३ मेचा 'तृचाकल्प सूर्यनमस्कार' असे दोन लेख वाचताना एक मुद्दा प्रामुख्याने लक्षात आला असेल की सूर्य, १२ आणि ७ या सर्वांत काही ना काही संबंध आहेत. हे संबंध केवळ योगायोग नसून त्यात कालगती, खगोलशास्त्र, तत्त्वज्ञान व सांस्कृतिक प्रतीकात्मदृष्ट्या काही संगती आहे. आजचा हा लेख त्याच दोन लेखांचा उत्तरभागही म्हणता येईल किंवा स्वतंत्रही समजता येईल.

१२ आणि ७ हे दोनच अंक नाहीत तर आपल्या तत्त्वज्ञानाप्रमाणे विविध अंकां ागे तर्कशुद्ध विचार आणि कारणे असल्याचे आढळते. ज्योतिषशास्त्राची एक शाखा तर अंकज्योतिष या नावाने असल्याचे अनेकांना ठाऊक असेलच. त्याचप्रमाणे कुंडली ज्योतिषात पण ६ आणि ८ हे अंकांनी निर्देशित स्थाने अशुभ आणि नवम स्थान अत्यंत शुभ समजले जाते.

**सूर्य आणि १२ :** १२ या अंकामागे संपूर्ण कालचक्राची कल्पना आहे. पृथ्वी सूर्याभोवती १२ महिन्यात लंबवर्तुळाकार मार्गाने प्रदक्षिणा करते. सूर्य स्थिर असून पृथ्वी त्याच्याभोवती फिरते, हे आपल्या ज्योतिषाचार्यांना निश्चितच माहीत होते तरी व्यावहारिक सुलभतेसाठी या काळात सूर्य ३० अंशांचा एक राशी विभाग याप्रमाणे वर्षभरात मेष-वृषभ...मीन या १२ विभागांतून भ्रमण करतो, असे समजले जाते. या १२ विभागांचा आणि सूर्याच्या मित्र, रवी, सूर्य, भानू... इत्यादी प्रचलित १२ नामांचा संबंध आणि तदनुसार परिणाम वरील लेखात स्पष्ट केला आहे.

आपल्या भ्रमणकाळात सूर्य १४ जानेवारी ते १४ जुलै मकर ते मिथुन या अवकाशाच्या उत्तर विभागातून आणि १४ जुलै ते पुढील १४ जानेवारीपर्यंत दक्षिण विभागातून प्रवास करतो. यांनाच उत्तरायण आणि दक्षिणायन किंवा आरोही आणि अवरोही भ्रमण असे म्हटले जाते. उत्तरायण किंवा आरोही असण्याचा काळ शुभ समजला जातो. उत्तरायणात देहत्याग झाल्यास उत्तमगती मिळते. वर्षाच्या १२ महिन्यांप्रमाणे दोन सूर्योदयातील दिवस-रात्रीचा भ्रमणकाळही सर्वसाधारणपणे प्रत्येकी १२ तासांत विभागला गेला आहे.

वारांचीही संख्या ७ असून नवीन आठवड्याचा आरंभ सूर्याच्या रविवारपासूनच आणि सूर्योदयालाच होतो. वेदांनीही चैत्र-वैशाखादी १२ महिन्यांच्या सूर्यांच्या विविध रूपांतील १२ आदित्य कोण ते सांगताना धाता, अर्यमा, मित्र, वरुण, इन्द्र, विवस्वान, पूषा, पर्जन्य, अंशुमान, भग, त्वष्टा आणि विष्णू ही संबोधने योजिली. एकेक महिन्याच्या एकेक आदित्यासोबत दरवेळेस निरनिराळे ऋषी, गंधर्व, यक्ष, अप्सरा, राक्षस आणि सर्प असे सहा जण म्हणजे आदित्य धरून एकूण सात जण प्रवास करतात. त्यातून सूर्याची सृष्टिनिर्मिती, समाज रचना, मैत्री आणि सामाजिक संतुलन, नियम आणि मर्यादा, शक्ती आणि वर्षा, तेज आणि उष्णता, पोषण, जीवनदायी ऊब निर्मिती, ऊर्जा, ऐश्वर्य, रचना आणि सर्वव्यापकता हे भाव, तत्त्वे आणि कार्ये व्यक्त होतात.

**सूर्य आणि ७ :** सूर्यरथ कसा तर सप्ताश्व सप्तरज्जुश्च. म्हणजे सात घोडे आणि सात लगाम. हे सप्तरंग, वेदांचे सप्तछंद, सप्तलोक, आयुर्वेदातील सप्तधातू, योगशास्त्रातील सप्तचक्र यांची प्रतीके आहेत. यातील छंदांना वेदांचे पाय म्हणतात. कारण त्यांच्या सहाय्यानेच वेद आजपर्यंत चालत राहिले. वेदांतील बहुतांश ऋचा या गायत्री, उष्णिक, अनुष्टुभ, बृहती, पंक्ती, त्रिष्टुभ आणि जगती या सात मुख्य वैदिक छंदात आहेत. छंद म्हणजे सोप्या शब्दात सांगायचे तर ध्वनिमापन. त्यामुळे सूर्यकिरण प्रिझममधून गेल्यास ७ रंगात विभागतो, तसे ब्रह्मदेवाच्या श्वासातून उत्पन्न झालेल्या वेदांच्या ऋचांचा ब्रह्मनाद वरील सप्त छंदातून व्यक्त होताना दिसतो.

१२ आणि ७ यांचा एकत्रित विचार केल्यास १२ म्हणजे कालचक्र, राशिचक्र आणि संबंधित आदित्य नामे तर ७ म्हणजे सूर्याची सूक्ष्म ऊर्जा आणि वैविध्य. १२ ही सूर्याची अवकाशीय आणि ७ ही प्रकाशकीय अशी समग्र जीवनाची व्यवस्था म्हणता येईल. त्यामुळे १२ व ७ हे केवळ अंक नसून त्यामागे गूढ संकेत आहेत. योगशास्त्रातील सप्तचक्र व्यवस्था किंवा सप्त ऊर्जा केंद्रे अनुक्रमे मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत विशुद्ध, आज्ञा आणि सहस्रार अशी आरोही पद्धतीने आहेत. या सप्तचक्रांचा रंगही सूर्यकिरणांचे विघटन केल्यावर दिसणाऱ्या 'तानापिहिअनिजा' याच सप्तरंगांप्रमाणेच असतो.

**प्रकाश-** भौतिकशास्त्राप्रमाणे आपल्याला प्रत्येक रंग निराळा भासतो. कारण त्यांची कंपनसंख्या निराळी असते. लॅटिन भाषेतील लॅ डा या एककात ही कंपने मोजल्या जातात. आपण दिवसभरात १२ वेळा सूर्यनाडी (पिंगला) आणि १२ वेळा चंद्रनाडी (इडा) याद्वारे श्वास घेतो. 'सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च ।' म्हणजे चर आणि अचरांचा प्रेरक, रक्षक आणि आत्मा सूर्य या ऋचेतून सांगितले आहे. म्हणून प्राणशक्तीचा कारक कोण तर सूर्यच.

हृदयचक्र किंवा अनाहतचक्राला १२ पाकळ्या असल्याची कल्पना योगशास्त्रात सांगितली आहे. याप्रमाणे सूर्य, ७ आणि १२ यांचे संबंध पुन्हा एकदा स्पष्ट होतात. आपल्या द्रष्ट्या ऋषींनी हे अंक सहजच निवडले नसून त्यांनी ते वेदांमध्ये नादरूपात, योगात प्राणशक्ती रूपात आणि खगोलात दिशा व काल रूपात सर्वत्र अनुभवले, असे म्हणावे लागते. आता सूर्योपासनेतील नमस्कारांचे १२ मंत्र आणि ७ चक्र यांचा संबंध साधनेसाठी कसा आहे हे पाहू...

हे केवळ प्रतीकात्मक नसून योग्यरीतीने केल्यास प्राणशक्ती जागृत करणारी ही एक पद्धत आहे, असे अनुभवाला येईल.

पहिल्या ७ मंत्रांच्या प्रभावाने प्राणशक्ती कुंडलिनी चक्रांवर आरोह गतीने परिणामकरीत जाते.

**१) मित्राय नमः** मूलाधार चक्र. यामुळे स्थैर्य आणि आधार.
**२) रवये नमः** स्वाधिष्ठान चक्र. यातून प्रवाह आणि ऊर्जा.
**३) सूर्याय नमः** मणिपूर चक्र, हे शरीरातील वैश्वानर नावाचा अग्नी पचनक्रिया प्रदीप्त करतो.
**४) भानवे नमः** अनाहत चक्र आणि यातून प्रकाश आणि प्रेम.
**५) खगाय नमः** विशुद्ध चक्र जागृत होऊन विस्तार व आकाशासारखी व्यापकता.
**६) पूष्णे नमः** आज्ञा चक्राला प्रेरित करून मार्गदर्शन मिळते.
**७) हिरण्यगर्भाय नमः** यामुळे सहस्रार चक्र उद्दीपित होऊन सृष्टिबीज रहस्याचे ज्ञान होते.

पुढील ५ मंत्र अवरोही, अर्थात वरून खाली उर्जेला स्थैर्य देतात.
**(८) मरीचये नमः** प्रकाशाची दीप्ती शरीरभर पसरवणे.
**९) आदित्याय नमः** संपूर्ण शरीरात उर्जेचे संतुलन राखणे,
**१०) सवित्रे नमः** यामुळे सृजनत्वाची जागृती होते, (पान ६ वर)

---

## अधिकमासाचे वाण



सासूबाईंनी फोन केला, जावईबुवा तुम्ही
यावे अधिकमास सुरू झाला,
वाण घेऊन जावे...१
अधिकमासात वाण, प्रथा आपली आगळी
देईन म्हणते तुम्हाला,
फूल ना फुलांची पाकळी...२
तुमच्या संसारात सर्वच वस्तू,पण नवीन
काहीतरी देईन वाण देण्याचं पुण्य,
माझ्या पदरात पाडून घेईन...३
जावई म्हणाले सासूबाईंना, सोडून द्या
जुन्या रीती नवे युग नवे विचार,
बदला आपली कृती...४
जगामध्ये आहेत दिन दुबळे अपंग,
मिळत नाही त्यांना, पोटभर अन्न...५
समाजात कार्यरत आहे कितीतरी संस्था,
त्यांच्यासाठी निर्माण व्हावी
तुमच्या मनात आस्था...६
जावयाला वाण देऊन, मिळत नाही पुण्य
समाजकार्य केल्याविना
जीवन आपले शून्य...७
मला देऊ नका वाण, तुम्ही गरजवंतांना
द्या, मनापासूनचे आशीर्वाद
त्यांचे पदरात पाडून घ्या...८
सासू म्हणाली जावयाला, तुमचे विचार
किती छान खरोखर आमची मुलगी
फारच भाग्यवान...९
मनापासून सांगते तुम्हाला, पटले तुमचे
विचार सुंदर कल्पना दिली मला,
मानते तुमचे आभार...१०

मंजूषा शिनखेडे

पर्यावरण | मिलिंद बेंडाळे

# मानवी विकासाच्या मॉडेलपुढे प्रश्नचिन्ह

**विकासाच्या नावाखाली आपण निसर्गाशी किती संघर्ष करणार हा प्रश्न कळीचा बनत आहे. अलिकडेच उत्तर प्रदेशमध्ये वादळात शेकडो संसार उद्ध्वस्त झाले, राजस्थान आणि मध्य प्रदेशमध्ये उष्णतेने जगणे असह्य केले, तर बिहार, झारखंड, उत्तराखंडमध्ये मुसळधार पावसाने भीतीचे वातावरण निर्माण केले. या सर्व नैसर्गिक आपत्ती असल्या, तरी एकत्रितपणे विचार केल्यास मानवी विकासाच्या मॉडेलपुढे प्रश्नचिन्ह उभे करतात.**



गेल्या काही दशकांमध्ये जगाने विकासाची जी संकल्पना स्वीकारली, तिचा केंद्रबिंदू होता अधिक उत्पादन, अधिक उपभोग आणिअधिक वेग. उद्योग, शहरे, महामार्ग, ऊर्जा प्रकल्प आणि बाजारपेठांच्या विस्ताराने अर्थव्यवस्था वाढल्या; त्याचवेळी जंगलांचा ऱ्हास झाला, नद्या प्रदूषित झाल्या आणि वातावरणातील कार्बनचे प्रमाण धोकादायक पातळीवर पोहोचले. पृथ्वीची तापमानवाढ ही केवळ वैज्ञानिक आकडेवारी नाही, तर ती आपल्या जीवन पद्धतीचे दुष्परिणाम दाखवणारे वास्तव आहे. भारतासारख्या विकसनशील देशांसमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे विकास आणि पर्यावरण यांच्यात समतोल राखणे. अजूनही देशातील कोट्यवधी लोकांना मूलभूत सुविधा, रोजगार आणि चांगल्या जीवनमानाची गरज आहे. त्यामुळे औद्योगिकीकरण आणि शहरीकरण अपरिहार्य ठरते; पण प्रश्न असा आहे की, हा विकास किती शाश्वत आहे? जर शहरांच्या विस्तारासाठी झाडे तोडली जात असतील, नद्यांचे प्रवाह अडवले जात असतील आणि जमिनीचा नैसर्गिक श्वासच रोखला जात असेल, तर त्याचे परिणाम हवामानाच्या अस्थिरतेतूनच समोर येणार. आज भारतातील अनेक महानगरे 'उष्णतेची बेटे' बनत आहेत.

पूर्वी गावंमध्ये किंवा लहान शहरांमध्ये झाडांची सावली, मोकळी जमीन आणि जलस्रोत यामुळे तापमानात नैसर्गिक समतोल राहायचा. आता त्याठिकाणी काँक्रीटचे जाळे निर्माण झाले आहे. उंच इमारती, डांबरी रस्ते आणि वाढती वाहनसंख्या वातावरणातील उष्णता अधिक वाढवत आहेत. परिणामी उष्णतेच्या लाटा अधिक तीव्र होत आहेत. शहरांमधील गरीब वस्त्या तर या संकटाचे सर्वाधिक मोठे बळी ठरत आहेत. वातानुकूलित कार्यालयांमध्ये बसणाऱ्या वर्गाला हवामान बदलाची चर्चा बौद्धिक विषय वाटू शकते; पण रोज उन्हात काम करणाऱ्या मजुरासाठी तो जगण्याचा प्रश्न बनला आहे. हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या आपत्ती सामाजिक विषमताही अधिक तीव्र करतात. श्रीमंत वर्ग आपत्तीमधून लवकर सावरतो, कारण त्याच्याकडे आर्थिक साधने असतात. गरीब मात्र प्रत्येक आपत्तीनंतर पुन्हा शून्यावर येतो. शेतकऱ्याचे पीक नष्ट झाले. मजुराचा रोजगार बंद पडला किंवा छोट्या व्यावसायिकाचे दुकान उद्ध्वस्त झाले, तर त्याच्यासाठी ती केवळ नैसर्गिक घटना राहत नाही तर ती आयुष्य उद्ध्वस्त करणारी दुर्घटना बनते. त्यामुळे हवामान बदलाचा प्रश्न सामाजिक न्यायाशीही जोडला गेला आहे.

भारतातील शेती व्यवस्था विशेषतः असुरक्षित आहे. अजूनही देशातील मोठा शेतकरी वर्ग पावसावर अवलंबून आहे. पावसाचे चक्र विस्कळीत झाल्याने शेतीचे अर्थकारण कोलमडत आहे. कधी अतिवृष्टी, कधी दुष्काळ, कधी अवकाळी पाऊस या घटनांनी शेतकऱ्यांच्या उत्पन्नातील अनिश्चितता वाढवली आहे. हवामान बदलाचा सर्वाधिक फटका अन्नसुरक्षेलाही बसू शकतो. कारण शेती उत्पादन घटले तर महागाई वाढेल, अन्नधान्याचा तुटवडा निर्माण होईल आणि सामाजिक असंतोष वाढू शकतो. या संकटाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सार्वजनिक आरोग्य. वाढते तापमान आणि प्रदूषण यामुळे उष्माघात, श्वसनविकार, हृदयविकार आणि मानसिक तणाव वाढत आहेत. मोठ्या शहरांमधील प्रदूषित हवा आणि उष्णता यांचे मिश्रण आरोग्यासाठी गंभीर धोका बनले आहे. भविष्यात हवामान बदलामुळे नवीन संसर्गजन्य आजारांचाही धोका वाढू शकतो, असा इशारा जागतिक आरोग्य संस्था देत आहे. आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीनेही भारताला स्वतःचा पुनर्विचार करावा लागेल. आजही अनेकदा आपत्ती आल्यावरच यंत्रणा जागी होते. मदतकार्य महत्त्वाचे असले, तरी आपत्तिपूर्व तयारी अधिक महत्त्वाची आहे. हवामान अंदाज अधिक अचूक आणि स्थानिक पातळीवर उपलब्ध व्हायला हवेत. गावपातळीपर्यंत पूर्वसूचना पोहोचविणारी मजबूत व्यवस्था उभी करावी लागेल. विशेषतः किनारी भाग, डोंगराळ प्रदेश आणि दुष्काळग्रस्त भागांसाठी स्वतंत्र हवामान कृती आराखडे आवश्यक आहेत; मात्र या सर्वांपेक्षा मोठा प्रश्न मानसिकतेचा आहे. आपण निसर्गाला अजूनही 'संसाधन' म्हणून पाहतो, 'सहजीवनाचा आधार' म्हणून नाही. जंगल म्हणजे लाकूड, नदी म्हणजे पाणीपुरवठा, जमीन म्हणजे बांधकामासाठी जागा या दृष्टिकोनातून बाहेर पडावे लागेल. कारण निसर्गाशी संघर्ष करून कोणतीही संस्कृती दीर्घकाळ टिकलेली नाही. मानवी इतिहासाने हे वारंवार दाखवून दिले आहे.

भारतीय संस्कृतीत निसर्गाशी सुसंवादाची परंपरा होती. नद्या, पर्वत, वृक्ष आणि पृथ्वी यांना पूजनीय मानले जात होते. आधुनिकतेच्या अतिरेकात आपण ही दृष्टी हरवली. विकासाच्या पाश्चिमात्य मॉडेलचे अंधानुकरण करताना आपण पर्यावरणीय संतुलनाची किंमत दुर्लक्षित केली. आता परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की, पुन्हा शाश्वत जीवनशैलीकडे वळण्याची गरज निर्माण झाली आहे.

हवामान बदलाचा सामना करण्यासाठी केवळ सरकारी धोरणे पुरेशी नाहीत. नागरिकांचाही सहभाग आवश्यक आहे. ऊर्जा बचत, पाण्याचा संयमी वापर, सार्वजनिक वाहतुकीचा वापर, वृक्षसंवर्धन आणि कचरा व्यवस्थापन या गोष्टी वैयक्तिक पातळीवरही महत्त्वाच्या ठरतात. शाळांपासून विद्यापीठांपर्यंत पर्यावरण शिक्षण अधिक व्यवहार्य बनवावे लागेल. पुढील पिढीला केवळ तंत्रज्ञान नव्हे, तर पर्यावरणीय जबाबदारीही शिकवावी लागेल. उद्योग क्षेत्रालाही आपली भूमिका बदलावी लागेल. कार्बन उत्सर्जन कमी करणे, हरित ऊर्जा वापरणे आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञान स्वीकारणे ही आता सामाजिक जबाबदारी नसून अस्तित्वाची गरज बनली आहे. भविष्यात जागतिक अर्थव्यवस्था हरित तंत्रज्ञानावर आधारित असेल. त्यामुळे पर्यावरणपूरक विकास ही केवळ नैतिक गरज नसून आर्थिक गरजही आहे. आज हवामानाचे बदलते रूप आपल्याला एक स्पष्ट संदेश देत आहे, विकासाचा सध्याचा मार्ग बदलण्याची वेळ आली आहे. अन्यथा, भविष्यातील संकटे अधिक भीषण असतील. प्रश्न केवळ तापमानवाढीचा नाही, तर प्रश्न मानवी सभ्यतेच्या टिकावाचा आहे. निसर्ग अजूनही आपल्याला संधी देत आहे.

हवामानातील अस्थिरता ही अंतिम विनाशाची सुरुवात नसून सुधारणेची शेवटची संधी असू शकते. जर आपण आज शहाणपणाने निर्णय घेतले, तर विकास आणि पर्यावरण यांच्यात संतुलन निर्माण करणे अशक्य नाही; पण त्यासाठी राजकीय इच्छाशक्ती हवी. हवामानाचा बदलता स्वभाव आता केवळ नैसर्गिक चक्राचा भाग राहिलेला नाही, तर तो मानवी अस्तित्वासमोर उभ्या राहिलेल्या सर्वात गंभीर संकटांपैकी एक बनला आहे. कधी असह्य उष्णतेच्या लाटा, कधी अचानक येणारे वादळ, कधी अवकाळी पाऊस तर कधी दीर्घकाळ दुष्काळसदृश परिस्थिती या घटना आता अपवाद राहिलेल्या नाहीत. उत्तर भारतात अलिकडे हवामानाने दाखवलेले तीव्र रूप हे केवळ ऋतूंचे विचित्र वर्तन नसून पर्यावरणीय असंतुलनाच्या गंभीर इशाऱ्याचे प्रतीक आहे. उत्तर प्रदेशात आलेल्या भीषण वादळात जवळपास १०० जणांचा मृत्यू झाला, राजस्थान आणि मध्य प्रदेशात प्रचंड उष्णतेची लाट नागरिकांना होरपळून काढत आहे तर बिहार, झारखंड आणि उत्तराखंडच्या डोंगराळ भागांत मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

देशाच्या वेगवेगळ्या भागांत एकाच वेळी हवामानाची इतकी टोकाची रूपे दिसणे ही सामान्य बाब मानता येणार नाही. जागतिक हवामान बदलाचा परिणाम आता प्रत्यक्ष जाणवू लागला आहे. संयुक्त राष्ट्र संघ, जागतिक हवामान संघटना आणि अनेक आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक संस्था गेली अनेक वर्षे पृथ्वीचे तापमान वाढत असल्याचा इशारा देत आहेत. त्यांचे म्हणणे होते की, तापमानवाढीमुळे हवामानातील टोकाच्या घटना अधिक तीव्र आणि वारंवार होतील. आज जगभरातील परिस्थिती पाहिली, तर या इशाऱ्यांची सत्यता स्पष्टपणे दिसून येते. भारतासारख्या विशाल आणि विविध भौगोलिक परिस्थिती असलेल्या देशावर या बदलांचा परिणाम अधिक तीव्रतेने होत आहे. हिमालयीन प्रदेश, किनारपट्टी, वाळवंट, पठारे आणि विस्तीर्ण मैदाने अशा विविध भूभागांमुळे हवामान बदलाचे परिणाम प्रत्येक भागात वेगळ्या स्वरूपात दिसतात.

अलिकडच्या काळात भारतात उष्णतेच्या लाटांचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. एप्रिल महिन्याच्या अखेरीस जगातील सर्वाधिक उष्ण असलेल्या १०० शहरांपैकी ९० पेक्षा अधिक शहरे भारतात होती, ही बाब चिंताजनक आहे. हवामान बदलामुळे उष्णतेच्या लाटा निर्माण होत नसल्या, तरी वाढत्या तापमानामुळे परिणाम घातक ठरतो. वातावरणातील उष्णता वाढल्याने जमिनीतील ओलावा कमी होतो, पाण्याचे स्रोत आटतात आणि मानवी शरीरावर ताण निर्माण होतो. (पान ६ वर)

पान १ वरून

## भारतीय आत्मनिर्भरतेचा जागतिक डंका

रिक आणि आर्थिक ताकदीकडे दुर्लक्ष करू शकत नाहीत. भारत आता जागतिक राजकारणातील भूराजकीय समीकरणे आपल्या सोयीनुसार ठरवणारा, एक प्रमुख खेळाडू झाला आहे.

येणारा काळ हा भारताचाच आहे आणि 'मेक इन इंडिया' हे त्या सुवर्णकाळाचे सर्वांत मोठे, प्रभावी आणि

पान २ वरून

## रामा शिवा गोविंदा

वामनरावांनी थोडा वेळ निरीक्षण करून दुकानाच्या मालकाला आपली ओळख सांगितली. त्यालाही ती ओळख पटली आणि रामाने आनंदाने वाकून वामनरावांना नमस्कार केला. त्यांना सोबत घेऊन शेजारच्या सोफ्यावर येऊन बसला. ''अरे प्रभू, दोन स्पेशल चहा सांग बरं. आमचे जुने साहेब आले आहेत!'' थोड्या वेळात शेजारच्या हॉटेलमधून आलं-विलायचीयुक्त घट्ट केशरी वफाळलेला चहा आला. चहाचे घुटके घेताना जुन्या गोष्टींना उजाळा मिळू लागला. सहज वामनराव म्हणाले, ''अरे, कसंय ना. खोटारडेपणा मला अजिबात आवडत नसल्याने त्या वेळेला मी तसे वागलो.'' यावर गल्ल्यावर बसलेला तो मालक रामा म्हणाला, ''परिश्रम आणि संघर्ष करून आज मी मोठा व्यापारी झालो आहे. मे. रामा ट्रेडर्सची वार्षिक उलाढाल फार मोठी आहे. माझ्या मनात तुमच्याविषयी अजिबात किल्मिष नाही. पण आता जर मी तुम्हाला खरी गोष्ट सांगितली तर तुम्हाला आश्चर्य वाटेल. कारण त्यावेळी तुम्ही मला बोलण्याची अजिबात संधी न देता कामावरून कमी केले.

माझी बाजू तुम्हाला वेळीच कळली नाही, याचा अजूनही खेद वाटतो.'' ''अरे, पण तू म्हणालास की तुझा लहान भाऊ मरण पावला म्हणून; तर मग तो कसा काय घरी आला होता?'' ''तिथेच गैरसमज झालाय. कारण मला शिवा आणि गोविंदा असे दोघे लहान सख्खे जुळे भाऊ आहेत. जुळे असल्याने दोघे दिसायला सारखे दिसतात. शिवाचा अपघाती मृत्यू झाला, ही गोष्ट खरी होती. आणि त्यादिवशी गावावरून आलेला तो दुसरा लहान भाऊ म्हणजे गोविंदा होता. हा खुलासा ऐकून वामनराव क्षणभर दिग्मूढ झाले. ''अरे, त्यावेळी मी फार कठोर वागलो. तुला स्पष्टीकरणाची बाजू मांडून दिली नाही, याची मला आता खंत वाटते.'' ''साहेब जे होते ते बऱ्यासाठी. तु च्याकडून निघाल्यावर मी याच दुकानात नोकर म्हणून कामाला लागलो. या दुकानाचे मालक एक सद्गृहस्थ असून ते वृद्ध आणि निपुत्रिक होते. मी दुकानात मन लावून काम केले आणि त्यांची मनोभावे वैयक्तिक सेवा केली. त्यामुळे त्यांची माझ्यावर खूप मर्जी होती. इतकी की, त्यांनी मृत्यूपूर्वी मला त्यांचे हे दुकान आणि प्रॉपर्टी माझ्या नावे लिहून दिली. बघा; नियतीच्या मनात काही वेगळेच असते. आपले परस्परांशी लागेबांधे केव्हा जुळतील आणि केव्हा तुटतील, हे सांगता येत नाही. नियती वरून नियंत्रित करीत असते. आपण काळाच्या प्रवाहात वाहत असतो.'' रामाचे ते कथन ऐकून वामनराव अवाक झाले होते.

## लहान खांद्यावर मोठी जबाबदारी

ग्रामीण भागात आणि स्थलांतरित कुटुंबांमध्ये अनेक मुलींना शिक्षण अर्धवट सोडावं लागतं. कारण घरात बालसंगोपनासाठी दुसरा पर्याय नसतो. परिणामी एका मुलाचं बालपण वाचवण्यासाठी दुसऱ्या मुलाचं बालपण गमावलं जातं. कोविड-१९ महामारीच्या काळात ही परिस्थिती अधिक स्पष्टपणे समोर आली. शाळा बंद झाल्या, पालक रोजगाराच्या तणावात अडकले आणि घरातील सर्व जबाबदाऱ्या मुलांवर पडल्या. अनेक मोठ्या मुलांनी लहान भावंडांच्या ऑनलाईन शिक्षणापासून जेवणापर्यंत सगळं सांभाळलं.

काही मुलं स्वतःच शिक्षणापासून दूर गेली. महामारी संपली, पण अनेक घरांमधील ही 'अदृश्य जबाबदारी' कायम राहिली. या प्रश्नाचा आणखी एक गंभीर पैलू म्हणजे भावनिक दुर्लक्ष. जे मूल स्वतःच प्रेम, संवाद आणि आधाराच्या शोधात असतं, त्यालाच दुसऱ्या मुलाची काळजी घेण्याची भूमिका निभवावी लागते. त्यामुळे अनेक वेळा त्यांच्या स्वतःच्या भावनिक गरजा दडपल्या जातात. 'तू मोठा आहेस', 'तू समजूतदार आहेस', 'तुला समजायलाहवं' या वाक्यांमुळे त्यांना स्वतःचं दुःख व्यक्त करण्याचाही अधिकार नसल्यासारखं वाटू लागतं. अर्थात, भावंडांमध्ये प्रेम आणि काळजी असणं ही सकारात्मक बाब आहे. मोठ्या भावंडांनी लहानांना मदत करणं हे कुटुंबातील नैसर्गिक नात्याचा भाग आहे. परंतु मदत आणि जबाबदारी यामध्ये एक सूक्ष्म रेषा असते. जेव्हा एखाद्या मुलाचं स्वतःचं बालपण, शिक्षण आणि मानसिक आरोग्य धोक्यात येईल इतकी जबाबदारी त्याच्यावर टाकली जाते, तेव्हा ती परिस्थिती चिंतेची बनते. आज या प्रश्नाकडे केवळ 'घरगुती व्यवस्था' म्हणून पाहून चालणार नाही. हा बालहक्क, मानसिक आरोग्य आणि सामाजिक संरचनेशी संबंधित प्रश्न आहे.

प्रत्येक मुलाला स्वतःचं बालपण जगण्याचा अधिकार आहे. एखाद्या मुलाने प्रेमाने भावंडांची काळजी घेणं आणि त्याच्यावर बालसंगोपनाची संपूर्ण जबाबदारी टाकणाऱ्या दोन गोष्टींमधील फरक समाजाने ओळखण्याची गरज आहे.

यासाठी व्यापक पातळीवर विचार होणं आवश्यक आहे. कामगार कुटुंबांसाठी परवडणारी बालसंगोपन केंद्रं, कार्यस्थळी crèche सुविधा, शाळांमधील समुपदेशन सेवा आणि पालकांमध्ये संवेदनशीलता निर्माण करणं अत्यंत महत्त्वाचं आहे. विशेषतः मुलींवर disproportionate जबाबदाऱ्या टाकल्या जाणार नाहीत यासाठी सामाजिक मानसिकतेत बदल आवश्यक आहे. शहरी भागात community childcare centres, workplace daycare AmU after-school support systems यांचा विस्तार करणे काळाची गरज बनली आहे. कारण प्रत्येक वेळी एखादं मूल आपल्या लहान भावंडाला मांडीवर घेऊन स्वतःचं बालपण बाजूला ठेवतं, तेव्हा आपण एक शांत पण गंभीर अन्याय घडताना पाहत असतो. हा अन्याय ओरडत नाही, आंदोलन करत नाही, बातम्यांमध्ये झळकत नाही; पण तो हजारो घरांमध्ये दररोज घडत असतो. आज प्रश्न फक्त भावंडांना सांभाळणाऱ्या मुलांचा नाही; प्रश्न आहे बालपणाच्या अर्थाचा. जर एखाद्या मुलाला लहान वयातच 'मोठं' व्हावं लागत असेल, तर समाज म्हणून आपण नेमकं काय गमावत आहोत?

सिनेमा | अनिल रा. तोरणे

# रागाच्या भरात लिहिलेल्या दोन ओळींचेच बनले लोकप्रिय गीत...



कागदाच्या तुकड्यावर रागाच्या भरात लिहिलेल्या दोन ओळींचे एका लोकप्रिय गीतात रूपांतर होण्याची एक विस्मयजनक घटना आपल्या हिंदी चित्रपटसृष्टीत गतकाळात घडली होती. तिची कहाणी कुतूहलजनक आहे. ही घटना १९६०-६१ च्या कालावधीतील आहे. अभिनेते-निर्माते- दिग्दर्शक राज कपूर आपले घनिष्ठ सहकारी संगीत दिग्दर्शक शंकर आणि जयकिशन तसेच गीतकारद्वय शैलेंद्र आणि हसरत जयपुरी यांच्या सहकार्याने चित्रपट निर्मिती करीत होते. त्या काळात 'कॉलेज गर्ल' नावाच्या एका चित्रपटाचे काम सुरू झाले. त्यात शम्मी कपूर आणि मधुबाला नायक-नायिका होते. (हा चित्रपट राज कपूर यांचा नव्हता) त्याच्या निर्मात्यांनी संगीताची जबाबदारी शंकर- जयकिशन जोडीवर सोपविण्यासाठी त्यांना सांगितले की, या कामाचे तुम्हाला भरघोस मानधन आणि तेही आगाऊ मिळेल. मात्र आमची एक अट आहे आणि ती म्हणजे प्रस्तावित चित्रपटाची गीते हसरत जयपुरी व शैलेंद्र हे दोन्ही गीतकार लिहिणार नाहीत; अन्य गीतकार लिहील.

शंकर-जयकिशन यांनी ते मान्य केले. ही घटना गीतकार शैलेंद्र यांच्या कानावर जाताच ते चांगलेच संतापले. क्षणाचाही विलंब न लावता ते आपल्या गाडीत बसले आणि त्यांनी गाडी गीतकार हसरत जयपुरी यांच्या निवासस्थानी नेली. त्यांनी हसरत यांना खाली बोलावून घेतले. हा काय प्रकार आहे हे हसरत यांना कळेना. त्यांनी शैलेंद्र विचारले, ''काय झाले आहे तरी काय?'' शैलेंद्र त्यांना म्हणाले, ''आधी गाडीत बसा; सगळे सांगतो.'' हसरत गाडीत बसले आणि गाडी मुंबईच्या महालक्ष्मी भागातील फेमस स्टुडिओच्या आवारातील शंकर-जयकिशन यांच्या संगीत-कक्षाच्या दिशेने धावू लागली. वाटेत शैलेंद्र यांनी हसरत यांना सगळे काही सांगितले. शंकर-जयकिशन अन्य गीतकारांकडून गीते लिहून घेणार आहेत, असे शैलेंद्र त्यांना म्हणाले. संगीत कक्षाच्या ठिकाणी शैलेंद्र आणि हसरत जयपुरी पोहोचले खरे; पण त्या ठिकाणी संगीतकार शंकर आणि जयकिशन दोघेही नव्हते.

शैलेंद्र यांनी कक्षाच्या कार्यालयीन कर्मचाऱ्याला बोलावून त्याला एक कागद व पेन आणण्यास सांगितले. नंतर त्यावर दोन ओळी लिहिल्या आणि तो कागद त्या कर्मचाऱ्याच्या हातात देत त्याला बजावून सांगितले की, '' या दोन ओळी तू त्या दोघांना स्वतः वाचून दाखव.'' त्यानंतर शैलेंद्र आणि हसरत जयपुरी आपापल्या घरी परतले. त्याचवेळी दोघांनी ठामपणे ठरविले की, यापुढे शंकर-जयकिशन यांच्यासमवेत कधीही काम करावयाचे नाही आणि त्यांनी तसे जाहीरही करून टाकले. हा सगळा प्रकार राज कपूर यांच्या कानावर गेला. त्यांना हेही समजले की, शैलेंद्र आणि हसरत जयपुरी यांचे शंकर- जयकिशन यांच्याबरोबर कशावरून तरी बिनसले असून त्यांनी यापुढे शंकर- जयकिशन यांच्याबरोबर काम न करण्याचा निर्णय घेतला आहे. राज कपूर यांनी ताबडतोब हालचाल करून चौघांना समुद्र किनाऱ्यावर (चौपाटी) बोलाविले. चौपाटीवर सगळे जमल्यावर राज कपूर त्यांना म्हणाले की, ''मी चित्रपट निर्मिती बंद करीत आहे.'' ते ऐकताच चौघेही हबकले. त्यांनी राज कपूर यांना विचारले की, ''आपण अचानक असे टोकाचे पाऊल का उचलीत आहात?'' त्यावर राज कपूर त्यांना म्हणाले, ''तुम्हा चौघांशिवाय माझे चित्रपट बनू शकत नाहीत. तुम्हीच एकमेकांसमवेत काम करणार नसाल तर मी चित्रपट निर्माण करून काय करू? म्हणूनच मी हा निर्णय घेतला आहे.'' ते ऐकताच चौघांनीही त्यांना विनंती केली...''आपण चित्रपट निर्मिती बंद करू नका.'' त्यानंतर त्या पाच जणांमध्ये आणखीही चर्चा झाली आणि ती फलद्रूप ठरली. शैलेंद्र आणि शंकर-जयकिशन यांच्यातील वाद सामोपचाराने मिटला. इतकेच नव्हे, तर अखेरच्या श्वासापर्यंत एकत्रितपणे काम करण्याची चौघांनी शपथ घेतली आणि अखेरच्या क्षणापर्यंत तिचे इमानेइतबारे पालनही केले. त्यानंतर काही काळ लोटला. दरम्यान, निर्माते-दिग्दर्शक अमर कुमार यांच्या 'रंगोली' या चित्रपटाचे काम सुरू झाले. त्यात किशोर कुमार नायक आणि वैजयंतीमाला नायिका होत्या.

संगीत नियोजनाची जबाबदारी शंकर-जयकिशन यांच्यावर सोपविण्यात आली होती. चित्रपटातील गीते किशोर कुमारच गाणार होते. शैलेंद्र यांना या चित्रपटाची कुणकुण लागताच ते शंकर यांना भेटावयास 'फेमस'मधील त्यांच्या संगीत कक्षावर गेले. त्यावेळी शंकर हार्मोनियम घेऊन बसले होते आणि एका गीताला चाल लावण्याच्या प्रयत्नात होते. शैलेंद्र आलेले पाहताच शंकर त्यांना म्हणाले, ''तुम्ही मुखडा तर दिला आहे; आता अंतरे लिहून द्या.'' शंकर यांचे बोलणे ऐकून शैलेंद्र क्षणभर बुचकळ्यात पडले. चकित होऊन त्यांनी शंकर यांना विचारले, ''मुखडा? मी कधी लिहिला? मी तर काहीच लिहिलेले नाही!'' त्यावर शंकर त्यांना म्हणाले, ''त्या दिवशी तुम्ही हा कागद देऊन गेला होतात ना, तोच हा मुखडा... 'छोटी सी ये दुनिया, पहचाने रास्ते हैं, तु कहीं तो मिलोगे, कभी तो मिलोगे तो पूछेंगे हाल...' त्याला मी अशी चाल लावली आहे.

शंकर यांनी शैलेंद्र यांना मुखडा गाऊन दाखविला आणि गीताचे अंतरे लिहून द्यावयास सांगितले. शैलेंद्र यांनी त्याबरहुकूम अंतरे लिहून शंकर यांच्याकडे दिले. गीत तयार झाले. किशोर कुमार यांनी ते गायिले आणि ते गीतच 'रंगोली' चित्रपटाचे प्रमुख आकर्षण ठरून सर्वाधिक लोकप्रिय गीत ठरले.

कीर्तिरूपांच्या आठवकथा

डॉ. रमा गोळवलकर

# अरुंधती

भारतीय परंपरेत मानवी संस्कृतीच्या उदयाला कारणीभूत ठरलेल्या वेगवेगळ्या ऋषी आणि ऋषी-पत्नींविषयीची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांची नावं तारे आणि तारका समूहाला देण्याची पद्धत पूर्वापार चालत आलेली आहे. त्यात प्रमुख आहे तो सप्तर्षी तारका समूह. आठ ताऱ्यांचा हा समूह लहान मुलांना ओळखता यायला लागला की, त्यांच्याच रेषेत उगवणारा ध्रुव तारा शोधून काढणं हा आकाश वाचनाचा पहिला धडा शिकवला जायचा. विवाह संपन्न झाल्यानंतर गर्भाधान संस्काराच्या आधी नवपरिणित दाम्पत्यानं 'अरुंधती-वसिष्ठ' तारे एकमेकांना दाखवून त्यांचं दर्शन घेण्याचा एक विधी असतो.

इंग्रजीत या दोन ताऱ्यांना अनुक्रमे 'अल्कोर' आणि 'माईजर' म्हणतात. आधुनिक दुर्बिणीतून या दोन्ही ताऱ्यांचा अभ्यास केल्यानंतर खगोल शास्त्रज्ञांना त्यांच्या वैशिष्ट्यांचा शोध लागला. हे जुळे तारे म्हणजे ट्वीन स्टार असून 'माईजर' (वसिष्ठ) पृथ्वीपासून साधारण ७८ प्रकाश वर्षं तर 'अल्कोर' (अरुंधती) पृथ्वीपासून ८१ प्रकाश वर्षं अंतरावर आहे. या विश्वाचा सर्वसाधारण नियम असा आहे की, दोन तारे एकमेकांशी संबंधित असतील तर त्यापैकी एक दुसऱ्याभोवती प्रदक्षिणा करतो. हे दोन तारे मात्र या नियमाला अपवाद आहेत.



हे दोघे एकमेकांच्या भोवती प्रदक्षिणा करतात. म्हणून आपल्या पूर्वजांनी या दोघांना वैदिक काळांत ज्याना आदर्श दाम्पत्य म्हणून मान्यता होती अशा वसिष्ठ-अरुंधतीची नावं देऊ केली. सोबतच सुखी आणि समाधानी वैवाहिक जीवनाचं रहस्य हे पती-पत्नी दोघांनी एकमेकांच्या भोवती फेर धरण्यात आहे, हे त्रिकालाबाधित सत्य या खगोलीय तथ्याच्या आधारे कर्मकांडातून उलगडून दाखवलं. यातल्या त्यांच्या व्यावहारिक शहाणपणाला दाद आपण द्यायला हवीच; शिवाय त्यातल्या वैश्विकतेच्या अस्तराचं कौतुकही करायलाच हवं. इतकी सुजाणता आणि सुज्ञता त्यांच्यात होती, याचा अभिमानही बाळगायलाच हवा.

भारतीय ज्ञानप्रणालीत अरुंधती हे नाव आणखी एका संदर्भात येतं; ते म्हणजे अरुंधती दर्शन न्याय! या नावानं एक सूत्र प्रतिपादित करण्यात आलेलं आहे. इथे न्याय हा शब्द 'जस्टिस' या अर्थानं आलेला नसून सूत्र, सिद्धांत, नियम या संकल्पनेसाठी आहे. 'न्याय'ची व्याख्या आहे.

'नीयते विवक्षितार्थ: अनेन इति न्याय:' (जे साधन विवक्षित किंवा ज्ञेय तत्त्वापर्यंत नेते किंवा घेऊन जाते, ते साधन म्हणजे 'न्याय'). तर, या सूत्राप्रमाणे अरुंधती हा तारा काहीसा सूक्ष्म म्हणून धूसर असून त्याचा प्रकाशदेखील मंद आहे. त्यामुळे तो सहज दृष्टीस पडत नाही. तो बघायचा असेल तर आधी अधिकच ठळकपणे दिसणारा 'वसिष्ठ' तारा शोधावा लागतो. त्याच्या संदर्भाची पार्श्वभूमी घेऊन नंतर अरुंधतीचा तारा लक्षात घ्यावा.

सूक्ष्म ज्ञानाचं तसंच आहे. आधी अवतीभवतीचं सहज आकळू शकेल असं ज्ञान ग्रहण करायचं. त्यानंतर त्या ज्ञानाच्या अनुषंगानं सूक्ष्म ज्ञानाचा वेध घ्यायचा. अधिक उलगडून सांगायचं झालं तर स्थूल वस्तू किंवा ज्ञान, जे दिसायला व समजायला सोपं असतं, ते आधी ग्रहण करून, त्याच्या आधारे सूक्ष्म वस्तू किंवा गूढ ज्ञानाकडे प्रवास करणं म्हणजे 'अरुंधती दर्शन न्याय'! एकदा का ते अरुंधतीरूपी सूक्ष्मातिसूक्ष्म ज्ञान झालं की मग वसिष्ठरूपी स्थूलज्ञानाचा आवरणाचा डोलारा आपसूकच गळून पडतो. अशा ज्ञानी व्यक्तीला 'न रुन्धती इति अरुंधती' कोणीही रोखू शकत नाही.

आणखी एका कारणासाठी आकाशस्थ अरुंधतीचा उल्लेख होतो. ज्याला कोणत्याही उपकरणाचा वापर न करता साध्या डोळ्यांनी (बेअर आईज) जर अरुंधतीचा तारा दिसत असेल तर त्या व्यक्तीची दृष्टी १०० टक्के उत्तम आहे. तर, या सगळ्या कर्मकांडीय, खगोलीय आणि न्यायशास्त्रीय चर्चेतून ज्या अरुंधतीचा नामोच्चार करण्यात आला आहे अशी अरुंधती हा आजचा वर्ण्यविषय आहे.

ऋग्वेदादि सर्व वैदिक वाङ्मय आणि पौराणिक ग्रंथांत अरुंधतीचा उल्लेख अतिशय आदर आणि सन्मानपूर्वक करण्यात आलेला आहे. महर्षी कर्द आणि देवाहुतीच्या पोटी कला, अनसूया, श्रद्धा, हविर्भू, गति, क्रिया, ख्याति, अरुंधती आणि शांती या नऊ मुलींसह कपिल महामुनी अशी एकूण १० अपत्यं जन्माला आली.

सारेच अत्यंत सुविद्य, सुशील, सुंदर, सात्त्विक आणि तेजस्वी होते. कन्यांपैकी क्रियेचा विवाह क्रतुंशी, गतीचा पुलहांशी, हविर्भूचा पुलत्स्यांशी, श्रद्धेचा अंगिरासांशी, अनसूयेचा अत्रींशी, कलेचा मरीचींशी आणि अरुंधतीचा वसिष्ठांशी झाला. एकदा अग्निदेवाची पत्नी स्वाहाला या सप्तर्षी पत्नींपैकी प्रत्येकीचं रूप घेण्याची इच्छा झाली. ती सहा ऋषी- पत्नींची रूपं घेऊ शकली, पण अरुंधतीच्या ज्ञानसाधनेचं तेज इतकं अपरंपार होतं की, स्वाहाला तिचं रूप धारण करता आलं नाही. त्यामुळे तिला सप्तर्षी तारका समूहात स्थान मिळालं, अशी एक कथा वाचण्यात आली आणि अरुंधतीचं अप्रूपच वाटलं.

चैत्र शुद्ध द्वितीया हा अरुंधतीला समर्पित दिवस. वैष्णव आणि शैव पुराणांत हिचा उल्लेख अतिशय प्रगल्भ विदुषी म्हणून करण्यात येतो.

सतीच्या आत्मदहनानंतर विरक्त झालेल्या शिवशंकराला पार्वतीशी विवाह करावा म्हणून समजावणारी अरुंधतीच होती. तसंच राम, लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न या चारही भावंडांचे गुरू वसिष्ठ असल्यामुळे अरुंधती त्यांची गुरुपत्नीच होती. गुरुकुलात राहून शिक्षण पूर्ण करणाऱ्या या चौघा राजपुत्रांना ती मातृवत होती. पत्नी- गृहिणी- माता म्हणून आवश्यक असलेल्या सर्व गुण आणि कौशल्यात पारंगत असलेल्या अरुंधतीनं सीता-उर्मिला- मांडवी आणि श्रुतकीर्तीला उत्तम गृहिणीपदाचं प्रशिक्षण दिलं.

काही पौराणिक संदर्भानुसार अरुंधती-वसिष्ठ या दाम्पत्याला जवळपास १०० पुत्र होते. त्यापैकी शक्ती नावाचा त्यांचा पुत्र ऋग्वेदातल्या काही सूक्तांचा द्रष्टा म्हणून प्रसिद्ध आहेच; शिवाय त्यांचा पुत्र म्हणजे पराशर ऋषी.

एकदा १२ वर्षांचा अवर्षण आणि दुष्काळाच्या प्रसंगी अरुंधतीनं शिवाकडे आपल्या सतीत्व आणि पातिव्रत्याचं साकडं घातलं आणि वर्षा करवून घेतली. अशा या शीलमयी, ज्ञानमयी विज्ञानमयी साध्वीची कीर्ती खऱ्या अर्थानं दिगंत आहे. तिच्या कीर्तिरूपाची ही आठवकथा.

बोली आणि संस्कृती

प्रा. अजय देशपांडे

# पऱ्हाटीच्या नख्खीतून आला कापूस फुलून...

कापसाचा इतिहास प्राचीन आहे. विदर्भातील गृत्समदया ऋषीने यवतमाळ जिल्ह्यातील कळंब येथे कापसाचा शोध लावला आणि कापसाच्या पद्धतशीर शेतीचा प्रारंभ केला असे सांगितले जाते. हाल सातवाहनाच्या गाथा सप्तशतीमध्ये कापसाचे उल्लेख आहेत. वऱ्हाडी बोलीत कापसाला पऱ्हाटी, कपाशी म्हणतात. महानगरातील बोलीत आता 'पऱ्हाटी' हा शब्द क्वचित वापरला जातो, कापूस या शब्दाचा इंग्रजी पर्याय असलेल्या कॉटन या शब्दाने अजून कापूस या शब्दाचा बळी घेतलेला नाही पण 'पऱ्हाटी' हा शब्द लुप्त होण्याच्या स्थितीत आहे.

हाल सातवाहनाच्या गाथा सप्तशतीमध्ये 'कप्पास' हा शब्द आला आहे. कापसाच्या बोंडासाठी 'वेण्ट' हा शब्द, सरकी काढलेल्या कापसासाठी 'तूल' हा शब्द, कापसाच्या अनेक फांद्यांच्या झाडासाठी फलही, फलिह हे शब्द गाथासप्तशतीमध्ये आहेत. सरकी म्हणजे कापसातली बी होय.

ख्रिस्तपूर्व ३५० च्या पूर्वीपासून कापसाचे पीक भारतात घेतले जाते. कपाशी, पऱ्हाटी या नावांनी लोकजीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान असणाऱ्या कापसाने प्राचीन काळापासून आजतागायत लोकप्रतिभेला सतत साद घातली आहे. कालच्या सारखेच आजही कापसाच्या पिकाचे महत्त्व आहे. कवी विठ्ठल वाघ यांच्या एका कवितासंग्रहाचे शीर्षक 'कपाशीची चंद्रफुले' हे आहे. त्यांच्या 'ढगामूचक अभाय' या कवितेत 'चांदीसारखा कापूस इकू उजऊ यंदा मोठीधाटी सकू' ही ओळ आहे. 'चांदीसारखा कापूस' म्हटले आहे. चांदीसारखा कापूस विकून मोठ्या मुलीचे लग्न करू असा विचार शेतकऱ्याच्या मनात असतो पण पाऊस दगाफटका करतो आणि पीक हातचे जाते. 'उजऊ' हा बोलीतील शब्द विवाह करणे या अर्थाने आला आहे. 'पऱ्हाटी' हा बोलीतला शब्द विठ्ठल वाघ यांच्या अनेक कवितां ध्ये आहे. 'पऱ्हाटी' या शीर्षकाची विठ्ठल वाघ यांची एक आशयघन कविता आहे.



**पऱ्हाटीच्या डांगोडांगी। रंगारंगाईचे फूलं**
**पोरी सोरीच्या कानात। जसे डुलतात डुलं।।**
**काल टोंग्या टोंग्या होती।**
**आज छात्यामांड्या झाली परकरातली पऱ्हाटी।**
**जसी लुगळ्यात आली।।**
**नोका म्हणू पऱ्हाटीले। होते बोंड्याईचा भार**
**लेकुरवाईच्या त्या लेकी। खेती आंगाखांद्यावर।।**
**पऱ्हाटीच्या नख्खीतून। आला कापूस फुलून**
**पाची बोटावर किस्न। लोनी राहेला झेलून।।**
**-विठ्ठल वाघ**

या कवितेत पऱ्हाटी, डांगोडांगी, रंगरंगाई, डुलं, टोंग्या, नख्खी असे काही बोलीतील शब्द आले आहेत. हे शब्द आज महानगरात ओठांवर असण्याची शक्यता कमीच आहे. शेतकरी आणि पऱ्हाटीचे बापलेकीचे नाते असते.

**पऱ्हाटीच्या डांगोडांगी । रंगारंगाईचे फूलं।। पोरी सोरीच्या कानात। जसे डुलतात डुलं।।** या शब्दांत अनेक भावसंदर्भांचे सूचन आहे. शेतातल्या पऱ्हाटीच्या रोपांशी शेतकऱ्याचे नातेच वेगळे असते. ते फक्त झाड आणि माणूस असे एवढेच नाते नाही; ते आहे मुलगी आणि बाप यांच्यातले नाते. उदरातल्या गर्भावर जशी आईची माया असते, तशीच बापाचीही माया असते. उदरात वाढणाऱ्या अंकुरावर जीव जडलेल्या मायबापाच्या हळव्या भावना येथे शब्दांत सांगितलेल्या नाहीत, त्या शब्दांच्या पलीकडच्या भावना समजून घेतल्या की, ओळीचा अर्थ उलगडत जातो. जमिनीच्या उदरात पऱ्हाटीचे अंकुर वाढतानाचे सृजनाचे साक्षात्कार बापाच्या डोळ्याने शेतकरी पाहत असतो.

दिवसामासानं वाढणारी पऱ्हाटी त्याला पोटची पोरगी वाटते. पऱ्हाटीच्या डांगोडांगी येणारी फुलं त्याला पोरीसोरीच्या कानातली डुलं वाटतात. रंगरंगाई म्हणजे अनेक रंग एकाच वेळी पाहतानाचा भावस्पर्शी परिणाम. पऱ्हाटीच्या फुलांचे रंग प्रत्यक्षात पाहिले की 'रंगरंगाई' या शब्दाचा अर्थानुभव घेता येतो, अगोदर देठात कळी असताना हिरवट पांढरा नंतर कळीत असताना पांढरा नंतर फिक्कट पिवळा मग फुललेल्या फुलांचा पिवळा पण हळदीसारखा नाही, त्यातही फुलांत अगदी मध्यभागी स्त्रीकेसराच्या जागी गर्द गुलबक्षी नंतर तेथेच गर्द जांभळा, परागकणांचा पिवळा आणि फुले सुकू लागली की गुलाबीसर असे कितीतरी रंग पऱ्हाटीच्या फुलांना असतात, काचनकोर जशी रंगरंगाईची असते तशीच लहान मुलींच्या कानातली डुलं रंगरंगाईची असते. इवल्या इवल्याशा पऱ्हाटीची फुले बापाला पोरीसोरीच्या कानातल्यासारखी रंगरंगाईची वाटणे स्वाभाविक आहे. पऱ्हाटीच्या इवल्याशा झाडात पोरीसोरीच्या निरागस उच्छृंखलतेचे दर्शन त्या शेतकऱ्याला घडते. कानातली डुलं हलवीत धावत येणाऱ्या पोरीकडे बापाने कौतुकाने पाहावे, तसेच वाऱ्याने हालणाऱ्या कळ्याफुलांच्या पऱ्हाटीकडे शेतकरी पाहतो. या कवितेच्या अंतरंगात शेतकरी बापाची भावस्पंदने भिनली आहेत. दुसऱ्या कडव्यात पऱ्हाटीची 'वाढ' झालेली आहे. पहिल्या कडव्यातली उच्छृंखलता, निरागसता आणि 'रंगरंगाईची फुलं येण्याचे संदर्भ पऱ्हाटी 'वाढी'ला लागण्याचे सूचन करणारे आहेत. परकरात उच्छृंखलपणे मिरवणारी पोर लुगड्यात आली की बापाची काळजी वाढणार हे निश्चित काल टोंग्या टोंग्या होती। आज छात्यामांड्या झाली' या ओळीतला 'छात्यामांड्या' हा शब्द दिवसामासाने होणाऱ्या स्त्रीदेहाची वाढ दर्शवतो, मुलगी लग्नाची होणे हा संदर्भ आहे हा शब्द पऱ्हाटीचा विस्तार सूचकतेने मांडणारा आहे.

बापाची काळजी '**परकरातली पऱ्हाटी। जसी लुगळ्यात आली**' या शब्दांत अध्याहृत आहेच. बोंडावर आलेल्या पऱ्हाटीची शेतकऱ्याला बापाला मुलीची वाटावी तशी काळजी वाटत असते. घरात छात्यामांड्या वाढलेली पोर अन् शेतात छात्यामांड्या वाढलेली पऱ्हाटी बापाची अन् शेतकऱ्यांची काळजी वाढवणारी असते.

पुढच्या चार ओळीत कालपर्यंत पोरसवदा असणारी पऱ्हाटी आता माउली झाली आहे. लग्न झाल्यानंतर पोरीचा फुलता फळता संसार बघणाऱ्या बापाच्या मनाने आणि डोळ्यांनी शेतकरी पऱ्हाटीकडे पाहू लागतो. लेकुरवाळीला लेकींचा तिला भार थोडाच होणार? (पान ६ वर)

पुस्तक परिक्षण

मो. ९४०३७४९९३२
विश्वास देशपांडे

# 'घे गगन भरारी'

यशोदीप पब्लिकेशन्स, पुणे यांच्यावतीने प्रकाशित झालेले घे गगन भरारी हे पुस्तक नुकतेच हातात पडले. नावाला साजेशा मुखपृष्ठामुळे हे पुस्तक आकर्षक झाले आहे. गिरी हे प्राध्यापक म्हणून तर विख्यात आहेतच. परंतु त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे ते एक उत्तम विचारवंत आणि संवेदनशील मार्गदर्शक आहेत. अध्यापनाच्या व्यासपीठावरून, वर्तमानपत्रातील लेखांमधून, तसेच त्यांच्या असंख्य व्याख्यानांतून त्यांनी जे विचारमंथन समाजापर्यंत पोहोचवले, त्याचा गहिरा ठसा या पुस्तकात उमटला आहे. त्यांच्या लेखनात केवळ अनुभवाचा गाभा नाही, तर आजच्या समाजस्थितीचे अचूक भान आणि भविष्यातील मार्गदर्शनही आहे. हाती आलेले हे पुस्तक म्हणजे त्या ज्ञानदीपाची नवी ज्योत आहे. या पुस्तकात सरांच्या विचारांचा झरा वाहतो आहे. कधी चिंतनशील, कधी भावस्पर्शी तर कधी वाचकाला जागं करणारा. प्रत्येक लेखात विचारांची ठिणगी आहे जी वाचकाच्या मनाला उजळून टाकते, आत्मपरीक्षणाची ज्योत प्रज्वलित करते.

सरांचे हे सातवे पुस्तक आहे. या आधी त्यांची सहा पुस्तके आतापर्यंत प्रकाशित झाली आहेत. उगवतीचे उन्मेष, तरुणाचे आयडॉल सुभाषचंद्र बोस, क्रांतिउद्यानाचे तपस्वी, गोस्वामी शौर्यगाथा ही त्यांची पुस्तके म्हणजे तरुणाईसाठी इतिहासाचा प्रेरणादायी असा महान ठेवा आहे. तर हास्यगिरी भाग एक व दोन मधून विनोदी आणि उपरोधिक पद्धतीने आजच्या समाजव्यवस्थतील दोषांवर त्यांनी कोरडे ओढले आहेत.

शब्द हे फक्त ध्वनी नसतात; ते विचारांचे दीप असतात. एखादा शब्द अंत:करणात शिरला, तर तो मनाच्या अंधाऱ्या काना-कोपऱ्याला उजळून टाकतो. प्रा वसंत गिरी सरांचे 'घे भरारी' हे पुस्तक हाती घेतल्यावर असाच अनुभव येतो. हे लेखन म्हणजे विचारांचा आणि चिंतनाचा वसंत फुलवणारे एक उत्तुंग पर्वत शिखर. या पर्वत शिखरापर्यंत भरारी घेऊन तेथून दिसणाऱ्या दृश्याचे निरीक्षण मात्र बारकाईने करायला हवे. या पुस्तकातील प्रत्येक लेख म्हणजे वाचकाला विचारांची नवी वाट दाखवणारा दिवा. त्यांची भाषा ओघवती आहे, पण क्लिष्ट नाही किंवा डोळे दिपवणारी नाही. ती साधेपणाच्या कळसावर उभी आहे. वाचकासमोर ते सहजपणे मुद्दे ठेवतात तसेच प्रश्नही ठेवतात. प्रश्नचिन्हांचे हे बीज इतके टवटवीत आहे की वाचकाच्या मनात आत्मपरीक्षणाची पालवी फुटल्याशिवाय राहात नाही.

'हे बुद्धिनाथा, आम्हाला विवेक दे' या लेखात गणरायाची स्थापना होत असताना मूर्ती आपण का स्थापन करतो, मूर्तिपूजा का करतो, प्रार्थना का करतो हे सांगताना ते म्हणतात, मूर्ती हे देवाचे सूक्ष्म रूप. आपले मन एकाग्र करण्यासाठी मनः शांती, संयम, विचारक्षमता, कार्यक्षमता आणि क्षमाशील वृत्ती वाढावी यासाठी मूर्तीची स्थापना आणि प्रार्थना आपण करतो. मानवी मनाची वाटचाल प्रगल्भतेच्या दिशेने व्हावी हाच त्यामागचा हेतू असावा. मानवी मन उच्चतम मानवतेच्या दिशेने चालावे यासारखी विचारप्रवण करणारी सुंदर वाक्ये लेखात आपल्याला आढळतात. ते उत्सवाच्या गलबल्याला आरसा दाखवतात. मिरवणुकीतील गैरप्रकार उन्माद, दिखाव्याची स्पर्धा, भपकेबाज पूजा याबाबत कठोर शब्दात नाराजी व्यक्त करतात. खरी भक्ती ही साधेपणात आहे, ही जाणीव त्यांनी वाचकासमोर अत्यंत सोप्या पण प्रभावी भाषेत मांडली आहे.

'आजच्या अर्जुनाचा अभ्यासयोग कोणता?' या लेखात गीतेतील अर्जुन आजच्या विद्यार्थ्यांच्या मनात उभा राहतो. मन अत्यंत चंचल आहे. त्याला नियंत्रणात ठेवणे महाकठीण बाब आहे. हे वाक्य वाचताना आपल्यालाही आपल्या धडपडीचे आणि चंचलतेचे भान येते. लेखक सांगतात-अभ्यास आणि वैराग्यात मनोग्रहाचे रहस्य आहे. यालाच अभ्यासयोग म्हणतात. हा विचार म्हणजे दिशाहीन तरुणाईसाठी दीपस्तंभच आहे.

गिरी सरांमधला चिंतनशील माणूस या ठिकाणी दिसतो. ते म्हणतात, वर्तमान स्थितीत अभ्यासयोग विद्यार्थ्याला उमजला नाही; कारण तो गुरुलाही उमजला नाही. त्यासाठी आपल्यातील दोष, उणीवा यांची जाणीव आपल्याला झाली पाहिजे. या ठिकाणी एका वक्त्याच्या भाषणातील एक सुंदर उदाहरण लेखकाने दिले आहे.

वेरूळ अजिंठ्याच्या पाषाणात जे शिल्प तत्कालीन कारागिरांनी निर्माण केले, त्यात त्या पाषाणमूर्तींच्या चेहेऱ्यावर हास्य, आनंद, दुःख, क्रोध, असूया, प्रेम इ. भावभावना दाखवण्यात ते कलाकार यशस्वी झाले आहेत. जर पाषाणात या भावभावना ओतता येतात, तर सजीव अशा विद्यार्थ्यांच्या मनात आवश्यक असे विचार शिक्षकाला का रुजवता येणार नाहीत? आजी आम्ही भौतिक सुखसुविधात अडकलो आहोत.




**पुस्तकाचे नाव:** घे गगन भरारी
**लेखकाचे नाव:** वसंत गिरी
**प्रकाशन:** यशोदिप प्रकाशन, पुणे
**पृष्ठ संख्या:** १७६
**किंमत:** २७०

आध्यात्मिक पातळीवर जाऊन समाधानाचा मार्ग आम्ही शोधतो का? जगा आणि जगू द्या यासारखी तत्वे आम्ही आचरणात आणतो का? यासारख्या मूलभूत तत्वांचा विचार या लेखात आपल्यापुढे सर मांडतात. आजच्या अर्जुनाला यशस्वी होण्यासाठी या तत्वांचा विचार करणे गरजेचे आहे. 'क्रोधावर नियंत्रण' या लेखात ते म्हणतात, क्रोध हे दुधारी शस्त्र आहे. त्याचा उपयोग कसा करायचा हे त्या त्या व्यक्तीवर अवलंबून असते.नकारात्मक वृत्तीच्या लोकांना क्रोध विनाशाकडे नेतो. सकारात्मकवृत्तीचे लोक आपला क्रोध संयमाने व्यक्त करतात. तर दुसऱ्या प्रकारचा क्रोध देशाभिमान रुजवतो, सत्कार्य करायला शिकवतो. आपली वृत्ती शांत, संयमी, समाधानी आणि आनंदी ठेवल्यास आपण तणावमुक्त जगू शकतो. 'सद्गुणाने होते जीवन सुंदर' हा लेख म्हणजे अंतःकरणातील आरसा. आपले प्रत्येक कर्म आपल्या व्यक्तिमत्वाची उंची वाढविते आणि घटविते सुद्धा. या एका वाक्यात जीवनाचे सार सामावले आहे. सद्गुण म्हणजे बाहेरून लावलेला रंग नाही; तो व्यक्तिमत्त्वाच्या गाभ्यातून उमलणारा सुगंध आहे, हे लेखक जाणवून देतात. या लेखात ते म्हणतात, सत्कार्यातील आनंदामागे अपार मेहनत आणि अविरत कष्ट असतात. ही माणसे त्यांच्या दैनंदिन जीवनात कमालीची प्रसन्न असतात.शुभ्र, स्वच्छ झऱ्यासारखे वाहत असतात. ही अवस्था ज्याला प्राप्त झाली त्याच्या अंतरंगात सत्याचा दीप तेवत असतो. तो आपली तो आपली सद्सद्विवेकबुद्धी जागृत ठेवून सत्याचा शोध घेत राहतो. त्याचे जीवन म्हणजे निखळ वास्तवतेची प्रयोगशाळा. तर 'युवाशक्तीच्या उत्साहाला दिशा हवी' या लेखात लेखकाने तरुणाईला थेट प्रश्न केला आहे.

'जीवनात संयम का हवा?' या लेखातील ते म्हणतात, युवावस्थेत विचारांची दिशा हवी, म्हणजे जीवनाची दशा होणार नाही. या लेखातील वाक्य भ्रष्ट मार्गाने मिळवलेल्या संपत्तीला कष्टाचा सुगंध येत नाही आत्मपरीक्षण करायला लावणारे आहे. तर प्रगल्भ विचारांची मानवी संपत्ती या आपल्या लेखात गिरी सर म्हणतात, युवाशक्ती ही देशाची मानवी संपत्ती आहे. हे आपल्या देशातील केंद्र व राज्य शासनालाही कळले पाहिजे. शिक्षणाकडे अनुत्पादक क्षेत्र म्हणून पाहण्याचा शासनाचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. शिक्षण क्षेत्र खाजगी क्षेत्राकडे सोपवून त्याचे बाजारीकरण करणे योग्य नाही. अशा परिस्थितीत भावी पिढीकडून भरीव कार्याची अपेक्षा कशी करणार ? या लेखातून लेखकाची तळमळ आणि शासनव्यवस्थेतील नाकर्तेपणाविषयीचा संताप तीव्र शब्दात व्यक्त झाला आहे.

आपल्या 'घे भरारी' या लेखात ते म्हणतात, मनुष्यदेह हे एक साधन आहे, त्याद्वारे आपण व्यापक व चिरंतन ठरणारी कार्यपूर्ती करणार आहोत. हे आपल्या स्मरणात राहील तर आपणास देहासक्ती (शरीराचे आकर्षण) राहणार नाही. आणि आपली अपेक्षित कार्यपूर्ती झाल्यावर देहाची किंमत काहीच नाही. या लेखात युवकांसाठी मोलाचा संदेश लेखक देतात. असे या पुस्तकातील एकूण ३१ लेख वाचकाला विचारप्रवण करतात.

या पुस्तकाची एक मोठी ताकद म्हणजे त्याची शैली. लेखक वाचकाला प्रवचन देत नाहीत; ते त्याच्याशी संवाद साधतात. त्यांचे लिखाण म्हणजे एखाद्या हृदय संवादासारखे आहे. या संवादात कधी व्यंगाची धार आहे, कधी आत्मीयतेची ऊब आहे, तर कधी अनुभवाच्या गाभ्याला भिडणारी गंभीरता आहे. लेख वाचताना लेखकावर असणारा स्वामी विवेकानंद तसेच देशभक्तांच्या विचारांचा प्रभाव जाणवतो.

ज्ञानाचा दीप जिथे लागतो तिथे अंधार नाहीसा होतो; आणि जे शिक्षक हा दीप लावतात ते स्वतःच प्रकाशरूप होतात. मला वाटते हे पुस्तक सर्वांसाठी आणि विशेषतः आजच्या तरुणाईने वाचणे आवश्यक ठरते. आजच्या काळात जेव्हा आपण वेग, स्पर्धा, उपभोगवाद यांच्या भोवऱ्यात अडकलो आहोत, तेव्हा 'घे भरारी' हे पुस्तक आपल्याला शांत पण ठाम आवाजात सांगते,थांब जरा स्वतःकडे बघ विचार करआणि जीवनाचे खरे ध्येय शोध. त्यांच्या इतर पुस्तकांप्रमाणेच वाचक या पुस्तकाचेही मनापासून स्वागत करतील अशी खात्री आहे.

# ग्रहसंकेत

## (रविवार, ७ जून ते शनिवार, १३ जून २०२६)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार
'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो. कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र.९४२३७५८४०१)

✻ **रविवार, ७ जून-** भानुसप्तमी, भद्रा १५:९ पर्यंत, पंचक ✻ **सोमवार, ८ जून-** कालाष्टमी, मृगेर्कः दुपारी १.३२ वाहन-बेडूक, जागतिक महासागर दिन ✻ **मंगळवार, ९ जून-** क्रांतिसूर्य बिरसा मुंडा पुण्यदिन ✻ **बुधवार, १० जून-** जागतिक दृष्टिदान दिन, हातकणंगले उरूस जि. कोल्हापूर ✻ **गुरुवार, ११ जून-** कमला एकादशी, श्री सानेगुरुजी स्मृतिदिन, पंचक समाप्ती सकाळी ८.१६ पर्यंत ✻ **शुक्रवार, १२ जून-** प्रदोष, बालकामगार विरोधी दिन ✻ **शनिवार, १३ जून-** शिवरात्री

**मुहूर्त:-** ✻ **साखरपुडा-**९ जून (१०नंतर), १० जून (१४ पर्यंत), ११ जून ✻ **बारसे-** ७ जून (१५ नंतर), १० जून (१४ पर्यंत) ✻ **जावळ-** १० जून (९ नंतर), ११ जून ✻ **गृहप्रवेश-** १० जून (१४ पर्यंत), ११ जून

### मेष :- मनासारख्या घटना

सुखस्थानी मंगळवारी शुक्र- गुरुची होणारी युती सौख्यदायी घटना घडविणारी आहे. स्थावर, वाहन सुख लाभेल. नोकरी, व्यवसायात मनासारख्या घटना घडतील. उत्साह, धडाडीने विविध कामे मार्गी लावू शकाल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अपेक्षित संधी लाभतील. नव्या विचारांना चालना मिळेल. शुभ ता. ९, ११

### वृषभ:- नव्या कामांना गती

पराक्रमस्थानी शुक्र गुरुची होणारी युती कलागुणांमध्ये प्रगती करणारी आहे. अनावश्यक खर्च टाळावेत. आत्मविश्वास वाढेल. नव्या कामांना गती मिळेल. सुसंधीचा लाभ उठवावा. गृहनिर्माण, गुढ विद्येत प्रगती होईल. अपेक्षित घटना घडतील. फार दगदग करू नये. यांत्रिक क्षेत्रात अपेक्षित यश मिळेल. शुभ ता. ९, ११, १२

### मिथुन:- समाधानकारक घटना

मंगळवारी धनस्थानी शुक्र- गुरुची युती होत आहे. त्यामुळे आर्थिक बाबतीत समाधानकारक घटना घडतील. व्यवहार चातुर्याने मनासारखी प्रगती करून घ्याल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. नव्या विचारांना चालना मिळेल. अपेक्षित कामे होतील. सुसंधीचा लाभ उठवावा. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता वाढेल. शुभ ता. ११, १२

### कर्क:- सुखाचा वर्षाव

राशीत होणारी शुक्र- गुरुची युती सुखाचा वर्षाव करणारी आहे. कर्मस्थ मंगळामुळे वैद्यकीय, मेकॅनिकल अशा क्षेत्रात विशेष अनुकूलता राहील. प्रशासन सेवेत कामाची जबाबदारी वाढेल. दूरचे प्रवास घडतील. गुढशास्त्रात मनासारखी प्रगती घडेल. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. ९, ११

### सिंह:- मनासारखी प्रगती

व्ययस्थानी शुक्र- गुरुची होणारी युती छान-छोकीसाठी खर्च वाढवणारी आहे. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. माहिती तंत्रज्ञान, वाहतूक अशा क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. प्रशासन क्षेत्र विशेष अनुकूल आहे. योजलेली कामे विचारपूर्वक करावीत. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अपेक्षित संधी लाभतील. अनुकूलता वाढेल. शुभ ता. ११, १२

### कन्या:- स्पर्धांमध्ये यश

लाभस्थानी गुरु शुक्राची होणारी युती आर्थिकबाबतीत सुखदायी प्रगतीच्या घटना घडविणारी आहे. मंगळ आठवा असल्याने प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. कमिशनवर चालणाऱ्या व्यवसायात प्रगती होईल. स्पर्धांमध्ये यश मिळेल. नव्या योजना विचारपूर्वक राबवाव्यात. शुभ ता. ८, ११

### तुला:- संधी पुन्हा लाभतील

कर्मस्थानी शुक्र- गुरुची होणारी युती कार्यक्षेत्रात प्रगती करणारी आहे. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. सरकारी कामांसाठी विलंब लागेल. नोकरीत मनासारख्या घटना घडतील. हितशत्रूंवर मात कराल. हातून निघून गेलेल्या संधी पुन्हा लाभणार आहेत. अडचणीतून मार्ग निघत जाईल. शुभ ता. ९, १२

### वृश्चिक:- ऊत्साववर्धक घटना

भाग्यस्थानी शुक्र- गुरुची होणारी युती भाग्योदयकारक घटना घडविणारी आहे. राशी स्वामी मंगळ श्रेष्ठस्थानी आहे. त्यामुळे उत्साहवर्धक घटना घडतील. यांत्रिक क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. अडचणीतून मार्ग निघेल. उपजत काला-गुणांचा विकास होईल. आत्मविश्वास वाढेल. योजलेल्या कामात मनासारखे यश मिळेल. शुभ ता. ९, ११

### धनु:- नव्या संधी लाभतील

अष्टमात गुरु-शुक्राची होणारी युती अचानक धनलाभ वाढविणारी आहे. शिक्षण अनुभवातून मनासारखी प्रगती घडेल. नव्या संधी लाभतील. सरकारी कामे मनासारखी होतील. अडचणीतून वेळीच मार्ग निघत जाईल. अनुकूलता वाढत जाईल. सुसंधीचा वेळीच सतत उपयोग करावा. नव्या विचारांना चालना मिळेल. शुभ ता. ११, १२

### मकर:- कौटुंबिक सौख्य

सप्तमात गुरु- शुक्राची होणारी युती कौटुंबिक जीवनात सौख्य वाढवणारी आहे. चतुर्थात मंगळ स्वराशीत आहे. त्यामुळे स्थावरबाबतीत सौख्याच्या घटना घडतील. अडचणीतून मार्ग निघाल्याने समाधान लाभेल. फार दगदग करू नका. दूरचे प्रवास घडतील. नव्या कामांना गती मिळेल. अडचणी सुटत जातील. शुभ ता. ९, ११

### कुंभ:- अपेक्षित कामे होतील

षष्ठात होणारी गुरु-शुक्राची युती अंगीकृत कार्यात प्रगती करणारी आहे. नव्या विचारांना चालना मिळेल. अडचणीतून वेळीच मार्ग निघेल. अपेक्षित कामे होतील. यांत्रिक क्षेत्रात प्रगती घडेल. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. फार दगदग करू नका. सुसंधीचा लाभ घ्यावा. अनुकूलता वाढेल. शुभ ता. ९, ११

### मीन:- आर्थिक सुधारणा

राशी स्वामी गुरुची मंगळवारी पंचमात शुक्राशी युती होत आहे. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. चिकाटीने केलेली वाटचाल आता शुभ फालदायी ठरेल. नव्या संधीचे स्वागत करावे. सर्व प्रतिकूलतेवर मात कराल. अनावश्यक खर्च टाळावा. वाहनसौख्य लाभेल. वादाचे प्रसंग टाळावेत. शुभ ता. ९, ११

!! शुभ भवतु !!

पान २ वरून

## बांगलादेशी घुसखोरी : देशासमोरील...

**बांगलादेशी घुसखोरी दीर्घकालीन राष्ट्रीय आव्हान :** आजमितीला भारतातील बांगलादेशी घुसखोरांची संख्या पाच ते सहा कोटींच्या घरात असावी. त्यांना पकडून पुन्हा बांगलादेशमध्ये पाठवणे, हे तसे दीर्घकालीन राष्ट्रीय आव्हानच आहे.

त्यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकारे, पोलीस, गुप्तचर संस्था, सीमा सुरक्षा दल, स्थानिक प्रशासन आणि नागरिक यांना एकत्रितपणे, सातत्याने प्रयत्न करावे लागतील. सीमा अधिक सुरक्षित करणे, बनावट कागदपत्रांच्या रॅकेटवर कारवाई करणे, अवैध वसाहती हटवणे, बायोमेट्रिक नोंदणी करणे आणि रोजगार देणाऱ्या अवैध नेटवर्कवर कठोर कारवाई करणे या उपाययोजनांची अंमलबजावणी दीर्घकाळ प्रभावीपणे झाली; तरच भारतासमोरील या गंभीर राष्ट्रीय सुरक्षा आव्हानावर निर्णायक नियंत्रण मिळवणे शक्य होईल.

पान ३ वरून

## अनौपचारीक गौरव



परंपरागत चालत आलेल्या पद्धती आता सर्वच ठिकाणी बदलण्याची गरज आहे. याचा अर्थ जुन्या सर्वच परंपरा बदलविणे होत नाही. माणसांची एकमेकांशी असलेली नाती आता औपचारिकतेच्या चौकटीत अडकलेली दिसतात. जुन्या काळात माणसांचे एकमेकांशी असलेले संबंध निखळ व अतिशय अनौपचारिक असायचे. पाहुणे न सांगता घरी येणे, मित्राला सहज जेवायला सोबत घरी घेऊन जाणे, मनात आले म्हणून मित्राकडे अचानक जाऊन त्याला आश्चर्याचा सुखद धक्का देणे यासारख्या बाबी समाजात रूढ होत्या. आता अचानक न कळविता मित्राकडे जाणे ही कदाचित कपाळावर आठी आणणारी बाब आहे.


आजकालच्या जीवन पद्धतीमुळे हे झालेय. पण तरीही तुला वेळ आहे का?, आम्ही आलो तर चालेल का?, आम्ही आल्याने अडचण तर नाही ना होणार? यांसारखे प्रश्न मित्रांच्या बाबतीत विचारावे लागत असतील तर ही औपचारिकतेची पराकोटी आहे, असे मला वाटते. आजकाल हे असे वागण्याची इच्छा नसतानाही ज्या प्रकारच्या प्रतिक्रिया मिळतात त्यामुळे कधी कधी इलाज उरत नाही. या अशा प्रकारच्या औपचारिकतेमुळे नाते संबंधांमधील निखळता संपुष्टात येत आहे. तीच औपचारिकता समाजमाध्यमे वापरताना लोक सांभाळतात. माझ्या पोस्टला कोण लाईक करतो यावर त्याचा माझ्याशी असलेला स्नेह ठरविला जातो. समाजमाध्यमांवर लिहिलेल्या गोष्टी औपचारिकतेने लोक फार मनाला लावून घेतात. समाजमाध्यमाच्या समूहावर भांडणे, वादविवाद करणे व समूह सोडून देणे वगैरे गोष्टी लोक तळमळीने करतात. माणसा-माणसातील अनौपचारिक गोडवा असलेले प्रत्यक्ष नाते आता समाजमाध्यमांच्या औपचारिक प्रक्रिये ध्ये अडकून गेले आहे. पारिवारिक असो अथवा कार्यालयीन, सर्वच पातळीवर आता आपल्याला काम करण्याचा व व्यवस्था राबविण्याचा अनौपचारिक दृष्टिकोन स्वीकारण्याची गरज आहे. त्यामुळे मुख्य कामाकडे आपण आपले लक्ष केंद्रित करू शकू व औपचारिकता पाळण्याचे दडपण विनाकारणचा तणाव निर्माण करणार नाही.

अनेक खाजगी संस्थांनी ही अनौपचारिकतेची पद्धत स्वीकारली आहे, ज्यामध्ये कामास सर्वात जास्त महत्त्व दिले जाते. तेथे तर सर्वजण एकमेकांना एकेरी व पहिल्या नावानेच हाका मारतात.

आपल्याला कदाचित तेवढे जमणार नाही, परंतु अनावश्यक किंवा कालबाह्य झालेल्या बाबी सोडायला आता हरकत नाही.० अन्यथा वडिलांना आपल्या मुलांशी बोलायलादेखील अपॉईंटमेंट घ्यावी लागेल; उगाचच प्रायव्हसी जपता जपता संवादांचे पूल उद्ध्वस्त होतील आणि त्या दिवशी आपण सारे यंत्रे झालेले असू.

## तत्वदर्शन डॉ. राजेंद्र डोळके

# उपनिषदांची थोरवी



विश्वधर्म प्रतिपादन करणारी उच्चतम तत्त्वे ग्रथित करणारे तत्त्वज्ञान ग्रंथ म्हणून उपनिषदांचे महत्त्व अनन्यसाधारण मानले जाते. वैदिक धर्म आणि वैदिक तत्त्वज्ञान या दोहोंचे उपनिषदे हे आधारभूत ग्रंथ असून खरा धर्म म्हणजे आत्मज्ञान होय. हे तत्त्व साहित्यामध्ये अत्यंत प्रभावशालीपणे प्रतिपादिले आहे. वेदकाळापासून उपनिषद काळाकडे जसजसे आपण वळतो तसतसे निसर्गजिज्ञासेकडून आत्मजिज्ञासेकडे मनुष्याचे चित्र वेधत गेल्याचे चित्र आपल्या निदर्शनास येते. सृष्टीतील निरनिराळ्या शक्ती या देवता आहेत असे म्हणून त्यांचे स्तवन करणे हे ऋग्वेदाचे प्रमुख उद्दिष्ट होते.

यजुर्वेदात यज्ञयागाला महत्त्व मिळाले तर सामवेदात ऋचांना गाण्याच्या चाली लावल्या आहेत. अथर्ववेद हा तर बहुजनांचा ग्रंथ समजला जातो. यात जारण, मारण, तांत्रिक गंडेदोरे, मंत्र वगैरेंचे वर्णन आहे. चार वेदांनंतर ब्राह्मण ग्रंथांचा उल्लेख येतो. सामवेद व यजुर्वेद यांच्यामुळे यज्ञयागादिकास ठरीव स्वरूप प्राप्त झाल्यानंतर त्या यज्ञयागादिकाविषयी यथार्थ विवेचन करून त्याचे स्वरूप व महत्त्व स्पष्टपणे प्रतिपादन करण्यासाठी ब्राह्मण ग्रंथ निर्माण झाले. या ग्रंथांध्ये प्राचीन काळातील

देवतादिकांच्या गोष्टी, समाजात रूढ असलेल्या धार्मिक समजुती, जगताच्या उत्पत्तीविषयीचे विचार यांचाही अंतर्भाव केलेला दिसून येतो. परंतु या ग्रंथांचा खरा प्रतिपाद्य विषय यज्ञकर्म हाच असल्यामुळे ब्राह्मण ग्रंथ प्रायः यज्ञप्रधान म्हणजे कर्मकांडपरच समजले जातात. असे जरी असले तरी सृष्टीचे अगम्य असे मूलतत्त्व शोधण्याचा प्रयत्न या काळात थांबला होता, असे दिसून येत नाही. उलट त्या तत्त्वज्ञानाला खरा उजाळा देण्याच्या प्रयत्नातून त्या विषयाचे एकाग्रचित्ताने अवलोकन करता यावे म्हणून काही तत्त्वज्ञांनी समाजात राहण्याचे टाळून अरण्यवास पत्करला. अरण्यात राहून ते तात्त्विक चर्चा करू लागले. या तत्त्वचिंतनातून जे ग्रंथ निर्माण झाले त्यास 'आरण्यके' असे म्हणतात. आरण्यके आणि उपनिषदे यांचा विषय प्रायः एकच म्हणजे तत्त्वज्ञान किंवा आत्मज्ञान असल्यामुळे दोघांचाही अभ्यास एकत्रच केला जातो.

उपनिषदांना 'वेदांत' असे म्हणतात. या नामकरणामागे दोन कारणे आहेत. एक तर यांचे स्थान वेदांच्या अंती म्हणजे शेवटी आहे म्हणून त्यांना वेदांत (वेद+अंत) असे म्हटले जाते. आणि दुसरे म्हणजे सर्व वेदांतील ज्ञानाचे सार उपनिषदांत सामावले आहे, म्हणून वेदांत. वेदांचे कर्मकांड आणि ज्ञानकांड असे दोन विभाग पडतात. संहिता, ब्राह्मणे आणि आरण्यके यात प्रामुख्याने कर्माबद्दलचे विवेचन असल्यामुळे त्यांचा अंतर्भाव कर्मकांडात केला आहे. 'ज्ञाना'बद्दलचे विवेचन उपनिषदांत असल्यामुळे उपनिषदांना 'ज्ञानकांड' म्हटले जाते. 'विद्' म्हणजे जाणणे, मिळविणे अर्थात ज्ञान मिळविणे. उपनिषदांचा अभ्यास झाला तर सर्व वेदांचा अभ्यास झाला, असे समजण्यात येते. म्हणून उपनिषदांचे आपल्या सर्व प्राचीन ग्रंथांत एक महत्त्वपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे.

भारतीय तत्त्वज्ञान व संस्कृती यांचा पाया म्हणून उपनिषदांबरोबरच श्री वेदव्याससूत्रे (ब्रह्मसूत्रे) आणि भगवद्गीता या ग्रंथांचाही विचार केला जातो. यांनाच 'प्रस्थानत्रयी' असेही म्हणतात. यात उपनिषदे प्रथम स्थानावर आहेत. दुसऱ्या स्थानावर भगवद्गीता आहे.

'सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदन:' उपनिषद् रुपी गाईचे दोहन भगवान श्रीकृष्णाने पार्थ-वत्साच्या निमित्ताने केले असून भगवद्गीतेच्या रूपाने दुग्धामृत काढले. अर्थात भगवद्गीतेला उपनिषदांचे सार म्हटले आहे. तिसरा प्रस्थानग्रंथ म्हणजे बादरायण-व्यास विरचित ब्रह्मसूत्रे हा आहे. यात साधारणतः निरनिराळ्या उपनिषदांतील विरोधी वाक्यांचा समन्वय करण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रस्थानत्रयींवरूनच भारतीय वैदिक धर्म किंवा दर्शन संपूर्णपणे आढळून येते. परंतु गीता आणि ब्रह्मसूत्रे हे उपनिषदांवर आधारलेले असल्यामुळे उपनिषदांचे महत्त्व विशेष आहे. अर्थात प्रस्थानत्रयी म्हणजे खरोखरी उपनिषदेच.

उपनिषदांत अनेक ऋषींना सहज स्फुरलेल्या विचारांचा संग्रह संग्रहित केला असून या ऋषींच्या अंत:करणांमध्ये आत्मसाक्षात्कारामुळे उचंबळून आलेले विचार शक्य तितक्या निर्व्याज, साध्या सरळ आणि सहजसुंदर भाषेत व्यक्त केले आहेत. बहुतांश उपनिषदांचे स्वरूप हे 'शिष्याने विचारलेला प्रश्न' आणि 'गुरूने त्यास दिलेले उत्तर' असे प्रश्नोत्तररूप अथवा संवादरूप आहे. काही ठिकाणी हे स्वरूप वादविवादात्मक पद्धतीही धारण करते. संपूर्ण उपनिषदांचा संदेश सुरुवातीच्या दोन श्लोकांतच सांगितला आहे-

'**ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत।**
**तेन त्यक्तेन भुंजीथाः मागृधः कस्यचिद्धनम ।।** (१-१) **कुर्वन्नेवेह कर्माणि जीजी विषेच्छतं समा:। एवं त्वयि नान्यथेतोऽस्ति नर कर्म लिप्यते नरे ।।** (१-२)'

या जगातील सर्व वस्तू ईश्वराने व्यापिल्या आहेत. म्हणून आसक्तीचा त्याग करून किंवा त्या (वस्तू) ईश्वराला समर्पण करून त्यांचा उपभोग घ्या. कोणाच्याही धनाचा लोभ करू नका. इहलोकी कर्मे करीतच शतायुषी होण्याची इच्छा बाळगावी. असा कर्म करीत राहिल्यास तुला (साधकाला) कर्म केल्याचा दोष लागणार नाही. उपनिषदांमध्ये अभ्यास करण्याजोगे अनंत मुद्दे आहेत.

एक जन्म कमी पडेल, एवढी सामग्री त्यात उपलब्ध आहे. उपनिषदांतील विचार हे महान द्रष्ट्यांच्या अंतःकरणात उद्धृत झालेले विचार आहेत. हे विचार जर अंगी बाळगले तर माणसाची पशुत्त्वाकडून देवत्वाकडे वाटचाल होईल हे नक्की. आपण नेहमी दुसऱ्याचे भले का करावे? कारण आपण सर्व एक आहोत. आपण दुसऱ्याचे भले करतो तेव्हा वास्तविक आपण आपलेच भले करतो. दुसऱ्याला दुखवितो तेव्हा वास्तविक आपण स्वतःलाच दुखवित असतो. याप्रमाणे जगातील कोणत्याही धार्मिक वाङ् यापेक्षा उपनिषदांतच बुद्धिनिष्ठ नीतिविचार अधिक प्रमाणात आढळतात.

बहुधा यामुळेच पाश्चात्त्यांनादेखील उपनिषद वाङ्मयाने भुरळ घातली असावी. दाराशिकोह याने इ. स. १६५७ मध्ये 'सिरे अकबर' या शीर्षकाखाली उपनिषदांचा पारशी भाषेमध्ये अनुवाद करून घेतला. या पर्शियन भाषेतील भाषांतराचे अनेक पाश्चात्त्य अभ्यासकांनी युरोपीय भाषां ध्ये भाषांतर केले.

अँकवेतील द्युपेरॉं या फ्रेंच अभ्यासकाने इ. स. १८०२ मध्ये उपनिषदांचे लॅटिन भाषेत भाषांतर केले. पॉल डसन नावाच्या फ्रेंच तत्त्वज्ञाने 'सिक्स्टी उपनिषदस ऑफ द वेदा' या नावाचे पुस्तक लिहिले आहे. मॅक्समुल्लरने उपनिषदे ही भारतीय तत्त्वज्ञानाचा आदिस्त्रोत आहे, असे म्हटले आहे. याच परंपरेत आपल्याला रोमा रोलॉं, विल्यम जोन्स, शॉपेनहार यांचा उल्लेख करावा लागतो. शॉपेनहार म्हणतो-

'उपनिषदांतील प्रत्येक वाक्यापासून गंभीर, नावीन्यपूर्ण व उदात्त विचार निर्माण होतात. उच्च, पवित्र आणि कळकळीच्या भावनांनी ही उपनिषदे परिपूर्ण आहेत. ती वाचू लागले म्हणजे हिंदी वातावरण आणि तशाच तऱ्हेचे मूलग्राही विचार आपल्या भोवती जमा होतात. सर्व जगात उपनिषदांच्या अभ्यासाइतका कल्याणकारक आणि मनुष्याला उन्नत करणारा दुसरा कोणताही अभ्यास नाही. सर्व आयुष्यभर त्याने मला समाधान दिले आहे व मरतानाही तो मला समाधान देईल.'

पान ३ वरून

## सूर्य आणि ७- १२

११) अर्काय नम: यामुळे शरीरांतर्गत दोषांचा नाश होऊन शुद्धीकरण होते आणि
१२) भास्कराय नम: मुळे तेज आणि तेजातच विरून जाणे अर्थात लय होणे. १२ आणि ७ चा हा एकत्रित परिणाम निर्मिती-स्थैर्य-लय किंवा ब्रह्मा-विष्णू-महेश यांच्या कार्यासारखेच आहे.
याप्रमाणे सुरुवातीचे आरोही ७ मंत्र निर्मिती आणि पुढील ५ अवरोही मंत्र स्थैर्याचा अनुभव देतात. १२ आणि ७ चा हा संबंध म्हणजे १२ गुणीले ७ बरोबर ८४. यातून सृष्टीतील ८४ लक्ष योनींचा आत्मा, एकूणच जीवनचक्राचा सूक्ष्म संकेत हा विचार भारतीय तत्त्वज्ञान परंपरेशी सुसंगती सूचित करतो. याप्रमाणे विचार केल्यास सूर्यनमस्कार हा केवळ शारीरिक व्यायाम नसून तो काल, प्राण आणि चेतना यांचा एकत्रित प्रयोग आहे.

पान ४ वरून

## मानवी विकासाच्या मॉडेलपुढे प्रश्नचिन्ह

परिणामी मृत्युदर वाढतो, आरोग्य समस्या तीव्र होतात आणि अर्थव्यवस्थेवरही परिणाम होतो. शहरी भागांत ही परिस्थिती आणखी बिकट आहे. अनियंत्रित शहरीकरणामुळे शहरांचे नैसर्गिक संतुलन ढासळले आहे. काँक्रीटच्या जंगलांनी झाडांची जागा घेतली आहे. बहु जली इमारती, डांबरी रस्ते आणि वाहनांची वाढती संख्या उष्णता अधिक साठवून ठेवते. रात्रीसुद्धा तापमान कमी होत नाही. या प्रक्रियेला 'अर्बन हीट आयलंड' असे म्हटले जाते. गरीब, मजूर आणि झोपडपट्ट्यांमध्ये राहणारे नागरिक या परिस्थितीचा सर्वाधिक फटका सहन करतात. त्यांच्याकडे ना पुरेशी निवारा व्यवस्था असते, ना थंड वातावरणात राहण्याची साधने. हवामानातील या टोकाच्या बदलांचा परिणाम केवळ दैनंदिन जीवनापुरता मर्यादित नाही. देशाच्या अर्थव्यवस्थेवरही त्याचे गंभीर परिणाम होत आहेत.(लेखक पर्यावरण अभ्यासक आहेत.)

पान ५ वरून

## पऱ्हाटीच्या नख्खीतून आला कापूस फुलून...



लेकी तर मायच्या अंगाखांद्यावर खेळणारच असा सारा भाव नोका म्हणू **पऱ्हाटीले। होते बोंड्याईचा भार।। लेकुरवाळीच्या त्या लेकी। खेळती आंगाखांद्यावर।।** या दोन ओळींत व्यक्त झाला. बोंडांनी पऱ्हाटीचे झाड लदबदून यावे, त्या झाडाकडे शेतकऱ्याने पोरीवरच्या मायेने पाहावे, एवढे हळवे भाव या ओळींमध्ये दडले आहेत.

आता या साऱ्या पृष्ठभूमीवर शेवटच्या ओळी येतात-

**पऱ्हाटीच्या नख्खीतून। आला कापूस फुलून ।।**
**पाची बोटावर किस्न। लोनी राहेला झेलून।।**- इथे कृष्णकथेचा संदर्भ आला आहे. आपल्या पोरीच्या कडेवरचे पोर कोणत्याही माय-बापाला आजी-आजोबाला कृष्णच वाटणार. मायेने- ममतेने वाढविलेल्या पऱ्हाटीच्या बोंडांतून कापूस फुलून येण्याच्या स्थितीचे येथे वर्णन केले आहे. पऱ्हाटीच्या नख्खीतून फुलून आलेला कापूस कसा? तर यशोदेच्या कडेवर पाचही बोटांत लोण्याचा गोळा घेऊन कृष्ण जसा दिसतो तसा! फुललेला कापूस असलेली पऱ्हाटीची नख्खी चिमुकल्या पोराच्या इवल्याशा तळहातावर लोणी घेतल्यासारखी दिसते.

कृष्णाच्या हातातील लोण्याच्या गोळ्यासारखा कापूस! पऱ्हाटी कशी तर पोटच्या पोरीसारखी, कृष्ण कडेवर घेतलेल्या यशोदेसारखी! कविता इथे संपते. पिता आणि मुलगी यांच्या नात्यातले नाजूक, हळवे भावसंदर्भ शेतकरी आणि पऱ्हाटी यांच्यातही गुंफलेले असतात. शेतकऱ्याला मुलगी आणि पऱ्हाटी दोन्हीही सारख्याच.

बापाच्या मायेने पऱ्हाटीला जीव लावणाऱ्या शेतकऱ्याच्या भावनांचा शब्दांत न मावणारा आशय या कवितेत आहे. बोलीतल्या पऱ्हाटी या शब्दाचा शेतकऱ्यांच्या आयुष्यातला सांस्कृतिक संदर्भ असा शब्दांच्या पलीकडचा आहे, शब्दातीत आहे. कवी विठ्ठल वाघांची 'खापराचे दिवे' ही कविता लक्षणीय आहे. त्यातील चार ओळी अशा आहेत -

**आमी जलमलो मातीत किती होनार गा माती?**
**खापराच्या दिव्यात या कधी पेटणार वाती?**
**फुलवल्या कापसाले चंद्र चोरू चोरू पाहे**
**तरी माय मावलीची मांडी उघळीच राहे..**

या ओळींत डोळ्यात अंजन घालणारे वास्तव दडले आहे. काळ्या मातीत अख्खे आयुष्य पेरणाऱ्या शेतकऱ्यांची जगण्याची अक्षरशः माती होत असते. कापसाच्या वातीचा उजेड आणि कापसाच्या धाग्यांचे वस्त्र दोन्ही त्याच्या वाट्याला येत नाही.

दरवर्षी प्रचंड काबाडकष्ट करून पोटच्या मुलीला जीव लावावा तसा जीव लावून शेतकरी कापूस फुलवतो चांदीसारखा कापूस विकूनही घरी दारिद्र्य कायमच राहते. बोली विलक्षण अर्थप्रवाही असते, बोली बहुप्रसवा असते बोलीतील अनेक शब्द अर्थप्रसरणशील असतात. संस्कृतीचे जतन बोली करीत असते.

बोली म्हणजे एक प्रकारे संस्कृतीचे जतन आणि संवर्धनही असते. बोलीतील शब्दांचे जतन करणे म्हणजे भाषा व संस्कृतीचे संवर्धन, संरक्षण करणे होय.

वेध सुजाता बाबर

# ‘दुसरी पृथ्वी’ शोधण्याची शर्यत

**मानवाने आकाशाकडे पाहताच, एक स्वप्न सतत त्याच्या मनात घोळत राहिले. आपल्यासारखी ‘दुसरी पृथ्वी’ कुठेतरी अस्तित्वात असेल का? विश्वाच्या अथांग विस्तारात ‘पृथ्वी’ ही एकमेव जीवनधारण करणारी जागा आहे की अशा असंख्य पृथ्वीसदृश्य जागांचा पसारा तार्‍यांभोवती पसरलेला आहे? हा प्रश्न आधुनिक खगोलशास्त्राच्या केंद्रस्थानी आहे. गेल्या काही दशकांत विज्ञानाने इतकी झपाट्याने प्रगती केली की आता हा प्रश्न केवळ कल्पनाविलास राहिलेला नाही. उलट, ‘दुसरी पृथ्वी’ शोधण्याची शर्यत ही जगातील सर्वांत मोठ्या वैज्ञानिक मोहिमांपैकी एक झाली आहे.**

एकेकाळी आपल्या सौरमालेबाहेरील ग्रहांच्या अस्तित्वाबाबतच खात्री नव्हती. पण १९९०च्या दशकात पहिल्या बाह्यग्रहाचा शोध लागल्यानंतर खगोलशास्त्रात नवे पर्व सुरू झाले. आजपर्यंत पाच हजारांहून अधिक बाह्यग्रहांचा शोध लागला आहे. यांपैकी अनेक ग्रह आकाराने पृथ्वीसारखे आहेत, तर काही ग्रह त्यांच्या तार्‍याभोवती अशा अंतरावर फिरतात की तेथे द्रवरूप पाणी अस्तित्वात राहू शकते. हेच ग्रह पृथ्वीसदृश्य मानले जातात. या शोधामागील मुख्य कल्पना म्हणजे निवासयोग्य क्षेत्र. तार्‍याभोवतीचा असा पट्टा, जिथे तापमान ना फार जास्त ना फार कमी असते आणि ग्रहाच्या पृष्ठभागावर द्रवरूप पाणी टिकू शकते, त्यालाच निवासयोग्य क्षेत्र म्हणतात. पृथ्वी आपल्या सूर्याच्या अशाच एका आदर्श पट्ट्यात स्थित आहे.

जर पृथ्वी सूर्याजवळ असती तर महासागरांची वाफ झाली असती. जर पृथ्वी अधिक दूर असती तर संपूर्ण ग्रहच गोठून गेला असता. त्यामुळे ‘जीवनासाठी योग्य अंतर’ हा अत्यंत महत्त्वाचा घटक ठरतो. मात्र केवळ योग्य अंतरच पुरेसे नसते. ग्रहाचे वस्तुमान, वातावरण, चुंबकीय क्षेत्र, फिरण्याचा वेग आणि त्या तार्‍याचे स्वरूप हे सर्व घटकही जीवनाच्या शक्यतेवर परिणाम करतात. उदाहरणार्थ, मंगळ हा ग्रह काही प्रमाणात निवासयोग्य क्षेत्रात असूनही वातावरण विरळ असल्यामुळे तेथे द्रवरूप पाणी टिकत नाही. दुसरीकडे शुक्र हा आकाराने पृथ्वीसारखाच असला, तरी तीव्र हरितगृह परिणामामुळे तेथील तापमान सुमारे ४६० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचते. त्यामुळे ‘दुसरी पृथ्वी’ शोधणे म्हणजे फक्त पृथ्वीएवढा ग्रह शोधणे नव्हे, तर पृथ्वीसारखी संतुलित परिस्थिती शोधणे होय. या शोधामध्ये ‘केप्लर अंतराळ दुर्बिणी’ने क्रांतिकारक भूमिका बजावली आहे. या दुर्बिणीने हजारो तार्‍यांवर सतत लक्ष ठेवून त्यांच्या प्रकाशात झालेली सूक्ष्म घटही मोजली आहे. ग्रह तार्‍यासमोरून जाताना तार्‍याचा प्रकाश किंचित कमी होतो. यावरून ग्रहाचे अस्तित्व ओळखले जाते. याच पद्धतीमुळे असंख्य नवीन ग्रह सापडले. त्यानंतर ‘ट्रान्झिटिंग एक्सोप्लॅनेट सर्व्हे सॅटेलाईट’ मोहिमेने पृथ्वीच्या तुलनेने जवळच्या तार्‍याभोवती फिरणार्‍या ग्रहांचा शोध सुरू केला. आज या शर्यतीत सर्वाधिक आशा निर्माण केली आहे ‘जेम्स वेब अंतराळ दुर्बिणी’ने. ही दुर्बिण ग्रहांच्या वातावरणाचा अभ्यास करू शकते. ग्रहाच्या वातावरणातून तार्‍याचा प्रकाश जाताना काही विशिष्ट तरंगलांबी शोषल्या जातात. त्यावरून वातावरणात कोणते वायू आहेत याचा अंदाज लावता येतो. उदाहरणार्थ ऑक्सिजन, मिथेन किंवा पाण्याची वाफ यांसारखे वायू जीवनाच्या शक्यतेचे संकेत मानले जातात. अलीकडच्या काळात ‘ट्रॅपिस्ट-१’ प्रणाली या तार्‍याभोवती फिरणार्‍या ग्रहांनी विशेष लक्ष वेधले आहे. या प्रणालीमध्ये पृथ्वीच्या आकाराचे सात ग्रह आहेत आणि त्यांपैकी काही निवासयोग्य क्षेत्रात आहेत. हे ग्रह पृथ्वीपासून सुमारे ४० प्रकाशवर्षे दूर आहेत. वैज्ञानिकांच्या मते या ग्रहांवर महासागर किंवा वातावरण असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे ‘प्रॉक्सिमा सेंटॉरी बी’ ग्रह आपल्या सर्वांत जवळच्या तार्‍याभोवती फिरत असून तोही निवासयोग्य क्षेत्रात असण्याची शक्यता आहे. मात्र ‘दुसरी पृथ्वी’ शोधणे हे काम अत्यंत कठीण आहे.

ग्रह स्वतः प्रकाश उत्सर्जित करत नाहीत, त्यामुळे तार्‍याच्या प्रखर प्रकाशात ते जवळजवळ अदृश्य होतात. पृथ्वीचा विचार केला तर दूरवरून पाहताना सूर्याच्या तुलनेत पृथ्वीचा प्रकाश अब्जपट कमी असेल. त्यामुळे पृथ्वीसारखा ग्रह शोधण्यासाठी अत्यंत संवेदनशील उपकरणांची आवश्यकता असते.



‘दुसरी पृथ्वी’ शोधण्यामध्ये आणखी एक मोठे आव्हान म्हणजे ग्रहांच्या वातावरणातील बदल समजून घेणे. पृथ्वीवरील जीवन अब्जावधी वर्षांच्या उत्क्रांतीतून निर्माण झाले. या काळात पृथ्वीचे वातावरणही सतत बदलत गेले. सुरुवातीला पृथ्वीवर आजसारखा ऑक्सिजन नव्हता; वातावरण मुख्यतः मिथेन, कार्बन डायऑक्साइड आणि इतर वायूंनी भरलेले होते. सूक्ष्मजीवांच्या प्रकाशसंश्लेषण प्रक्रियेमुळे हळूहळू ऑक्सिजन वाढीस लागला आणि त्यातूनच जटिल जीवनाचा विकास झाला. त्यामुळे वैज्ञानिक आता एखाद्या ग्रहावर सध्याच्या पृथ्वीसारखे वातावरण शोधण्यापेक्षा जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यांचे संकेत शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. काही ग्रहांवर मिथेन आणि कार्बन डायऑक्साइड एकत्र आढळल्यास तेथे जैविक प्रक्रिया सुरू असण्याची शक्यता तपासली जाते. काही संशोधक असेही मानतात की परग्रहावरील जीवन पृथ्वीवरील जीवनापेक्षा पूर्णतः वेगळे असू शकते. त्यामुळे ‘जीवन’ या संकल्पनेची व्याख्याच भविष्यात बदलू शकते. यामुळे आधुनिक दुर्बिणी ग्रहांच्या वातावरणातील सूक्ष्म रासायनिक असंतुलन, ढगांचे स्वरूप आणि उष्णतेचे वितरण यांचाही अभ्यास करत आहेत. भविष्यात यातूनच एखाद्या ग्रहावर जैविक हालचालींचे अप्रत्यक्ष संकेत मिळू शकतात. याशिवाय, पृथ्वीसारखा ग्रह सापडला तरी तेथे जीवन आहे की नाही हे सिद्ध करणे अवघडच आहे. ‘दुसरी पृथ्वी’ शोधण्याच्या या शर्यतीमागे केवळ वैज्ञानिक कुतूहल नाही, तर मानवजातीच्या भविष्याचाही प्रश्न दडलेला आहे. पृथ्वीवरील वाढती लोकसंख्या, हवामानबदल, संसाधनांची कमतरता आणि पर्यावरणीय संकटे पाहता भविष्यात मानवाला दुसर्‍या ग्रहांवर वसाहती उभारण्याची गरज भासू शकते. सध्याच्या रॉकेट तंत्रज्ञानाने जवळच्या तार्‍यांपर्यंत पोहोचण्यासाठी हजारो वर्षे लागू शकतात. त्यामुळे प्रकाशाच्या वेगाच्या जवळ जाणार्‍या नवीन ‘प्रणोदन’ तंत्रांचा अभ्यास सुरू आहे. काही संकल्पनांमध्ये लेझर किरणांच्या साहाय्याने सूक्ष्म अंतराळयानांना प्रचंड वेग देण्याचा विचार मांडला गेला आहे. अशा यानांना भविष्यात जवळच्या बाह्यग्रहांपर्यंत पाठवणे शक्य होऊ शकते. याशिवाय, मानव प्रत्यक्ष तेथे पोहोचण्यापूर्वी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित स्वयंचलित याने त्या ग्रहांचे वातावरण, तापमान आणि भूभाग यांचा अभ्यास करू शकतील. यामुळे भविष्यात ‘अंतराळ वसाहतीं’ची संकल्पना अधिकच वास्तववादी होत आहे. सोबतच अनेक नैतिक प्रश्नही निर्माण होतात. जर एखाद्या ग्रहावर सूक्ष्म जीवन अस्तित्वात असेल, तर मानवाने तेथे हस्तक्षेप करावा का? पृथ्वीबाहेरील परिसंस्था नष्ट होणार नाहीत याची जबाबदारी कोणाची? त्यामुळे ही शर्यत केवळ विज्ञान आणि तंत्रज्ञानाची नसून मानवाच्या अस्तित्वाचा पुनर्विचार करणारी प्रक्रिया आहे. वास्तव अजूनही खूप दूर आहे. आपल्या सर्वांत जवळचा संभाव्य पृथ्वीसदृश्य ग्रहदेखील अनेक प्रकाशवर्षे दूर आहे.


सध्याच्या तंत्रज्ञानाने तेथे पोहोचण्यासाठी हजारो वर्षे लागू शकतात. त्यामुळे ‘दुसरी पृथ्वी’ सापडली तरी तिथे प्रत्यक्ष जाणे ही वेगळीच समस्या आहे. पण विज्ञानाचा इतिहास पाहता अशक्य वाटणार्‍या गोष्टी भविष्यात शक्य झालेल्या आहेत. ‘दुसरी पृथ्वी’ शोधण्याची शर्यत ही अवकाश संशोधनाची स्पर्धा नाही; ती मानवाच्या अस्तित्वाशी आणि भविष्याशी जोडलेली एक महान वैज्ञानिक मोहीम आहे. कदाचित पुढील काही दशकांत आपण एखाद्या ग्रहावर जीवनाचे स्पष्ट संकेत शोधू. कदाचित एक दिवस मानव दुसर्‍या तार्‍याच्या ग्रहावर पाऊल ठेवेल.

---

राष्ट्ररक्षा मल्हार कृष्ण गोखले

**“इव्हान पावलोव्ह नावाच्या रशियन शास्त्रज्ञाने मानवी मनावर काही प्रयोग केले. त्यातून साम्यवादी सोव्हिएत रशियन हेरखात्याने, एक अत्यंत अमानुष अशी पद्धत शोधून काढली. तिचेच नाव ‘ब्रेनवॉशिंग’ किंवा ‘मनोविच्छेद’. पण, अमेरिकेने त्यांच्याही पुढे मजल मारली असावी, असे वाटते. म्हणजे काय? त्याचाच घेतलेला मागोवा...”**

# मनोविच्छेद? की मनोनियंत्रण?



एखादा उच्च सरकारी अधिकारी, वरिष्ठ केंद्रीय मंत्री, उच्च पदावरचा शास्त्रज्ञ अशांना एखाद्या फटाकड्या पोरीच्या प्रेमात पाडायचे आणि मग त्या लफड्याचा जाहीर प्रस्फोट करू, अशी धमकी देऊन या माणसाकडून अत्यंत महत्त्वाची माहिती मिळवायची, यालाच म्हणतात ‘हनी ट्रॅप’. ही पद्धत आजही वापरली जाते. पण, यात खूप जास्त धोके असतात. अमेरिकन हेरखाते ‘सीआयए’ने यापेक्षा सोपी आणि कमी धोक्याची पद्धत शोधून काढली. महत्त्वपूर्ण अशा प्रकल्पांवर काम करणार्‍या, परदेशातून आलेल्या तरुण शास्त्रज्ञांच्या घरातच त्यांनी बायको म्हणूनच ‘सीआयए’ हस्तक बायका पेरल्या. म्हणजे आयुष्यभर या शास्त्रज्ञावर आपोआपच नजर ठेवली जाऊ लागली.

सोव्हिएत मानसशास्त्रज्ञांनी स्वतःच्या नागरिकांसकट अन्य देशातल्या महत्त्वाच्या नागरिकांवर म्हणजेच, विशेषतः लेखक, साहित्यिक, खेळाडू, कलावंत यांच्यावर मनोविच्छेदाचा प्रयोग केला. हे लोक समाजात लोकप्रिय असतात, तेच जर साम्यवादी तत्त्वज्ञानाचे कौतुक करू लागले, तर साहजिकच समाजमनावर परिणाम होतो. ही हेरगिरी जास्त घातक होती. हेरगिरी म्हटले की, आपल्याला फक्त जेम्स बाँडचे चित्रपट आठवतात. पण, १९६५ साली आलेला ‘दि इपक्रेस फाईल’ हा चित्रपट थरारक नसूनही, जाणत्या प्रेक्षकांच्या आजही स्मरणात आहे. १९६२च्या जेम्स बाँडच्या ‘डॉ. नो’च्या तुलनेत हॅरी पामर या नायकाचा १९६५ सालचा ‘दि इपक्रेस फाईल’ हा चित्रपट खूपच वास्तवाच्या जवळ जाणारा होता. जेम्स बाँड मालिकेचे आतापर्यंत २५ चित्रपट झाले. त्यांपैकी पहिल्या काही चित्रपटांत शॉन कॉनरी या स्कॉटिश अभिनेत्याने बाँडची भूमिका केली. पुढे शॉन कॉनरीला ‘सर’ हा किताब मिळाला. हॅरी पामरचे पुढे चार चित्रपट निघाले. सर्वच चित्रपटात मायकेल केन या कॉकनी अभिनेत्याने पामरची भूमिका केली. कॉकनी ही एकेकाळी इंग्लंडमधली हलक्या दर्जाची जमात समजली जात असे. त्यांची एक विशिष्ट बोलीसुद्धा होती. मायकेलचा बाप गोदीत हमाल होता आणि आई स्वयंपाकीण होती. मात्र, आज मायकेल केन हा एक अव्वल गुणवत्तेचा ब्रिटिश अभिनेता आहे. त्यालाही ‘सर’ किताब मिळाला. आज ९३ वर्षांचा असलेला सर मायकेल आणि २०२० मध्ये मरण पावलेला सर शॉन कॉनरी हे व्यक्तिगत जीवनातही चांगले मित्र होते. तर, आता ‘दि इपक्रेस फाईल’ या आगळ्या नावाच्या वेगळ्या कथानकाकडे पाहू.

ब्रिटनमधल्या एका महत्त्वपूर्ण संरक्षण प्रकल्पातून १५ प्रमुख शास्त्रज्ञ एकापाठोपाठ असे बाहेर पडतात. १६वा शास्त्रज्ञ रेल्वेने प्रवास करत असताना त्याचे अपहरण केले जाते नि त्याचा शरीर संरक्षक ठार होतो. कर्नल रॉस हा गुप्तहेरप्रमुख, सार्जंट हॅरी पामर या गुप्तहेराला त्या ठार झालेल्या शरीर संरक्षकाच्या रूपाने हे रहस्य उलगडण्याच्या कामगिरीवर जुंपतो. आता व्यक्तिरेखा आणि त्यांची पार्श्वभूमी यातला फरक पाहा. बाँड हा ब्रिटिश शाही नौदलात कमांडर या अधिकारी श्रेणीत आहे. साहजिकच, तो मध्य लंडनमधल्या सुखवस्तू वस्तीत राहतो; तर पामर हा ब्रिटिश पायदळातला साधा सार्जंट आहे. सार्जंट म्हणजे शिपायांचा प्रमुख. साहजिकच, तो लंडनच्या कनिष्ठ मध्यमवर्गीय चाळीत राहतो. अपहरण झालेल्या रॅडक्लिफ या शास्त्रज्ञाच्या मागावर असताना, पामरला एक ध्वनिफीत सापडते. तिच्यावर लिहिलेले असते. ‘इपक्रेस!’ म्हणजे काय? ती ध्वनिफीत वाजवून पाहिली असता, तिच्यातून काही चित्रविचित्र कर्णकर्कश आवाज आणि अगम्य शब्द ऐकू येतात. त्यांचा अर्थ कुणीही उलगडू शकत नाही, रहस्य गडद होऊ लागते. इतक्यात पामरचे स्वतःचेच अपहरण होते आणि त्याला कळते की, आपले शत्रू साधेसुधे नाहीत. ते विशिष्ट मनोवैज्ञानिक प्रक्रियांद्वारे, आपले मनच ताब्यात घेऊ पाहत आहेत. ‘माईंड कंट्रोल’ किंवा ‘ब्रेनवॉशिंग’ या नावांनी ओळखल्या जाणार्‍या या प्रक्रियेचे शास्त्रीय नाव आहे, ‘इंडक्शन ऑफ सायकोन्युरोसिस बाय कंडिशंड रिफ्लेक्स अंडर स्ट्रेस’. याच्याच आद्याक्षरांचा शब्द होतो, ‘इपक्रेस’.

पामर आपले मन शत्रूच्या ताब्यात जाऊ न देण्याचा आटोकाट; पण अयशस्वी प्रयत्न करतो. त्याला कळते की, आपला पथकप्रमुख मेजर दाल्बी हादेखील फितूर आहे. ‘क्लायमॅक्स’च्या प्रसंगी सार्जंट पामर मेजर दाल्बीच्या माईंड कंट्रोलवर मात करून, त्याला ठार करतो. हे सगळे पाहणारा त्याचा गुप्तहेरप्रमुख बॉस कर्नल रॉस त्याला म्हणतो, तू आज्ञापालन न करणारा आहेस, म्हणूनच तुला हे जमले. म्हणजे शाबासकीत पण एक चिमटा! वैतागलेला पामर त्याला म्हणतो, तुमच्या असल्या प्रायोगिक खेळांमध्ये माझा जीव गेला असता तर? त्यावर रॉस उत्तरतो, मग, काय बिघडले? त्यासाठीच आम्ही तुला पगार देतो! नोकरशाहीमध्ये बॉस आणि हाताखालचे लोक यांच्यातले संबंध दाखवणारे हे चित्रण, वास्तवाच्या खूप जवळ जाणारे होते. म्हणजेच, ग्लॅमरस वगैरे अजिबात नव्हते.

एक प्रकारे बाँड चित्रपटांच्या थेट विरुद्ध असेच हे चित्रण होते. विशेष असे की, अशा प्रकारचा चित्रपट निघतो आहे हे कळल्यावर बाँड चित्रपटाचा सहनिर्माता हॅरी साल्टझ्मन याने, या चित्राचे सगळे हक्क विकत घेतले. बाँड प्रमाणेच या चित्रपटाचे प्रेक्षकांनी भरघोस स्वागत केले. तुमच्या जर लक्षात येत असेल, तर १९६७ च्या देव आनंदच्या ‘ज्वेल थीफ’ या चित्रपटात ‘दि इपक्रेस फाईल’मधला ब्रेनवॉशिंगचा भाग, हिंदी चित्रपट प्रेक्षकांच्या पचनी पडेल इतपत सौम्य करून झकासपैकी दर्शविण्यात आला आहे.

पटकथा लेखक आणि दिग्दर्शक विजय आनंद ऊर्फ गोल्डीची ही किमया होती. खलनायक अर्जुन म्हणजे अशोक कुमार, हा ब्रेनवॉशिंग प्रक्रियेने नायक विनय म्हणजे देव आनंदला अमर या एका आंतरराष्ट्रीय हिरे चोराच्या व्यक्तिमत्त्वात परिवर्तित करतो. म्हणजे, आपणच अमर आहोत असे विनयला वाटू लागते, इत्यादी. आता यातला खतरनाक भाग असा की, ‘दि इपक्रेस फाईल’मध्ये जो ब्रेनवॉशिंग नामक प्रकार दाखवला गेला, ते सगळे सत्य होते आणि चित्रपटापेक्षा अधिक भीषण सत्य होते.

मनोविज्ञान क्षेत्रातल्या या भीषण प्रयोगाची सुरुवात सोव्हिएत रशियाने केली. १९५० साली कोरियामध्ये यादवी युद्ध सुरू झाले. साम्यवादी उत्तर कोरियाने लोकशाहीवादी दक्षिण कोरियावर आक्रमण केले. रशियाने उत्तर कोरियाची बाजू घेतल्यावर, अमेरिकेने साहजिकच दक्षिण कोरियाची बाजू घेतली. उत्तर कोरियाने पुष्कळ अमेरिकन सैनिकांना कैद केले. पुढे युद्ध थांबले, सामंजस्य करार झाला. उत्तर कोरियाने अमेरिकन युद्धकैद्यांना मुक्त केले पण, आश्चर्य म्हणजे अनेक अमेरिकन सैनिकांनी मायदेशी न परतता उत्तर कोरियातच राहणे पसंत केले. जे बंदी अमेरिकेत परतले, ते कडवे कम्युनिस्ट बनले आहेत आणि मोठ्या हिरिरीने आपल्या मताचा अमेरिकेत प्रचार-प्रसार करीत आहेत, असे त्यांच्या वरिष्ठांना आढळले. अमेरिकन गुप्तचर खात्याने या सगळ्या प्रकाराची कसून चौकशी केली. तेव्हा त्यांना असे आढळले की, या युद्धबंद्यांवर ब्रेनवॉशिंगचा प्रयोग करून, त्यांच्या मेंदूत साम्यवादी तत्त्वज्ञान ठोकून बसवण्यात आले आहे.

अमेरिकन लोक हे फारच उत्तम प्रचारपटू असतात. १९५३ साली अमेरिकन गुप्तचर खात्याचा प्रमुख ॲलन डल्लेस याने प्रिन्स्टन विद्यापीठात एक जाहीर भाषण करून, या प्रकाराची माहिती जनतेसमोर उघड केली. अशा रीतीने व्यक्तीचा मेंदू आणि मन ताब्यात घेण्याच्या, नि ते करताना ‘एलएसडी’ या एका नशा येणार्‍या पावडरचा भरपूर उपयोग करण्याच्या सोव्हिएत शास्त्रज्ञांच्या पद्धतीला डल्लेसने ‘अमानुष’ म्हटले. अमेरिकन जनतेसकट सगळेच लोकशाहीवादी देश हादरले, सोव्हिएत रशियाला बदनाम करण्याचा डल्लेसचा हेतू सफल झाला. खरी गोष्ट अशी होती की, जे तंत्र आणि जी पावडर सोव्हिएत शास्त्रज्ञांना माहीत आहे, ती आमच्या शास्त्रज्ञांना का माहीत नाही? यावरूनच डल्लेस हैराण होता. पण, सर्वशक्तिमान अमेरिकेने एकदा करायचेच म्हटल्यावर अशक्य काय होते? लवकरच अमेरिकन रसायन- औषधी शास्त्रज्ञ, मनोवैज्ञानिक आणि गुप्तहेर अधिकारी यांच्या सहकार्याने, एक जबरदस्त महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू झाला. याचे नाव होते, ‘प्रोजेक्ट एम. के. अल्ट्रा’.

कोणताही नवा शास्त्रीय प्रयोग स्वतःवर करायला उत्सुक असलेले काही वैज्ञानिक, काही कोरियातून परतून कम्युनिस्ट बनलेले सैनिक, काही गुन्हेगार अशांवर हे प्रयोग सुरू झाले. हा प्रकल्प नागरिक, राजकारणी, पत्रकार, इतकेच नव्हे तर खुद्द ‘सीआयए’ मधल्याही अनेक वरिष्ठ अधिकार्‍यांपासून गुप्त ठेवण्यात आला. परंतु, काही काळाने बातम्या बाहेर फुटल्याच. एका डॉक्टरने पाचव्या मजल्यावरच्या घराच्या खिडकीतून उडी मारून आत्महत्या केली. व्हीटी बल्गर नावाचा एक गुन्हेगार कैदी म्हणतो, मला भयानक भास होऊ लागले. माझ्या समोरच्या माणसांच्या ठिकाणी मला सांगाडे दिसू लागले. एकाच्या हातात कॅमेरा होता, त्या जागी मला कुत्रा दिसू लागला. बाजूच्या भिंतींमधून रक्त वहात आहे, असे मला वाटू लागले. माझी पचनसंस्था पार बिघडून गेली. इतरांचे अनुभव यापेक्षाही भयानक होते. त्यामुळे खुद्द ‘सीआयए’मध्येच अंतर्गत बोंबाबोंब झाली. तेव्हा घाईघाईने प्रकल्प गुंडाळण्यात आला आणि संबंधित फाईल्स नष्ट करण्यात आल्या. हे झाले अमेरिकन नागरिकांबद्दल; पण, ‘सीआयए’ने हा प्रकल्प हाती घेतला, तो शत्रूच्या माणसांचे ब्रेनवॉशिंग किंवा माईंड कंट्रोल करण्याचे तंत्र शोधण्यासाठी, अधिकाधिक विकसित करण्यासाठी. त्याचे काय झाले? त्याबद्दल कुणीही, काहीही सांगत नाही.

मानसशास्त्रज्ञ एखाद्या रोग्यावर उपचार करण्यासाठी मोहिनीविद्येचा-हिप्नॉसिसचा उपयोग करतात पण, तो अंमल कायम टिकत नाही. ब्रेनवॉशिंग करून साम्यवादाला अनुकूल बनवलेले लोक, कायमचे साम्यवादी राहत नाहीत. मात्र, त्यांच्या मनावरचा तो अंमल टिकेपर्यंत ते आपल्या बॉससाठी बरेच काम करून गेलेले असतात. सध्या हंगेरियन-अमेरिकन करोडपती जॉर्ज सोरोसचे हस्तक एकापाठोपाठ एक ‘टूलकिटस’ वापरून, भारतातल्या ‘जेन-झी’ला चिथावण्या देत आहेत. त्यामागे हा गुंडाळलेला प्रकल्प तर नसेल?

# टीकेला पुरून उरणारे जनसमर्थन

वेधक
अजय तिवारी

**जागतिक अस्थिरता आणि महागाईच्या वाढत्या झळांमुळे पंतप्रधान मोदी आणि भारतीय जनता पक्षावर टीका, आंदोलने होणे साहजिक आहे; तरीही देशातील वेगवेगळ्या निवडणुकांमध्ये भाजपाला मिळत असलेले सातत्यपूर्ण यश, आर्थिक आघाडीवरील भारताची भरारी आणि सरकारच्या धोरणांवर जनतेने दाखवलेला विश्वास यामुळे मोदी सरकारच्या लोकप्रियतेवर कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही, हे दिसत आहे.**



आज संपूर्ण जग एका अत्यंत गुंतागुंतीच्या आणि आव्हानात्मक कालखंडातून जात आहे. रशिया-युक्रेन युद्ध, इस्रायल-हमास संघर्ष, लाल समुद्रातील तणाव यांसारख्या भू- राजकीय घडामोडींमुळे जागतिक पुरवठा साखळी (सप्लाय चेन) पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. कोरोना महामारीच्या धक्क्यातून जग सावरत असतानाच या युद्धांनी जागतिक अर्थव्यवस्थेला महागाईच्या गर्तेत ढकलले. अमेरिकेसारख्या महासत्तेपासून युरोपमधील प्रगत देशांपर्यंत सर्वत्र महागाई, बेरोजगारी आणि आर्थिक मंदीचे सावट आहे. सध्याच्या जागतिक परिस्थितीचा अभ्यास केल्यास विकसित देशांची अर्थव्यवस्थाही डगमगताना दिसत आहे. कच्च्या तेलाचे वाढते दर, खतांची टंचाई आणि अन्नधान्याची महागाई यामुळे जगभरात हाहाकार माजला आहे. भारताला आपल्या गरजेच्या ८० टक्क्यांहून अधिक कच्चे तेल आयात करावे लागते. त्यामुळे जागतिक बाजारातील घडामोडींचा थेट परिणाम भारतावर होतो. अशा स्थितीत देशात महागाई वाढणे आणि विरोधकांनी त्यावरून सरकारला धारेवर धरणे ही राजकीय अपरिहार्यता आहे. विरोधकांचे कामच टीका करणे असते; परंतु या टीकेपलीकडे जाऊन सामान्य जनता या परिस्थितीचे मूल्यमापन करते तेव्हा तिला हे जाणवते की, जागतिक वादळातही भारताची नौका सुरक्षित ठेवण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौशल्याने केले आहे. कुणी कितीही टीका केली, तरी आकडेवारी खोटे बोलत नाही. आज जागतिक स्तरावर भारताच्या आर्थिक धोरणांचे कौतुक होत आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेसारख्या संस्थांनी भारताला जागतिक अर्थव्यवस्थेचा 'ब्राईट स्पॉट' (एकमेव आशेचा किरण) म्हटले आहे. जगातील बहुतांश देश मंदीचा सामना करीत असताना भारताचा विकास दर सात टक्क्यांच्या आसपास राहिला आहे. ही जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांमधील सर्वोच्च गती आहे. अमेरिका आणि युरोपमध्ये गेल्या ४० वर्षां मधील सर्वोच्च महागाई नोंदविली गेली. त्या तुलनेत भारताने आपली महागाई मर्यादित ठेवण्यात यश मिळविले आहे. रिझर्व्ह बँकेच्या मदतीने सरकारने घेतलेले आर्थिक निर्णय यासाठी कारणीभूत ठरले. देशांतर्गत व्यापार आणि आर्थिक व्यवहार किती मजबूत आहेत, हे दरमहा होणाऱ्या १.७० लाख कोटी रुपयांहून अधिकच्या जीएसटी संकलनातून स्पष्ट होते. भारताचा परकीय चलन साठा अत्यंत मजबूत स्थितीत असून यामुळे कोणत्याही जागतिक आर्थिक धक्क्याला तोंड देण्याची क्षमता भारतामध्ये निर्माण झाली आहे.

लोकशाहीमध्ये विरोधकांचे अस्तित्व महत्त्वाचे असते; परंतु टीका केवळ राजकीय द्वेषातून आणि वस्तुस्थितीला धरून नसते, तेव्हा जनता ती नाकारते. विरोधकांनी महागाई, बेरोजगारी आणि केंद्रीय यंत्रणांचा गैरवापर या मुद्यांवरून मोदी सरकारवर सातत्याने हल्ले चढवले आहेत; परंतु जनतेला हे स्पष्टपणे दिसत आहे की, ही महागाई 'मेड इन इंडिया' नसून 'इम्पोर्टेड' (आयात केलेली) आहे. मोदी सरकारचे आर्थिक नियोजन चुकले असते, तर आज भारताची अवस्था श्रीलंका, पाकिस्तान किंवा व्हेनेझुएलासारखी झाली असती.

पंतप्रधानांनी कठोर आणि दूरगामी निर्णय घेतल्यामुळेच भारत आर्थिक संकटातून वाचला आहे, हा विश्वास जनतेच्या मनात घट्ट झाला आहे. त्यामुळे विरोधकांच्या टीकेचा प्रभाव मतदारांवर पडत नाही. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारवर जनतेचा विश्वास असण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचलेल्या सरकारी योजना. सरकारने केवळ 'मॅक्रो- इकॉनॉमिक्स' (स्थूल अर्थव्यवस्था) सुधारण्यावर भर दिला नाही, तर गरिबांच्या ताटात अन्न आणि डोक्यावर छत राहील, याची काळजी घेतली. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना ही कोरोना काळापासून सुरू झालेली योजना जगातील सर्वात मोठी अन्न सुरक्षा योजना आहे. देशातील ८० कोटींहून अधिक जनतेला मोफत धान्य पुरविले जात आहे.

जागतिक महागाईच्या काळात या योजनेने गरिबांना उपासमारीपासून वाचवले आणि त्यांच्या घरचा खर्च मर्यादित ठेवला. पूर्वी सरकारी योजनांचा पैसा गरिबांपर्यंत पोहोचेपर्यंत मध्यस्थच फस्त करीत असत. मोदी सरकारने 'जनधन-आधार-मोबाईल' (जॅ ट्रिटी) या त्रिसूत्रीच्या माध्यमातून थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात पैसे जमा करण्यास सुरुवात केली. यामुळे भ्रष्टाचार थांबला आणि जनतेचा सरकारवरील विश्वास हजार पटींनी वाढला. महागाई आणि मंदीचा सामना करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे पायाभूत सुविधांवर खर्च करणे. मोदी सरकारने महामार्ग, रेल्वे, विमानतळ आणि बंदरांच्या विकासासाठी लाखो-कोटी रुपयांचा निधी दिला आहे. यामुळे केवळ दळणवळण सोपे झाले नाही, तर लाखो तरुणांना रोजगारही मिळाला. मोदी यांच्या धोरणांवर आणि नेतृत्वावर जनतेचा पूर्ण विश्वास असल्याचा सर्वात मोठा पुरावा म्हणजे निवडणुकांचे निकाल.

२०१४ नंतर देशाचे राजकीय चित्र पूर्णपणे बदलले आहे. २०१९ ची लोकसभा निवडणूक असो वा त्यानंतर झालेल्या विविध राज्यांच्या विधानसभा निवडणुका; जनतेने भाजपाला वारंवार कौल दिला आहे. नुकत्याच झालेल्या विविध राज्यांच्या निवडणुकांमध्ये भाजपाने मिळविलेले यश हे दर्शविते की, 'अँटी-इन्कम्बन्सी' (सत्ताविरोधी लाट) ऐवजी देशात 'प्रो- इन्कम्बन्सी' ची लाट आहे.

उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, महाराष्ट्र, गुजरात, पश्चिम बंगाल यांसारख्या मोठ्या राज्यांमध्ये जनतेने मोदींच्या नावावर आणि कामावर शिक्कामोर्तब केले आहे. अगदी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही भाजपाची कामगिरी उल्लेखनीय राहिली आहे. यावरून स्पष्ट होते की, विरोधकांची टीका सोशल मीडिया आणि टीव्ही स्टुडिओपुरती मर्यादित आहे तर जमिनीवर जनता मोदी यांच्या पाठीशी उभी आहे. सामान्य मतदाराला केवळ आपल्या घरातील महागाई दिसत नाही, तर देशाचा जगात वाढणारा सन्मानही दिसतो. मोदी यांच्या परराष्ट्र धोरणामुळे आज भारत जगातील एक प्रमुख शक्ती म्हणून उदयास आला आहे. भारताने जी-२० चे अध्यक्षपद भूषवून जागतिक राजकारणात आपली ताकद दाखवून दिली. विकसित आणि विकसनशील देशांना एका मंचावर आणण्याचे कठीण काम भारताने केले. रशिया-युक्रेन युद्धाच्या काळात अमेरिकेचा दबाव झुगारून भारताने आपल्या जनतेच्या हितासाठी रशियाकडून स्वस्त दरात कच्चे तेल खरेदी केले. यामुळे देशांतर्गत इंधनाचे दर नियंत्रणात ठेवण्यास मोठी मदत झाली. या धाडसी निर्णयाचे कौतुक देशातील प्रत्येक नागरिकाने केले.

आज जगातील गरीब आणि विकसनशील देशांचा आवाज म्हणून भारताकडे पाहिले जात आहे. अमेरिकेचे अध्यक्ष मोदी यांची स्वाक्षरी मागतात, ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान त्यांना 'बॉस' म्हणतात आणि जगातील बडे नेते भारताचा सल्ला घेतात, तेव्हा सामान्य भारतीय नागरिकाचा राष्ट्रीय अभिमान जागा होतो. हा अभिमान सर्व प्रकारच्या टीकेला निष्प्रभ करतो. विरोधकांच्या कोणत्याही टीकेचा मोदी यांच्यावर परिणाम का होत नाही, याचे मूळ मोदी आणि सामान्य जनता यांच्यातील भावनिक नात्यात आहे. मोदी यांनी स्वतःला 'प्रधान सेवक' किंवा 'चौकीदार' म्हणून जनतेसमोर सादर केले आहे. 'मन की बात' या कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांनी देशातील कोट्यवधी लोकांशी थेट संवाद साधला आहे. मोदी स्वतःसाठी किंवा त्यांच्या कुटुंबासाठी काम करत नाहीत, हे जनतेला ठाऊक आहे. त्यांचा कोणताही वैयक्तिक अजेंडा नाही.

२४ तास देशासाठी झटणारा एक प्रामाणिक नेता अशी त्यांची प्रतिमा जनमानसात निर्माण झाली आहे. त्यामुळे विरोधक त्यांच्यावर वैयक्तिक टीका करतात किंवा अपशब्दांचा वापर करतात, तेव्हा जनता ती टीका स्वतःवर झाल्यासारखी मानून निवडणुकीच्या माध्यमातून विरोधकांना धडा शिकवते. जगात कितीही अस्थिरता असली आणि महागाईचे सावट असले, तरी भारताचे नेतृत्व एका खंबीर आणि दूरदृष्टी असलेल्या नेत्याच्या हातात आहे, याची खात्री देशवासीयांना आहे.

आर्थिक आघाड्यांवरील सकारात्मक आकडेवारी, गरिबांसाठी राबविल्या जाणाऱ्या कल्याणकारी योजना, पारदर्शक कारभार आणि जागतिक स्तरावर भारताने निर्माण केलेला दबदबा यामुळे जनतेचा मोदी सरकारवरील विश्वास अढळ आहे.

# पाकिस्तानची पंचाईत!

परराष्ट्रकारण
अनय जोगळेकर

**ज्या इस्रायलला पाकिस्तानने प्रारंभीपासूनच मान्यता दिलेली नाही, त्याच इस्रायलबरोबर 'अब्राहम करारा'वर स्वाक्षरी करण्याचे आवाहन अमेरिकेने केले. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या गुगलीने पाकिस्तानची चांगलीच पंचाईत झालेली दिसते. त्यानिमित्ताने उद्भवलेल्या या एकूणच जागतिक अनिश्चिततेच्या परिस्थितीचे विश्लेषण करणारा हा लेख...**



अमेरिका आणि इराण यांच्यात युद्धाची दुसरी फेरी सुरू होणार का, दीर्घ काळ टिकणारा युद्धविराम होणार, याबाबत संभ्रम अजूनही कायम आहे. दुसरीकडे इस्रायलने लेबेनॉनमध्ये आघाडी उघडून 'हिजबुल्ला'चा बालेकिल्ला असणाऱ्या देशाच्या दक्षिण भागातील लिटानी नदीपर्यंतचा भाग स्वतःच्या ताब्यात घेतला आहे.

लेबेनॉनच्या पूर्वेकडील डोंगराळ प्रदेशातील क्रुसेडर काळातील 'ब्युफोर्ट' हा किल्ला ताब्यात घेऊन त्यावर स्वतःचा झेंडा फडकावला आहे. १९८२ साली इस्रायलचे सैन्य लेबेनॉनमध्ये घुसले असता, त्यांनी हा किल्ला ताब्यात घेतला होता. तब्बल १८ वर्षांनी २००० साली इस्रायलने लेबेनॉनमधून माघार घेतली. इस्रायलच्या आक्रम णामुळे इराणने अमेरिकेशी अप्रत्यक्ष वाटाघाटींतून माघार घेण्याचा निर्णय घेतला. आपण मध्यस्थी केल्यानंतर 'हिजबुल्ला' आणि इस्रायलने युद्ध थांबवण्याचा निर्णय घेतला, असे ट्रम्प यांनी सांगितले.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या दि. २५ मे रोजीच्या वक्तव्याने आखाती अरब देशांसह पाकिस्तानमध्ये खळबळ उडवून दिली. डोनाल्ड ट्रम्प यांनी 'ट्रुथ' या समाजमाध्यमावर टाकलेल्या एका पोस्टमध्ये म्हटले की, इराणसोबतच्या वाटाघाटी अतिशय चांगल्या प्रकारे पुढे जात आहेत. हा करार सर्वांसाठी लाभदायक ठरेल, अन्यथा पुन्हा युद्धभूमीकडे परतावे लागेल, ते कुणालाही नको आहे. ट्रम्प यांच्या सौदी अरेबियाचे युवराज व पंतप्रधान मोहम्मद बिन सलमान, संयुक्त अरब अमिरातीचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद बिन झायेद अल नहयान, कतारचे अमीर शेख तमीम बिन हमद अल थानी, पाकिस्तानचे फील्ड मार्शल सय्यद असीम मुनीर, तुर्कीयेचे राष्ट्राध्यक्ष रेसीप तैय्यब एर्दोगान, इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष अब्देल फताह अल-सिसी, जॉर्डनचे राजा अब्दुल्ला दुसरे आणि बहरीनचे राजा हमद बिन ईसा अल खलिफा यांच्याशी झालेल्या चर्चे दरम्यान मी स्पष्टपणे सांगितले की, अमेरिकेने हा अत्यंत गुंतागुंतीचा प्रश्न सोडवण्यासाठी केलेल्या सर्व प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर, किमान या सर्व देशांनी एकाचवेळी अब्राहम करारांवर स्वाक्षरी करणे अपेक्षित आहे. या चर्चेत सहभागी असलेल्या एखाद्या किंवा दोन देशांकडे करारावर स्वाक्षरी न करण्याचे काही वैध कारण असू शकते आणि ते स्वीकारले जाईल. परंतु, बहुतांश देशांनी हा करार स्वीकारण्यासाठी तयार, इच्छुक आणि सक्षम असले पाहिजे. त्यामुळे इराणबरोबरचा हा करार अधिक ऐतिहासिक ठरेल. त्याच पोस्टमध्ये स्पष्टीकरण देताना ट्रम्प यांनी कशा प्रकारे गेल्या सुमारे तीन वर्षांपासून सुरू असलेल्या इस्रायल विरुद्ध 'हमास', 'हिजबुल्ला' आणि इराण यांच्या युद्धामध्ये इस्रायलचे संयुक्त अरब अमिराती आणि बहारीनसारख्या अब्राहम करारारावर स्वाक्षरी करणार्या देशांशी संबंध अधिक भक्कम झाले आहेत, असे सांगितले. त्यांनी भविष्यामध्ये इराणसुद्धा अब्राहम करारावर स्वाक्षरी करेल, असा आशावाद व्यक्त केला.

यहुदी, ख्रिस्ती आणि इस्लाम या तिन्ही धर्मांमध्ये अब्राहम आद्यपुरुष समजले जातात. या तिन्ही धर्मांमध्ये अनेक समान धागे असल्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांच्या अध्यक्षपदाच्या काळात ख्रिस्तीबहुल अमेरिकेच्या मध्यस्थीने यहुदी राष्ट्र इस्रायल आणि चार अरब देशांमध्ये झालेल्या शांतता करारांना अब्राहम करार म्हटले जाते. यापूर्वीच १९७९ साली इजिप्त आणि १९९५ साली जॉर्डन या अरब देशांनी इस्रायलशी पूर्ण राजनयिक संबंध प्रस्थापित केले होते.

यापूर्वी कतार आणि ओमानशी इस्रायलचे मर्यादित संबंध होते. दि. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी 'हमास'ने इस्रायलवर दहशतवादी हल्ला केला नसता, तर त्याच सुमारास सौदी अरेबियाही इस्रायलशी राजनयिक संबंध प्रस्थापित करणार होता. ट्रम्प यांच्यासाठी अब्राहम करार हे त्यांच्या अध्यक्षपदाच्या पहिल्या टर्मचे सगळ्यात मोठे यश आहे. ट्रम्प यांचे जावई जारेद कुशनर यांनी या वाटाघाटींमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली होती. पण, गेल्या काही वर्षांमध्ये सौदी अरेबियाची इस्रायलसोबतची जवळीक कमी झाली.

सगळ्या अरब मुस्लीम देशात पाकिस्तान हा अपवाद. पाकिस्तानने आपल्या स्वातंत्र्यापासूनच इस्रायलविरोधी भूमिका घेतली आहे. पाकिस्तानने अण्वस्त्रनिर्मिती करतानाही आपल्याकडचा बॉम्ब हा इस्लामिक बॉम्ब असून तो अरब मुस्लीम देशांच्या संरक्षणासाठी असल्याचा आव आणला होता. खरं तर, १९८०च्या दशकातच इस्रायल पाकिस्तानच्या अण्वस्त्रनिर्मिती प्रकल्पावर हल्ला करणार होता. अमेरिकेच्या मध्यस्थीमुळे तसे झाले नाही. पाकिस्तानच्या पासपोर्टवरही 'इस्रायल सोडून बाकी सर्व देशांसाठी' असे स्पष्टपणे लिहिलेले असते.

१९८०च्या दशकापासून पाकिस्तानने आपल्या जनतेमध्ये इस्लामिक मूलतत्त्ववाद रुजवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. आजही पाकिस्तानमधील सर्वसामान्य लोकांमध्ये अमेरिका आणि इस्रायलच्या विरोधात भावना तीव्र आहेत. असे असले, तरी दुसरीकडे पाकिस्तानी सैन्याला उघडपणे इस्रायलविरोधी भूमिका घेतल्यामुळे असणार्या धोयांची जाणीव होती. या सुमारास राजकीयदृष्ट्या पाकिस्तानने सौदी अरेबिया आणि इराण यांच्यातील शीतयुद्धात तटस्थ भूमिका घेतली. अमेरिकेला दहशतवादाविरोधात लढण्यासाठी मदत करणारा पाकिस्तान ओसामा बिन लादेनसारख्या दहशतवाद्यांना आसरा देतो, हे कळल्यावर अमेरिका पाकिस्तानपासून फारकत घेऊ लागली. अमेरिकेच्या मदतीचा ओघ आटल्यावर पाकिस्तान चीनजवळ सरकू लागला. इमरान खान पंतप्रधान असताना पाकिस्तान तुर्कीयेच्या नेतृत्वाखाली समांतर मुस्लीम गट तयार करण्याच्या प्रयत्नांत सहभागी झाला. त्यामुळे पाकिस्तानच्या इस्रायलविरोधी भूमिका अधिक तीव्र झाली.

या भूमिकेमुळे भारत आणि इस्रायल एकमेकांच्या अधिक जवळ येऊ लागले. त्यामुळे भारत आणि पाकिस्तानमधील लष्करी सामर्थ्यातील दरीही मोठी होऊ लागली. अनेकदा अमेरिकेचे संसद सदस्य पाकिस्तानच्या या भूमिकेवर बोट ठेवून त्याला अमेरिकेची मदत नाकारू लागले.

या जाणिवेमुळे पाकिस्तानचे लष्करी नेतृत्व अस्वस्थ होते. इमरान खानला राजीनामा द्यायला भाग पाडून त्यांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली तुरुंगात पाठवल्यावर त्यांनी संधी मिळाली. पाकिस्तानमध्ये झालेल्या निवडणुकांत सौदी समर्थक शाहबाज शरीफ यांच्या नेतृत्वात सरकार स्थापन करण्यात आले. तेव्हापासून सौदी अरेबियाच्या मदतीने पाकिस्तानने अमेरिकेशी संबंध सुधारण्यास सुरुवात केली. डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे अध्यक्ष झाल्यावर त्याला यश मिळाले. असे असले, तरी आजही पाकिस्तानचे जनमत इस्रायलच्या विरोधात आहे. पाकिस्तानने इस्रायलशी राजनयिक संबंध प्रस्थापित केल्यास तेथे लोक रस्त्यावर उतरतील.

अमेरिका आणि इराण यांच्यामध्ये मध्यस्थी करताना ट्रम्प अशी अट घालतील, अशी पाकिस्तानची अपेक्षा नव्हती. सौदी अरेबियाला कायम अंतर्गत बंडाळीची भीती वाटत असल्यामुळे त्यांनी जाणीवपूर्वक आपले सैन्य कमकुवत ठेवले. अनेक दशकांपासून पाकिस्तानी सैन्यदलातील अधिकारी निवृत्तीनंतर सुरक्षा सल्लागार म्हणून सौदी अरेबियामध्ये काम करतात. पाकिस्तानचे पायलट सौदी अरेबियाची लढाऊ विमानं चालवतात. असे असले तरी येमेनमधील हुती बंडखोरांनी, तसेच इराणने हल्ले केल्यास सौदी संरक्षण कराराने बांधलेला पाकिस्तान त्यांच्याविरुद्ध हल्ला करणार नाही, हे मोहम्मद बिन सलमान यांनाही माहिती आहे.

अमेरिकेकडे आज जगातील सर्वांत मोठे तेलसाठे असून, जगातील दुसरे सर्वांत मोठे तेलसाठे असलेल्या व्हेनेझुएलावर अमेरिकेचे नियंत्रण आहे. उत्तर आणि दक्षिण अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक वायूचे साठे सापडले असून, एकदा तेलशुद्धीकरण प्रकल्प बांधले आणि नैसर्गिक वायू द्रवरूपात साठवण्याची व्यवस्था केली की, अमेरिकेचे पर्शियाच्या आखातावरील अवलंबित्व मोठ्या प्रमाणावर कमी होणार आहे. ट्रम्प यांनी आखातातील अमेरिकेच्या सैन्याच्या तैनातीला अरब देशांनी इस्रायलला मान्यता देऊन त्याच्याशी राजनयिक संबंध प्रस्थापित करण्याशी जोडल्यास आखाती अरब देशांसमोर पर्याय उरणार नाही. पाकिस्तानचे मात्र तसे नाही.

अमेरिकेच्या दबावाखाली पाकिस्तानने इस्रायलशी संबंध प्रस्थापित केल्यास पाकिस्तानला लोकसंख्येच्या रोषास सामोरे जावे लागणार आहे.